Regd-N. No150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१ ] आकोला—सोमवार तारीख ५ माहे नोव्हेंबर सन १९१७ ई० [ अंक ४४

## जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवता येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस जम यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

ता. १ जुलै पासून पुढें आणखी प्रसिद्ध होईपर्यंत व्याज दरसाल दर शेकडां ४ रुपये याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ नो नं १ — Lyon Scott एजंट

---

## अनुभवानें खात्री



**पटेल** !! जर आपणास आपले हारमोनीयम अगदीं वाईट स्थितींतील नव्या प्रमाणें माफक दरांत दुरुस्त करून घेणें असेल तर आजच खालीं लिहिलेल्या पत्यावर व्यवहार करा. अनुभवानें खात्री पटेल. शिवाय नव्या पेट्या आमचे जंगी कारखान्यांत ऑरडर प्रमाणें अडव्हान्स आल्यास तयार मिळतात. त्याचे दर—हात पेटी सिंगल रीड २० ते २९

" डबल रीड ३० ३५-४०-५०

तीनलाइनी क्याझरेल सूराची किं. रु. ९५.

पाय पेटी सतक १। ६० ते ८० रु.

" " " ३॥ ८५ ते ९५ रु.

" " " ३॥। १०४-११५ रु)

" " " ३॥। तीन लाइनी क्याझरेल सुराची १८० ते २१० रु

**पत्ता—रामचंद्र बीसनसा हार्मोनियम मेकर व रिपेअरर नांदुरा जि० ( बुलडाणा)**

नो. नं. २८४

---

## जाहिरात

या लेखावरून कळविण्यांत येतें कीं वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचें कलम ११६ (१) जे आणि ११६ (१) (२) या अन्वयें वाशीम मुनिसिपालटीचें हद्दींत इमारतीची रचना आणि पुनर्रचना करण्याकरितां नियम आलिशान चिफ कमिशनर साहेब बहादूर यांनीं मंजूर करून सी० पी० ग्याझेट नोटिफिकेशन नंबर १९६, ३३३ अ ता० २३-७-१७ यांत प्रसिद्ध केले आहेत. पूर्वीचे नियम आलिशान रेसिडेंट साहेब बहादूर यांनीं मंजूर करून रेसिडेंटसी आर्डर नोटिफिकेशन नंबर १८२ तारीख २०-४-१८९९ यांत प्रसिद्ध केलेले नियम रद्द करून त्या ऐवजी हे नवीन नियम केले आहेत. नियमाचा मसुदा वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचे कलम ४७ अन्वये सर्व लोकांचे माहिती करितां प्रसिद्ध करण्यांत आला आहे.

सही

विनायकराव विष्णु गोखले

व्हाइसचेअरमन

म्युनीसिपल कमेटी वाशिम

### नियमाचा मसुदा

(१) कोणी इसम ज्याचा इरादा एखादी इमारत बांधवयाची किंवा तिची पुनररचना करावयाची असेल किंवा ज्यास सार्वजनिक रस्त्यावर किंवा दुसरी म्युनिसिपालिटीची किंवा नझुलची जमिन यावर दरवाजा बांधावयाचा असेल त्याची पुनररचना करावयाची असेल किंवा नवीन दरवाजा पाडावयाचा असेल किंवा नाली अथवा मोरी करावयाची असेल सदर्हुप्रमाणें इमारतीची रचना किंवा पुनररचना करण्याचें अगोदर किंवा नाली किंवा मोरी किंवा वर निर्दीष्ट केलेलें दुसरें काम बांधण्याचे पुनररचना करण्याचें किंवा नवीन उघडण्याचें पूर्वी आपला इरादा या नियमास जोडलेल्या नमुन्याप्रमाणें लेखी नोटीस देऊन कमेटीस कळविला पाहिजे मात्र जेव्हां कोणता ही भाग ज्यास्त वाढवणें त्यांत फेरबदल करणें किंवा रचना करणें यांच्या योगानें अस्तित्वांत असलेल्या इमारतींच्या अंतर्गत स्थितींत याचा बदल होतो व तिची बाहेरील व मुख्यरचना बदलली जात नाहीं तेव्हां अशी नोटीस देण्याची जरूर नाहीं.

टीपः— एखादे इमारतीची रचना करणें या उल्लेखाचा अर्थ वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचें कलम ८९ यांतील खुलाशांत जो अर्थ दिला आहे तोच अर्थ समजला जाईल.

(२) नियम १ प्रमाणें जो प्रत्येक इसम नोटीस देईल त्यानें त्या नोटिशीबरोबर खालील कागद द्यावेत.

१ वीस फुटास एक इंच या स्केलवर काढलेल्या जागेच्या नकाशाच्या दोन प्रती. या नकाशांत खालील माहिती दिली पाहिजे.

(अ) अस्तित्वांत असलेली इमारत जर असेल तर आणि अर्जदाराचें मालकिची किंवा त्याचे वहिवाटींत असलेली जागा.

(ब) ह्या जमिनीवर बांधावयाचे किंवा पुनररचना करावयाचे इमारतीची व तदंगभूत बाहेर इमारतीची स्थिती.

(क) ह्या जमिनीवर बांधावयाचे किंवा पुनररचना करावयाचें इमारतीचें आणि बाह्य इमारतीचे आपले जाणारे जागेचें क्षेत्रफळ.

(ड) शेजारच्या सडका, रस्ते, व गल्या यांचीं नांवें असतील तर व रुंदी व शेजारचे इमारतींची स्थिती.

(ई) अस्तित्वांत असलेल्या नाल्या किंवा नवीन करावयाचे पायखाने किंवा मोऱ्या आणि

२ दहा फुटास १ इंच या स्केलवर काढलेला नकाशा सक्सेशनसह त्याच्या दोन प्रती यांत खालील माहिती असावी.

(अ) ज्या लेव्हलवर इमारतीचा पाया व सर्वांत खालील जमिन किंवा जोते घालावयाचें असेल त्या लेव्हल शेजारच्या सडका व रस्ते यांच्या लेव्हल्स

(ब) किती मजले बांधावयाचे आहेत त्यांची संख्या आणि

(क) इमारतींत प्रत्येक खोलींत उजेड आणि हवा या संबंधानें करावयाच्या व्यवस्था,

(१) मात्र जर नोटिस देणारा एखादा मनुष्य सेक्रेटरी किंवा त्या कामा करितां कमेटीनें नेमलेला दुसरा अंमलदार याची खात्री करून देईल कीं इमारतीस खर्च १०० रुपयाहून कमी लागेल तर प्यारा १।२ यांत मागितलेली माहिती देणारा साधा नकाशा पुरे होईल. मात्र जागेच्या नकाशांत कोणते ही स्थितींत ज्या जागेवर किंवा जागेच्या पायांवर इमारती किंवा बाह्य इमारती उभारावयाच्या असतील तिची स्थिती व लांबी रुंदी बरोबर रितीनें दाखविली पाहिजे.

आणखी त्या नकाशांत मंजूर झाले नंतर इमारत बांधणार इसमाची त्यांत फेरबदल करावयाची इच्छा असेल तर इमारतीच्या बाह्य किंवा मुख्य रचनेच्या फेरबदलामुळें कांहीं हरकत येत नसेल तर किंवा म्युनिसिपाल कमेटीनें वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचें कलम ८९ अन्वयें दिलेल्या लेखी हुकूमांत कोणते ही रितीनें त्या फेरबदलामुळें प्रत्यवाय येत नसेल तर त्याफेरबदला संबंधानें कमेटीस पुन्हा नोटीस देऊन त्यांची मंजुरी घेण्याची जरूरी नाहीं.

### कारवाई.

(३) नियम १ प्रमाणें आलेल्या नोटिसा या कामा करितां ठेवलेल्या एका रजिष्टरांत नोंदल्या जातील.

(४) नोटीस व तिज बरोबर असलेला नकाशा आणि त्यासंबंधाचे कागद एकदम वार्ड मेंबरकडे त्यांचे मता करितां पाठविले जातील व वार्ड मेंबर त्याजकडे कागद पोंहचलेपासून सात दिवसाचे आंत ते कागद आरोग्य आणि इतर मुद्या संबंधानें आपले मत व शेरा देऊन सेक्रेटरीकडे परत करतील.

(५) वार्ड मेंबरकडून कागद आलेवर सेक्रेटरी व्हाईसचेअरमन किंवा चेअरमन सॅनिटेशन कमेटी किंवा कमेटीनें नेमलेला दुसरा अंमलदार याजपुढें ते कागद ठेवतील व व्हाईसचेअरमन सॅनिटेशन कमेटीचे चेअरमन किंवा कमेटीनें नेमलेला अंमलदार ते कागद सब कमेटीपुढें आपले रिपोर्टासह ठेवितील. सब कमेटी ती इमारत योजल्याप्रमाणें बांधण्याची मंजूरी देतील किंवा त्यास योग्य वाटल्याप्रमाणें प्लयान आणि खुलासा यांत कांहीं फेरबदल किंवा दुरस्ती करण्याचें शर्तीवर परवानगी देतील किंवा वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचें कलम ८९ प्रमाणें इमारत बांधण्याची परवानगी नामंजूर करण्याकरितां आपले रिपोर्टासह तें प्रकरण पाठवितील.

(६) जेव्हां सॉनिटेशन सब कमेटी किंवा म्यानेजिंग कमेटी इमारतीस आपली अखेर मंजूरी देतील तेव्हां सेक्रेटरी यांनी लेखी इमारत बांधण्याचे परवानगीचा दाखला द्यावा. हा दाखला दिल्याचे तारखेपासून १ वर्ष पावेतो अंमलांत राहील. या दाखल्या बरोबर मंजूर केलेला नकाशा दिला जाईल या नकाशांत मुळचें नकाशांत सॉनिटेशन सब कमेटी किंवा म्यानेजिंग सबकमेटी यांनीं केलेले फेरबदल किंवा दुरस्त्या दाखविल्या जातील.

(७) प्रकरणाचा निकाल झालेवर मंजूर केलेला नकाशा व सूचना यांची नकल सेक्रेटरी यांनीं पुढील दाखल्याकरितां म्युनिसिपल ऑफिसांत दप्तरीं ठेवावी.

(८) सेक्रेटरी किंवा दुसरा अंमलदार यास म्यानेजिंग कमेटी किंवा सॅनिटेशन कमेटी नेमतील त्यांनीं इमारत बांधणें सुरू असतांना तिची तपासणी करावी आणि जर त्यास असें वाटेल कीं मंजूर केलेला नकाशा आणि सुचना याप्रमाणें अंमलबारी केली नाहीं तर त्यांनीं सॅनिटेशन कमेटी किंवा म्यानेजिंग कमेटी यांचेपुढें निकाला करितां तो विषय एकदम ठेवावा.

(९) ज्या इसमास इमारत बांधणेंकरितां परवानगी मिळाली आहे त्यास एखादा म्युनिसिपालटीचा अमलदार हुकुम देईल तर त्यांनीं आपला परवानगीचा दाखला व मंजूर केलेला प्लॅन आणि सुचना त्या अमलदाराचें तपासणी करितां दाखल करावयात.

### नमुने व प्लॅन

(१०) नियम १ प्रमाणें नोटिसीचा नमुना मागितला असतां किंमत न घेतां

सेक्रेटरीचे ऑफिसांत दिला जाईल.

(११) नियम २ दोन अन्वयें लागणारा नकाशा मागितल्यास कमेटीचें ऑफिसांत इमारत बांधणारा किंवा तिची पुनररचना करणारे इसमाचे खर्चानें तयार केला जाईल व तो खर्च कमेटी वेळोवेळीं ठरवील त्या दरानें घेतला जाईल.

(१२) नियम १ ते ९ मोडल्याचो शाबीती माजिस्ट्रेट पुढें झाल्यास त्याबद्दल ५० रुपयापेक्षां जास्त नाहीं इतका दंड केला जाईल आणि जेव्हां नियम मोडणें चालूं राहणारें असेल तेव्हां पहिले दिवसानंतर जितके दिवस नियम मोडणें चालू राहिल तितक्या प्रत्येकीं दिवसाबद्दल दररोज पांच रुपयाप्रमाणें आणखी दंड केला जाईल.

सेक्रेटरी

## नोटीस

सेक्रेटरी म्यु. कमेटी वाशीम यांस

मी खालीं सही करणार वऱ्हाड म्युनीसिपल कायद्याचें कलम ११६ (१) (जे) अन्वयें केलेलें नियमास अनुसरून या नोटीसीनें कळवितो कीं भाग मध्यें जवळ असलेले हल्लीं नंबर ची इमारत मजल्याची बांधावयाची आहे किंवा तिची पुनररचना करावयाचा माझा इरादा आहे. नियमाप्रमाणें अवश्य असलेले प्लॅन सेक्शन आणि एलिव्हेशन आणी दुसरा तपशील दाखविणारे कागद याच्या दोन प्रती सोबत दिल्या आहेत.

सही

पत्ता

सन १८८६ चे वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचें कलम ८९ अन्वयें इमारत बांधण्याची किंवा तिची पुनररचना करण्याची नोटीस देणारें कोणा इसमास कमेटीस देतां येतील असे लेखी हुकूम.

(१) ज्या इमारती नवीन बांधावयाच्या आहेत त्या संबंधानें खालील हुकूम अंमलांत राहील.

(अ) जो जमीन भरून काढली आहे किंवा जी घाणेरडे पदार्थ किंवा मेलेल्या जनावरांचीं प्रेतें किंवा दुसरे घाणेरडे किंवा त्रासदायक पदार्थ टाकण्याकरितां उपयोगांत आणली आहे त्या जमिनीवरील असले पदार्थ कमेटीचे पसंतीप्रमाणें पूर्णपणें काढून टाकल्याशिवाय अशा इमारतीचा कोणताही पाया त्या जागेवर घातला जाणार नाहीं.

(ब) मनुष्याचे वस्ती करितां उपयागांत आणावयाचे इमारतीचा सर्वांत खालील मजल्याची जामिनीचे (सभोंवतालच्या) जमिनीचे सपाटीहून दीड फुटापेक्षां कमी उंच नसावी.

(क) प्रत्येक इमारतींत वस्तीकरितां उपयोगांत आणावयाचें खोलीचें सपाटीचें क्षेत्रफळ ८८ चौरस फुटापेक्षां कमी नसावें व त्या खोलीस कमींत कमी एक दरवाजा वरील हवेंत उघडणारा असावा किंवा जे सायवान किंवा खोली बाहेरील हवेंत उघडली जातात. हा सायवानांत किंवा खोलीमध्यें उघडणारें असावें.

(ड) अशा प्रत्येक इमारतींत वस्तीकरितां उपयोगांत आणावयाची प्रत्येक खोली ती त्या इमारतीचे छावणींतील खोली नसल्यास प्रत्येक भागामध्यें जमिनीपासून छता, पर्यंत कमीत कमी आठ फूट उंच असावी आणि छावणींतील प्रत्येक खोली पांचफूट असावी.

(इ) हवा मोकळी वहावी म्हणून किंवा सफाईचें कामाची सोय व्हावी म्हणून किंवा आगीचा पुस्तिकार व्हावा म्हणून सॅनिटेशन सब कमेटी किंवा म्यानेर्जिंग सब कमेटी नविन होणारे इमारत व शेजारची नवीन इमारत यांच्यामध्यें ३ तीन फुटाहून कमी नाहीं इतकी जमीन सोडण्याकरितां खुली सोडण्याकरितां हुकूम करूं शकतील.

(फ) नवीन काढलेल्या सडका किंवा अस्तित्वांत असलेल्या सडका जेथें अधिक रुंद किंवा सरळ करावयाच्या असतील तेथें सॅानिटेशन कमेटी किंवा म्यानेर्जिंग कमेटी विरुद्ध हुकूम न करतील तर नवीन बांधले जाणाऱ्या इमारतीच्या पूर्ण लांबीभर ६ सहा फुटांपेक्षां कमी नाहीं इतक्या रुंदीची जागा ह्या इमारतीचे सर्वांत जवळ असणारें हद्द किंवा सडकेच्या बाजूची नाली यांच्या दरम्यान सोडावी लागेल.

(२) सडकेचे नालीचे बाजूनें कोणीं इसम इमारत बांधण्यास किंवा तिची पुनररचना करण्यास इच्छील तर सदरहु नाली व नालीस लागून सर्वांत जवळ असणारे इमारतीचा भाग यांचे दरम्यान कमींतकमी १॥ दीड फूट रुंद जमीन त्यांस सोडावी लागेल.

(३) खालील सूचनाप्रमाणें नवीन करावयाची किंवा उंच करावयाची इमारतीची उंची ज्या सडकेवर ही इमारत असेल त्या सडकेच्या रुंदीचे मानानें ठरविण्यांत येईल.

१ जर सडकेची रुंदी २६ फुटापेक्षां ज्यास्त नसेल तर ती सडकेच्या मानानें दीड फुटापेक्षां जास्त उंच केली जाणार नाहीं किंवा तिची असलेली उंची वाढवितां येणार नाहीं.

२ सडकेची रुंदी २६ फुटाहून ज्यास्त असून ४० फुटांपेक्षां जास्त नसेल तर इमारत ४० फुटापेक्षां जास्त उंच केली जाणार नाहीं किंवा तिची उंची वाढली जाणार नाहीं.

३ जर सडकेची रुंदी ४० फुटाहून अधिक असेल तर इमारत सडकेच्या रुंदीपेक्षां जास्त रुंदी केली जाणार नाहीं किंवा तिची उंची वाढवितां येणार नाहीं.

(४) जर इमारत दोन सडकांस लागून असेल तर तिची उंची जितका तिचा भाग अधीक रुंदीचे सडकेवर असेल तितक्या भागाची उंची त्या अधिक रुंदीचे सडकेचें मानानें करितां येईल व त्या इमारतीचा भाग कमी रुंदीचे सडकेवर असून अधिक रुंद सडकेपासून ८० फुट अंतरापर्यंत ती त्याच मानाने करितां येईल. मनुष्यांचे वस्ती करितां उपयोगांत आणावयाची कोणतीही खोली जुन्या किंवा नव्या पायखान्यावर बांधिली जाणार नाहीं.

(५) कमेटीचें मताप्रमाणें नालीचें पाणी जमा करण्याची व तेथून तें वाहून नेण्याची अवश्यक असणारी योजना केल्याशिवाय इमारतीचे कोणतेहि भागाचा स्नान करण्याकरितां व कपडे धुण्याकरितां व वरांतील भांडीं धुण्याकारितां कोणताही इसम उपयोग करणार नाहीं किंवा दुसऱ्यास उपयोग करूं देणार नाहीं.

(६) वरील हुकमामध्यें कांहीं सांगितलें असेल तथापि कमेटीस योग्य वाटेल तर लेखी परवानगी देऊन खालील हुकूम करण्याचा कमेटीस अखत्यार राहील.

(अ) एखादे इमारतीच्या संबंधानें नियमाप्रमाणें अवश्य लागणारे लांबीमध्यें फेरफार करण्याचा हुकुम करणें.

(ब) तीन महिन्यापेक्षां जास्त मुदतीपर्यंत ठेवावयाचे नाहीं अशा कोणत्या ही हंगामी इमारतीस वर लिहिलेले हुकूम किंवा त्यांपैकीं एखादा हुकूम त्याचें अमलबारी करण्यापासून माफी करणें परंतु प्रत्येक इमारती संबंधानें घ्यावयाची परवानगी किंवा माफीही त्यांस योग्य वाटतील अशा शर्तीनिशी देण्याचा कमेटीस अखत्यार राहील.

## पायखान्याची रचना.

(७) कमेटीनें पसंत केलेल्या जागेखेरीज कोणत्या ही जागेवर पायखाना नवीन केला जाणार नाहीं साधारणपणें घरांत राहणारे वयांत आलेले बारा मनुष्याकारितां एक खोली पुरविली जाईल.

(८) पायखान्याची खोली किंवा त्याचा पाया किंवा त्याची एखादी नाली किंवा मोरी जिचा उपयोग मैलापाणी वाहण्याकरितां केला जाईल अशी मातीची किंवा विटा आणि मातीची बांधिली जाणार नाहीं.

(९) प्रत्येक पायखान्यास वरचे बाजूनें चार चौरस फुटांपेक्षां कमी नाहीं इतकी एकंदर क्षेत्रफळाची किंवा अधिक छिद्रें ठेविलीं जातील.

## नाल्याची रचना

(१०) इमारतीस लागून असणाऱ्या साडपाण्याच्या आणि मैलापाणी जाण्याच्या सर्व नाल्या यांची रचना अशी केली जाईल कीं म्युनिसिपाळीटीचे अमलदारांस सहज रितीनें तपासतां यावशात आणि सॅानिटेशन कमेटी आणि म्यानेर्जिंग कमेटी यांच्या विशेष लेखी परवानगी शिवाय त्यांचे अच्छादन केलें जाऊं नये. मनुष्यांचें राहण्याकरितां ज्या खोलीचा उपयोग व्हावयाचा असेल त्या खोलींतून मैल्याची नाली किंवा मैला पाणी जाणें करितां नालीचा नळ नेला जाणार नाहीं.

(११) जरूरीचे वेळीं व्हाइस चेअरमन किंवा सॅानिटेशन कमेटीचे चेअरमन किंवा कमेटीनें दिलेला दुसरा अंमलदार यांनीं वार्ड मेंबरचे शिफारसी वरून कमेटीचे हुकूमावर अवलंबून कोणती ही इमारत अथवा दुसरें काम सुरू करण्याची परवानगी घ्यावी परंतु त्याचा हुकूम सॅनिटेशन कमेटी किंवा म्यानेर्जिंग सब कमेटी यांचे पसंतीवर व मंजुरातीवर अवलंबून राहील.

नो. नं. ४३४


# लक्षांत ठेवा.

कीं येथें आमचेकडे कमिशनचे (अडतीचे) काम चालत असून आम्ही येथें मिळणारा कापड, किराणा, स्टेशनरी, कांचसामान, दळण्याच्या गिरण्या जीन व प्रेसचें सामान वगैरे वगैरे सर्व प्रकारचा माल माफक कमिशन घेऊन भावाची पूर्ण चौकशी करून पाठवितो. व बाहेर गांवाहून विक्री करितां आलेला माल विकून देतो तसेच सायकल, व सायकलला लागणारे सर्व सामान मोटारचे व घोडे गाडीचे गाद्यांचे कापड, व दुसरे लागणारे सामान, खिशांतील विजेचे दिवे, व दुसरे विजेचे सामान, स्टांपस् वगैरे तेल पुरवितो. एकवेळ आरडर देऊन कामाचे चोखपणाबद्दल खात्री करून घ्या.

डब्ल्यु. व्ही. पिंगळे आणि सन्स

पत्ता— ठाकुरद्वार रोड, काळकादेवी पोष्ट मुंबई नंबर २

नो. नं. ३९८

४० रोगावर एकच जालीम औषध

## सुधासंजीवनी



यानें अजीर्ण, खोकला, दमा, संधीवात, प्रमेह, प्रदर, धुपणी, संग्रहणी, अतीसार वगैरेवर तत्काल गुण येतो.

याची एक बाटली जवळ ठेवणारास वैद्याची गरज राहणार नाहीं. एकदाच खातरी करा किंमत रु. १ टपाल खर्च निराळा. नमुना -॥- अनुपान पत्रकसोबत. गांवोगांव एजंट पाहिजेत. भरपूर कमीशन आजच पत्र लिहा.

सुधासंजीवनी डेपो

खामगांव (वऱ्हाड)

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तडकतोब दूर होतात किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुनली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

Dr. H L. Batliwala Sons & Co. Ltd.

N. N. 6 Dadar Bombay

## नोटीस

**नोटीस कलम ११ आक्ट ८ सन १८९० प्रमाणें.**

कि. मुकद्दमा नंबर ९१ सन १९१७ इ. विद्यमान डिस्ट्रीक्ट जज्ज साहेब यांचें कोर्ट मुक्काम आकोला पश्चिम वऱ्हाड

नांव भिकू
बापाचें नांव रामजी
जात कुणबी राहणार पालोडी
तहसील आकोला जिल्हा आकोला
ज्या अल्पवयी बळीराम वा किसन
उमर वर्षे १२
राहणार पालोडी ता. आकोला तहसिलीचें (२)
शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालनकर्ता (१)
नेमला जाण्या विषयींच्या अर्जा संबंधीं—

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं सदर्हू अर्जदारानें सदर्हू अल्पवयीचें (२) शरीर व इस्टेट रक्षणकरण्यासाठीं पालन कर्ता नेमला जाण्या विषयीं अर्ज केल्यावरून सदर्हु अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख १९ माहे डिसेंबर सन १९१७ इ. रोजीं नेमिली आहे. त्यावरून अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदर्हू अर्जदाराच्या अर्जाबद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यांस जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हजर झाले पाहिजे; आणि त्यांस असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख २९ माहे १० सन १९१७ इ. रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्क्या निशीं दिली

सही
W. R. Dhobley
डि. जज्ज
पश्चिम वऱ्हाड
नो. नं. ४३६ आकोला

## नोटीस.

रा. विठोबा वा. जोती कदम राहणार खीरखेड पोष्ट आडगांव तालुके आकोट जि. आकोला

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं मी तुझी लग्नाची बायको आहे आज १ एक वर्षापासून तुम्ही मजला वागवित नाहीं. मी नांदण्यास तयार असतां तुम्ही मजला मारहाण करून काढून दिले. तेव्हां पासून मी लोकांचे कर्ज काढून निर्वाह करित आहे. करितां या नोटिशीनें तुम्हास मुद्दाम कळविण्यांत येते कीं नोटिस पावल्यापासून ८ आठ दिवसाचे आंत माझा एक वर्षांत झालेला खर्च दरमहा ६ सहा रुपये प्रमाणें ७२ नोटिशीचे खर्चा सुद्धां देऊन मजला घेऊन जावे. मी येण्यास तयार आहे. तसें न केल्यास मी दुसरा घरठाव करीन. मग तुमची कोणत ही प्रकारची जबाबदार राहणार नाहीं कळावें तारीख २७-१०-१७ इसवी

सही
सरु मर्द विठोबा कदम राहणार हिवरखेड बाजार फैलांत ता. अकोट हल्लीं रा. तेल्हारे नि. खु. बांगडी
नो. नं. ४३७

वऱ्हाडसमाचार

आश्विन वद्य ६ पिंगल संवत्सर १८३७

## स्वराज्याची चळवळ व आक्षेपांस उत्तरें.

स्वराज्याची चळवळ हिंदुस्थानांतल्या प्रत्येक प्रांतांतून जोरानें चालली आहे हें पाहून ज्या कित्येकांच्या पोटांत दुखूं लागलें आहे, त्याचे तीन वर्ग करतां येतील.

१ ही चळवळ यशस्वी झाल्यास आपल्या हातांतले अधिकार जातील व आपण निष्प्रभ होऊं अशा संकुचित दृष्टीनें सदर चळवळीला विरोध करणारे अधिकारी; २ या चळवळीनें व्यापार व उद्योग धंदे या संबंधांत आपली सध्या जी चंगल चालली आहे तिला व्यत्यय येईल अशा स्वार्थपरायण परदेशी व्यापारी व कारखानदारांचा वर्ग; आणि ३ देशाभिमानशून्य आणि खोडसाळ कळलाव्या हिंदी लोकांचा वर्ग. या तिन्ही वर्गाकडून स्वराज्याच्या चळवळी विरुद्ध खलबतें व खटपटी सुरू आहेत. या चळवळीच्या उद्देशाची व कार्य करण्याच्या पूर्ण माहिती करून घेतल्यावर प्रामाणिकपणाचा विरोध ठेवणारांशीं आमचें बिलकुल भांडण नाहीं. अशा कांहीं फार थोड्या सामान्य व्यक्ति आहेत व त्यांनीं काढलेल्या शंकांस व घेतलेल्या आक्षेपांस मिसेस बिझांट, लो० टिळक, मि. बापटिस्टा, मि. जिना प्रभृति पुढाऱ्यांकडून समर्पक उत्तरें ही देण्यांत आलीं आहेत. पण वर सांगितलेल्या तीन वर्गांतल्या लोकांकडून पुष्कळ वेळां असे विलक्षण भ्रम उत्पन्न करण्यासारखे आक्षेप घेण्यांत येतात कीं त्या पासून पुष्कळांना भ्रांति पडते व त्यांचा दिशाभूल होते. यासाठीं वस्तुतः त्या आक्षेपांत कांहीं जीव नसतां ही त्यांना उत्तरें देण्याची यातायात करावी लागते. मिसेस बिझांट यांनीं गेल्या आठवड्यांत मद्रास येथील आपल्या एका व्याख्यानांत अशा कित्येक ठळक आक्षेपकांना बिनतोड उत्तरें दिलीं आहेत व तीं वाचनीय आणि मननीय आहेत.

पहिला आक्षेप असा आहे कीं आजपर्यंत ब्रिटिश लोकांनीं येथ कोट्यावधि रुपयांचें भांडवल रेल्वे, चहाचे मळे, व कारखाने यांतून गुंतविलें आहे. राज्यकारभाराच्या सुधारणेच्या नव्या योजनेने हिंदी लोकांच्या हातांत पुष्कळसे अधिकार गेले तर या भांडवलवाल्यांचा पैसा बुडेल व त्यांचें नुकसान होईल. ही ओरड अर्थात युरोपियन व्यापाऱ्यांनीं व भांडवलवाल्यांनीं केलेली आहे. थोड्या दिवसांपूर्वी वरिष्ठ कायदे कौंसिलांत या आक्षेपाचा ध्वनि निघाला होता व त्यानंतर कलकत्ता, मुंबई, कराची वगैरे शहरीं भरलेल्या युरोपियन असोसिएशनच्या सभांतून ही यावर लांबलांब भाषणें झालीं. पण वस्तुतः या आक्षेपांत किती तथ्य आहे तें आपण पाहूं. युरोपियन लोकांनीं या देशांत घातलेलें भांडवल सुमारें ५० कोटि आहे. उद्या स्वराज्याचे हक्क आह्मांस मिळाले अशी कल्पना केली तरी हिंदुस्थानावरचा इंग्रजांचा अंमल नाहींसा होतो असें नाहीं. मग युरोपियन भांडवलवाल्यांना भीती कां वाटवी? भांडवलाचे संरक्षणार्थ राज्यकारभारांत वर्चस्व भांडवलवाल्याचे हातीं असणें अवश्य आहे काय? अर्जेंटाइनमध्यें युरोपियन भांडवलवाल्याचें भांडवल तर हिंदुस्थानांतल्यापेक्षांही अधिक ह्मणजे जवळ जवळ दोन अब्ज आहे पण तेथें युरोपियन भांडवलवाल्यांचें वर्चस्व कां नाहीं? हिंदुस्थानांतच त्याची अवश्यकता कां वाटावी? दुसरी गोष्ट, युरोपियन कंपन्यांचे तर पंनास कोटि रुपयेच हिंदुस्थानांत अडकले आहेत, पण हिंदी लोकांचीं घरेंदारें, शेतें, मळे, प्रॉमिसरी नोटांत गुंतलेला पैसा, फार काय पण स्वतःचे व वंशजांचे प्राण सुद्धां हिंदुस्थानचे कामीं लागलेले आहेत. मग ५० कोटि रुपयांचें महत्त्व अधिक कीं या दुसऱ्याचें महत्त्व अधिक? आणि राज्यकारभारांत त्या मानानें कोणाचें वर्चस्व अधिक असावयास पाहिजे तें कोणी पोरसुद्धां सांगूं शकेल. युरोपियन भांडवलवाल्यांची संख्या भर्ग लक्ष ही नाहीं, हिंदी लोकांची संख्या ३१॥ कोट आहे. तेव्हां कोणाच्या हिताला सरकारानें अधिक जपलें पाहिजे हें सांगावयास पाहिजे काय?

दुसरा एक आक्षेप असा घेण्यांत येतो कीं हिंदुस्थानांत सर्व जातींचे प्रतिनिधि घेऊन निर्दोष अशी राज्यपद्धतीची योजनाच करतां येणार नाहीं. मत देण्याचा अधिकार ठरवितां येत नाहीं. शिक्षणाच्या अभावीं मतदार होण्याची पात्रता ही थोड्यांचेच अंगीं आहे. अर्थात् या सुधारणेचा फायदा एकट्या ब्राह्मण वर्गाला काय तो मिळेल. बाकीचे शें. ९९ लोकांना हात चोळीत बसावे लागेल. हा आक्षेप घेणारे १८३२ सालीं विलायतेंत रिफार्म बिल पास झालें त्या वेळची स्थिति विसरतात. त्यावेळीं तयार झालेली योजना अव्यंग होती काय? त्या वेळीं इंग्लंडांत शिक्षण प्रसार कितीसा झाला होता. त्यावेळीं मतदार होण्याची पात्रता प्रत्येकाला आली होती असें इमानानें कोणाला ह्मणतां येईल काय? त्यावेळीं कशाला आजच्या घटकेस ही इंग्लंडांतल्या शेतकरी व मजूर वर्गांतल्या प्रत्येकाला ही पात्रता आलेली नाहीं असें विलायतेंतले इंग्रज लेखकच कबूल करीत नाहींत काय? १८३२ सालच्या बिलाची योजना अव्यंग होती तर आतांपर्यंत अनेक वेळां तींत सुधारणा करण्याची अवश्यकता कां दिसली? सारांश, विलायतेला एक प्रकारचा न्याय व हिंदुस्थानाविषयीं बोलतांना निराळा प्रकारचा न्याय लावायचा हा सरळपणाचा वाद आहे असें कोण ह्मणेल? हल्लींच्या स्थितींत जितकी न्यायाची व तंतोतंत योजना करतां येईल तितकी करावी आणि अनुभवानें त्यांतले दोष दिसून येतील तसतसे ते काढून टाकण्यांत यावे अशाच रीतीनें सर्व राष्ट्रांतले कायदे व इतर कारभार होत असतात. पण हा सरळ नियम हिंदुस्थानाला लावायला मात्र कांहीं लोक तयार नाहींत, तेव्हां याला हट्टवादीपणापेक्षां दुसरें नांव काय देणार?

तिसरा आक्षेप असा आहे कीं जैन, लिंगायत, व व इतर ब्राह्मणेतर जाति यांची संख्या अल्प असल्यामुळें प्रत्येक जातीचे प्रतिनिधि कायदे कौंसिलांत नसले तर धूर्त ब्राह्मण ब्राह्मणेतरांना खाऊन टाकतील. हा आक्षेप घेणारे जर खानेसुमारीचे रिपोर्ट चाळून पाहतील तर त्यांना दिसून येईल कीं सगळ्यांत लहान जात जर कोणती असेल तर ती ब्राह्मणेतरांची नव्हे तर ब्राह्मणांची आहे. अर्थात् जर एखाद्या अल्पसंख्यक जातीच्या हिताला जपणें सरकारास अवश्य असेल तर ते ब्राह्मण जातीच्या हिताला जपलें पाहिजे. वस्तुतः आमच्या जातीला सरकारानें जपावें अशी ओरड ब्राह्मण वर्गानें करावयास पाहिजे. पण ते मनाचे उदार आहेत व ब्राह्मणेतर देशबंधु आपल्याशीं दगलबाजी करतील अशी यत्किंचित् ही शंका न घेतां ते ब्राह्मणेतरांवर पूर्ण विश्वास टाकतात या त्यांच्या समंजसपणाबद्दल त्यांचें अभिनंदन न करतां उलट त्यांच्याचविषयीं कुत्सितपणाच्या शंका घेणें हा निवळ मूर्खपणा आहे.

हिंदुस्थानातल्या लोकांच्या अंगीं स्वराज्याची पात्रता आणण्याचा उत्तम उपाय ह्मणजे स्थानिक स्वराज्याच्या हक्काची वृद्धि करणें हा आहे असें अधिकारी तोंडानें कबूल करतात, पण प्रत्यक्ष कृतींत मात्र तो उदारपणा दिसत नाहीं. स्थानिक स्वराज्याचे हक्क वाढविल्यास त्याचा दुरुपयोग लोक करतील, कर कमी करतील, आणि एकंदर अव्यवस्था होईल असें कित्येकांचें ह्मणणें आहे. १८७१ सालीं इंग्लंडांत अगदीं अशाच प्रकारची भीति त्या वेळच्या कमिशनच्या रिपोर्टांत लिहून व्यक्त केलेली आहे. पण अनुभवानें काय दिसून आलें? ही भीति व्यर्थ होती. अनुभवासारखा शिक्षक नाहीं, जसजसा अनुभव येत गेला, तसतशा अडचणी दूर करण्याचे मार्ग ही इंग्रज लोकांना दिसले, आणि आज तेच लोक अर्ध्या अधिक जगाचें राज्य सुयंत्रित रितानें चालवित आहेत असें आपण पाहतोंना? हिंदुस्थानाविषयीं ही असाच अनुभव येणार नाहीं कशावरून? हिंदुस्थानच्या लोकांनीं आज पर्यंत कोणत्या कार्यक्षेत्रांत अपयश मिळविलें आहे? त्यानां संधी दिली असतां त्यांनीं आपल्या बुद्धीचा व कर्तृत्व शक्तीचा प्रभाव दाखविला नाहीं असें एकदा तरी घडलें आहे काय? तर मग वरच्या सारख्या शंका निष्कारण घेण्यांत काय अर्थ आहे?

मिसेस बिझांट यांनीं आक्षेपकांच्या शंकांस दिलेलीं हीं उत्तरें इतिहासाशीं व वस्तुस्थितीशीं किती सुसंगत, तर्कशास्त्राच्या पद्धतीनें किती बिनचूक आणि युक्तिवादाला किती धरून आहेत तें निराळें सांगण्याचें कांहीं कारण नाहीं.

## देशी संस्थानें आणि लोकमत.

उशीरानें कां होईना, पण ब्रिटिश सरकार हिंदुस्थानांतल्या लोकमताला मान देऊं लागलें आहे किंवा तो मान देण्याची अवश्यकता ओळखून वागूं लागलें आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. कायदेकौंसिलाची व एकंदर राज्यपद्धतीची सुधारणा करण्याविषयींची चर्चा, राज्यकारभारांत हिंदी लोकांना ज्यास्त घेण्याची जरूरी असल्याविषयींची निदान तात्विक कबुली, मिसेस बिझांट व त्यांचे सोबती यांची सुटका, इ. गोष्टी हल्लीं राजकीय वातावरणांत वारा कोणत्या दिशेनें वाहत आहे त्याची साक्ष देत आहेत. इतके दिवस देशी संस्थानांना लोकमताचें वारें न लागूं देण्याविषयीं विशेष खबरदारी घेण्यांत येत असे. मध्यहिंदुस्थानांतल्या संस्थानांतून अद्याप ही खाजगी वर्तमानपत्र काढण्यास परवानगी मागावी लागते व ती मागितल्यास मिळत नाहीं. अशा अंधारमय प्रदेशांत लोकमतरूपी सूर्याचे किरण प्रविष्ट होऊं लागले आहेत. आपणास लोकमताचा पाठिंबा असल्याशिवाय यापुढें निभाव लागावयाचा नाहीं असें खुद्द संस्थानिकांना वाटून कोणी रयतसभा, कोणी प्रतिनिधिसभा, कोणी कायदेकौंसिलें वगैरे काढून लोकमताची झुळूक राज्यकारभारावर स्वतःच्या खुषीनें घेऊं लागले आहेत हा लोकमताचा मोठा विजयच ह्मटला पाहिजे. दोन महिन्यांपूर्वीं बिकानेरच्या महाराजांनीं केलेलें भाषण घ्या, किंवा गेल्या आठवड्यांत अलवरच्या महाराजांनीं सध्याच्या राजकीय स्थितीसंबंधानें काढलेले उद्गार पहा, ह्मणजे गेल्या दहा पांच वर्षांत आमच्या देशाचें संक्रमण कसें जोरानें होत गेलें आहे याची चांगली कल्पना करतां येईल. हैसूर सारखीं प्रागतिक संस्थानें याच्या ही पुढें पाऊल टाकण्यास पाहत आहेत. परवा दसऱ्याचे दिवशीं हैसूरचे दिवाण सर विश्वेश्वर अय्या यांनीं आपल्या भाषणांत अशी हक्कानें मागणी केली कीं हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत लवकरच ज्या क्रांतिकारक सुधारणा व्हावयाच्या आहेत त्यांत देशी संस्थानिकांना ही योग्य वाटा मिळाला पाहिजे. ब्रिटिश मुलुखाच्या राज्यकारभारांत हात घालण्याची त्यांची इच्छा नाहीं, पण व्यापारविषयक, जकाती संबंधीं, नाण्याच्या प्रश्नासंबंधानें व इतर कित्येक गोष्टींत ब्रिटिश हिंदुस्थानच्या बरोबर देशी संस्थानिकांचें ही हिताहित गोंविलें जातें. त्या प्रश्नापुरतें तरी कौंसिलांत संस्थानिकांची बाजू कौंसिलापुढें नीट मांडली गेली पाहिजे व त्यासाठीं संस्थानिकांचे प्रतिनिधि व्हाइसराय साहेबांच्या कौंसिलांत असणें अवश्य आहे. ही मागणी रास्त आहे. पण ती करण्यापूर्वीं संस्थानिकांनीं आपल्या रयतेला राज्यकारभाराचे हक्क पुष्कळ अधिक देण्यास तयार व्हावयास पाहिजे आहे. त्यांच्या स्वतःच्या कारभारावर लोकमताचा प्रभाव पडलेला दिसूं लागणें ही अधिक अगत्याची गोष्ट आहे.

---

## लॉर्डस सभेंतलें जंगी वादळ.

थोड्या दिवसांपूर्वीं पार्लमेंटच्या कॉमन्स सभेंत मिसेस बिझांटच्या सुटके संबंधानें प्रश्न निघून बराच कडाक्याचा वाद झाला होता. पण मि. मांटेग्यु यांची बाजू मजबूत असल्यामुळें ते त्या वादळांतून विजयी होऊन पार पडले. या वादाचे वेळीं कित्येक चमत्कारिक गोष्टी बाहेर येऊन नजरबंद झालेल्यांच्या सुटके बद्दल कोणाला किती श्रेय द्यावयाचें याचा निर्णय करण्याचें साधन उपलब्ध झालें. हिंदुस्थानासंबंधानें राज्यकारभाराचें धोरण निश्चित ठरवून तें लोकांना जाहिर करा अशी मागणी १९१४ सालापासून लोक करीत आले आहेत व दिवसेंदिवस तिला जोर येऊन अखेर हें धोरण जाहिर न केल्यास लोकांत भयंकर अस्वस्थता माजेल असें हिंदुस्थान सरकारानें मंत्रि मंडळास कळविलें व मंत्रिमंडळाला ती गोष्ट पटून त्यांनीं मि. मांटेग्यु यांच्या मुखानें ता० २० सप्टेंबर रोजीं तें जाहिर केलें. त्या मुळें देशांत बराच शांतता स्थापित झाल्यामुळें मिसेस बिझांटप्रभृति मंडळीस अटकेंत ठेवण्याचें कारण नाहीं असें हिंदुस्थान सरकारानेंच सुचविलें व त्यास मि. मांटेग्यु यांनीं संमति दिली. ही गोष्ट लोकांना ठाऊक नसल्यानें त्यानीं सदर सुटकेचें श्रेय लॉर्ड चेम्सफोर्ड यांस खरोखर द्यावयाचें तें न देतां मि. मांटेग्यु यांस दिलें, व युरोपियन लोकांत ही असाच गैरसमज असल्यामुळें त्यांनीं ही मि. मांटेग्यु यांचेवरच टीकेचा भडिमार केला. परवा लॉर्डस सभेंत सिडनह्याम, लॉर्ड ल्यामिंगटन, व लॉर्ड ल्यांडसडौन यानीं ही तीच चूक करून मि. मांटेग्यु यांचेवर ताशेरा झाडला, पण मि. मांटेग्यु यांच्या तर्फे लॉर्ड इस्लिंगटन यांनीं टीकेस उत्तर देतांना खुद्द लॉर्ड चेम्सफोर्ड यांचीच तार वाचून दाखविली तेव्हां या टीकाकारांचीं तोंडें बंद झालीं. पण या पराजयामुळें चिडून या टीकाकारांनीं दुसरा मुद्दा असा पुढें आणिला कीं मद्रास सरकारच्या इच्छेविरुद्ध मिसेस बिझांट यांची सुटका करविण्यांत हिंदुस्थान सरकारानें मद्रास सरकारची मोठी मानहानि केली. यावर ही लॉर्ड इस्लिंगटन यानीं समर्पक उत्तर दिलें. तें ही लॉर्ड चेम्सफोर्ड यांचेच शद्बांत दिलें. तें हें कीं मिसेस बिझांट यांच्या सुटकेनें नुसती मद्रास इलाख्यांतच नव्हे तर सगळ्या हिंदुस्थानांत शांतता प्रस्थापित होणार होती. अर्थात एका प्रांताधिपतीच्या हट्टामुळें सगळ्या देशाच्या शांततेची हानि होऊं देणें इष्ट न दिसल्यामुळें हिंदुस्थान सरकारानें सुटके बद्दलची सूचना मद्रास सरकारास आपल्या अधिकारांत केली. या वादांत विशेष आश्चर्य करण्यासारखी गोष्ट ह्मणजे लॉर्ड कर्झन यांनीं मि. मांटेग्यु यांच्या समर्थनार्थ भाषण केलें ही होय. मि. मांटेग्यु यांनीं स्टेट सेक्रेटरी होण्याच्या अगोदर केलेल्या भाषणाचा सध्याच्या वादाशीं जो कित्येकांनीं बादरायण संबंध लाविला त्याचा त्यांनीं तीव्र निषेध केला, आणि मि. मांटेग्यु यांनीं हिंदुस्थानांत जाण्याचें ठरवावयाचेंच नव्हतें असें ह्मणणारांना ही अक्कल शिकविणारें भाषण करून वादाचा समारोप केला. याचा परिणाम असा झाला कीं लॉर्ड सिडनह्याम यांना शेवटीं आपला ठराव मागें घ्यावा लागला. कॉमन्स सभेंत सर जा. रीस यांनीं व लॉर्डस सभेंत लॉर्ड कर्झन यांनीं मि. मांटेग्यु यांची बाजू राखल्याबद्दल दोघे ही अभिनंदनास पात्र आहेत.

## महायुद्धाची प्रगति.

### इटालियन रणक्षेत्र.

गेल्या आठवड्यापर्यंत इटालियन रणक्षेत्राकडची फारशी बातमी येत नसे, आणि येई तिच्यावरून इटालियन लोकांवर इतक्यांतच मोठें संकट येईल असें वाटण्यासारखी स्थिति दिसत नव्हती. आतांपर्यंत रशियाच्याच स्थितीकडे लोकांचें सगळें चित्त वेधिलें होतें. पण कांहीं तरी अजब करणी करून लोकांना चकित करून सोडावयाचें हा जर्मन युद्धनीतीचा एक विशेष गुण दिसतो. गेल्या पंधरा दिवसांत एवढीच खबर होती कीं जर्मन आयसोनझोच्या उत्तरेस इटालियन सरहद्द ओलांडून पुढें पाऊल टाकीत गेले आहेत, आणि आस्ट्रियन लोकांना कुमक मिळून त्यांनीं इटालियनांना कार्सोला खिळून टाकिलें आहे. गेल्या आठवड्यांतली इटालियन लोकांची स्थिति याहून वाईट होती. जर्मन लोक चढाई करून सिव्हिडेलपर्यंत गेले व व्हेनेशन मैदानाच्या टोकापर्यंत जाऊन पोंचले अशी खबर गेल्या बुधवारीं येऊन पोंचली. ते जर डोंगराळ मुलुखांतून वाट काढीत मैदानावर खरोखरच उतरले असले तर फार वाईट स्थिति प्राप्त झाली आहे असें ह्मटलें पाहिजे. कारण आतां जर्मन लोकांना वाटेंत कांहींच अडथळा राहिला नाहीं. आतां त्यांचें पाऊल झपाट्यानें पुढें पडणें हें केवळ त्यांच्या संख्येवरच राहिलें; आणि बातमी अशी आहे कीं जर्मनीनें पश्चिम रणभूमीवरून व रशियांतून कांहीं फौज पाठवून ती इटलीकडे कुमक ह्मणून पाठविली आहे, सारांश, बातमी एकंदरीनें वाईट आहे खरी. कित्येक निराशावादी लोक आतांच रूमानियाप्रमाणें इटलीचा सत्यानाश होईल अशी कल्पना चित्रें रंगवीत आहेत. वस्तुतः इतकी निराशा बाळगण्याचें कारण नाहीं. ब्रिटिश लोकांनीं इटलीला मदत करण्याचे उपाय तत्काळ अंमलांत आणिले आहेत. स्वतः इटालियन लोक मोठे खंदे लढवय्ये आहेत. त्यांनीं आतांपर्यंत एकट्यानें दोन अडीच वर्षें लढाई करून कधीं ही अपयश न घेतां आस्ट्रियाचा समाचार घेतला आहे. जर्मन लोकांनीं आपली फौज प्लेझो— टॉलमिनोपाशीं आणून ठेवल्याची खबर इटालियनांना वेळेवर न मिळाल्यानें तूर्त त्यांची धांदल उडाली आहे येवढेंच; इटालियन सेनापति कार्डोना हे लेचेपेचे नाहींत. आयसोन्झोच्या रणभूमीवर त्यांनीं या पूर्वींच आपलें नांव गाजविलें आहे. शिवाय इटलीला मदत करण्यांत मित्रराष्ट्रांनीं ही तत्परता ठेविली आहे. फ्रान्समधून व्हेनिसपर्यंत कुमक येण्यास थोडासा दिनावधि लागेल त्याला निरुपाय आहे. पण हा काळ इटालियन लोक धैर्यानें कंठतील. अमेरिकेनें ही इटलीला मदत करण्याचें ठरविलें आहे. ही बातमी ऐकूनच इटलीला मोठा हुरूप येईल.

### पश्चिम रणक्षेत्र.

या रणक्षेत्रांत खळबळ उडविण्यासारखें गेल्या आठवड्यांत जरी कांहीं घडलें नाहीं, तरी ब्रिटिश, फ्रेंच व बेलजियन शिपाई आपली कामगिरी उत्कृष्ट प्रकारें बजावीत आहेत, शत्रूंचे खंदक घेत आहेत, त्यांतून त्यांना हुसकावून लावीत आहेत, त्यांचे हल्ले परतवीत आहेत, आणि शत्रूच्या रेल्वे स्टेशनांवर आणि कारखान्यांवर बांबचा वर्षाव करून शक्य तेवढा नाश करीत आहेत. म्यूज नदीच्या उजव्या तीरावर फ्रेंचांचा तोफखाना शत्रूच्या तोफखान्याला चूर बसावयास लावीत आहे यिप्रेस कडे ब्रिटिशांची चढाई जशी चालू आहे, तशी एस्नेच्या उत्तरेस फ्रेंच बहादुरी करीत आहेत. सर्व बाजूंनीं मित्रराष्ट्रांनीं शत्रूला सतावण्याचा प्रयत्न चालू ठविला आहे. फ्रान्समध्यें अमेरिकन सैन्य उतरून बरेच दिवस झाले असतां अजून त्यांचा पराक्रम कोठें वाचण्यास मिळत कसा नाहीं? असा प्रश्न कित्येक उतावळे विचारीत असतात. अमेरिकेनें गेल्या पंनास वर्षांत कोठें ही लढाई केली नसल्यामुळें शांततेच्या काळांत ते क्षात्रधर्माला थोडेसे अपरिचित झाले आहेत ही गोष्ट हे लोक ध्यानांत घेत नाहींत. अमेरिकन सैन्य सध्यां लष्करी शिक्षण प्रत्यक्ष रणभूमीवर राहून घेत आहे व त्यांतून तयार झालेल्या लोकांना नुकतें कोठें प्रत्यक्ष लढण्याचें काम देण्यास सुरवात झाली आहे, आणि उमेद आहे कीं अमेरिकन लोकांची तीव्र ग्रहणशक्ति, चपळता, आणि व्यवस्थितपणाच्या संवयी या गुणांच्या जोरावर ते लोक आपला प्रभाव रणक्षेत्रावर लवकरच दाखवितील.

---

### रशियाची स्थिति.

रशियाला दुर्दशेनें पूर्णपणें ग्रासिलें आहे. त्यांच्या मागची साडेसाती अद्याप सुटली नाहीं. तूर्त जर्मन लोकांची तिकडची चळवळ गेल्या आठवड्यांत बंद होती. पण अंतःस्थिति बाह्यशत्रूपेक्षांही ज्यास्त हानिकारक आहे. सोशियालिस्ट लोकांचें वर्चस्व कमी होऊन लोक कांहींसे शुद्धीवर आलेले दिसत आहेत ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट आहे. नॉन–सोसियालिस्ट लोकांचें एक कॉन्फरन्स मास्को येथें नुकतेंच भरलें होतें, आणि त्यांत असें ठरलें कीं राजकीय प्रश्नांतले मतभेद बाजूला ठेऊन सरकारनें सैन्याची पुनर्रचना करावी, त्यांत शिस्त पुनः प्रस्थापित करावी, जेथें बंडाळी अद्याप चालू असेल तेथें लष्करी कायद्याचा अंमल सुरू करून लोकांवर दरारा बसवावा व सोसियलिस्टांचीं मनें वळवून त्यांची सहकारिता मिळविण्याचा नाद सोडावा. रशियानें वेगळा तह करण्यास तयार व्हावें या गोष्टीचा जिकडे तिकडे निषेध होत आहे. हीं सगळीं आशादायक चिन्हें आहेत यांत शंका नाहीं. या अंतःस्थ मतभेदामुळें व शिस्तीचा पूर्ण लोप झाल्यामुळें रशियाच्या सैन्याचा जो अजीबात लोप झालेला दिसत आहे तो सर्वांना अतिशय दुःखद वाटत आहे व मतभेदाचें किंवा आपापसांतील वैमनस्याचें निर्मूलन करण्यासाठीं निरनिराळ्या प्रादेशीक लोकांच्या निरनिराळ्या तुकड्या करण्याच्या तत्वावर रशियन सैन्याची उभारणी करण्याचा तेथील सरकारानें विचार केला आहे, व अराजकता मोडण्यासाठीं पुष्कळ शहरांतून व गांवांतून लष्करी कायदा जाहिर करण्यांत आला आहे.

कौंसिलांतल्या जहाल प्रतिनिधींस मॉ० केरेन्स्की यांचें धोरण अगदीं नापसंत आहे. त्यांनीं त्यांच्यावर आपला विश्वास नाहीं अशा अर्थाचा ठराव पास केला आहे. अर्थात् केरेन्झस्की यांना त्या कौंसिलांतल्या आपल्या जागेचा राजीनामा द्यावा लागला आहे. याचा अर्थ रशियांतल्या बहुतेक सर्व लोकांना ते नको आहेत असें मात्र समजण्याचें कारण नाहीं. केरेन्स्की यांना अतिशय जबरदस्त विरोधाला तोंड द्यावें लागत आहे ही गोष्ट खरी आहे, तरी पण सध्याच्या परिस्थितींत सर्व विरोध बाजूला सारून राज्यकारभाराचें तारूं सुखरूपपणें पैलतीराला नेण्याची धमक त्यांच्या इतकी दुसऱ्या कोणांत ही नाहीं हें त्यांचे शत्रुसुद्धां कबूल करीत आहेत. कोसाक हे लढाऊ लोक आहेत. त्यांचा तर रशियांत स्थापन झालेली लोकसत्ता तशीच कायम टिकून राहील असें करण्याचा कृत संकल्प आहे. ते मॉ० केरेन्स्की यांना पूर्ण पाठबळ देतील. शिवाय मॉस्को येथील व्यापारी व कारखानदार यांच्या रास्त मागण्या कबूल करून त्यांना ही आपले बाजूस वळविण्याचें शहाणपणाचें धोरण मॉ० केरेन्सकी यांनीं स्वीकारलें आहे. तेव्हां ते हळूं हळूं लोकप्रीति संपादन करून राशीयांत शांतता स्थापित केल्यानंतर शत्रूचा यथेच्छ समाचार घेतील अशी मोठी उमेद वाटूं लागली आहे.

## इतर बातम्या.

चीनमधील गडबड अद्याप चालूच आहे. तेथील लोकपक्षाचे जहाल पुढारी सन्यत्सेन यांनीं चीनमध्यें लष्करी अंमल चालू केल्याबद्दल तेथील सरकारानें त्यांना पकडण्याचा हुकुम फर्मावला आहे. पण ते हातीं लागतील तेव्हां खरें. चीनांत लोकसत्ता स्थापित झाली, तेव्हां कांहीं काळ पर्यंत हे तेथें प्रेसिडेंट होते. १८९६ सालीं हे लंडनमध्यें पकडले गेले होते, पण ब्रिटिश सरकारच्या मध्यस्थीनें सुटून १९११ पर्यंत अज्ञातवासांत राहिले. पुढें लोकसत्ता स्थापित झाल्यावर ही त्यांच्यावर बंडखोरपणाचा आरोप आला होता; पण बचावले. आतां पुनः त्यांचेवर संकट आलें आहे.

आयर्लंडमधल्या सीनफेन पक्षाचा पुढारी टॉमस ॲश याच्या मरणानिमित्त त्या लोकांची मिरवणूक निघाली होती. ते वेळीं पोलिसांचे अंगावर त्यांनीं दगड फेकले. पोलिसांनीं ही त्यांच्यावर गोळ्या झाडून कांहींना जखमी केलें.

अमेरिकेनें काढलेल्या लिबर्टी लोन नांवाच्या कर्जाच्या दुसऱ्या हप्त्याचे वेळीं ३० कोट डॉलरचें कर्ज पाहिजे होतें. पण तें ५० कोट डॉलर मिळाले.

अमेरिकेंत खाद्य द्रव्याच्या संरक्षणासाठीं जोराची चळवळ चालली आहे.

## मंगल ग्रंथी

( उदारचरित त्रयींची जयंती. )

गेला सोमवार म्हणजे आक्टोबर १ ही तारीख तिघा राष्ट्रवीरांच्या वाढदिवसाची होती आणि त्या मंगल दिवसाच्या निमित्तानें शहरोशहरीं अभिनंदनाच्या सभा भरल्या होत्या. डॉक्टर सर सुब्रह्मण्य आयर यांच्या ७६ व्या वर्षाला, श्रीमती बिझांट देवी यांच्या ७१ व्या वर्षाला व सत्याग्रहाचे पुरस्कर्ते राजश्री गांधी यांच्या ५० व्या वर्षाला या तारखेस प्रारंभ झाला आहे. आकोल्याच्या त्या दिवशींच्या सभेंत राजश्री मोरोपंत परांजपे, वासुदेवराव चिपळूणकर, विनायकराव राजवाडे व नामदार राजश्री रामभाऊ महाजनी यांनीं आपापल्या भाषणांत वरील तिन्ही वक्तयांचे जे राष्ट्रावर उपकार झालेले आहेत त्यांचें स्मरण देऊन त्यांच्याच पुण्यप्रतापाच्या प्रकाशांत भावी मार्ग कसा सुखसेव्य होईल हें उत्कृष्ट प्रकारें सांगितलें. सार्वजनिक कर्तव्याविषयीं ही संप्रतची जागृती पाहून कोणाही सहृदय मनुष्याच्या नेत्रांतून प्रेमाश्रु वाहिल्यावांचून राहणार नाहींत.

## ऐक्याची ध्वजा.

कलकत्त्याच्या स्वागत कमिटीमध्यें जी विलक्षण फूट व दुही माजली होती व जिला मुंबईच्या कांहीं मंडळींनीं जोर आणला होता ती सर्व राष्ट्रभक्तीच्या खऱ्या प्रेमरसानें एकदम लयास गेली आणि तारीख ६ च्या ऑल इंडिया कांग्रेसच्या अलाहाबाद येथील समेला अध्यक्ष निवडण्याचा प्रश्नच राहिला नाहीं. ही गोष्ट इंडियाच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्या सारखी आहे. रायबहादुर वैकुंठनाथ सेन हे तपोनिधी स्वागत कमिटीचे अध्यक्ष व श्रीमती बिझांटबाई याच राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष होतील ही एकच शुभवार्ता सर्वांचीं अंतःकरणें आनंदमय करून सोडील.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान.**--टोकियो शहरीं ज्या अश्रुतपूर्व तुफानानें लक्षावधि लोक गृहहीन होतात त्याच तुफानाची मंद होत चाललेली लाट आमच्या देशांतही पर्जन्याचा अतिरेक करीत आहे कीं काय नकळे! सध्या पावसानें त्राहि त्राहि करून सोडलें आहे. एकंदर पाणी २८ इंचावर झालें, हवेंतली गर्मी, आकाशांतलीं अभ्रें व सूर्यास्ताच्या वेळचे क्षितिज वर्ण हीं पर्जन्याचा जोरच दाखवितात. पिकांची व मनुष्यांच्या शरीरांचीं आरोग्यें अर्थात् कमी समाधानकारक आहेत.

**प्लेग.**—आकोलें शहरीं उंदरांचा सुळसुळाट अधिक दिसतो व प्लेगाचे तुरळक मृत्यूही झाले. गेल्या २९ सप्टेंबर अखेर च्या सप्ताहांत आकोला, बार्शीटाकळी, वाशिम कारंजा, पातूर, बाळापूर, मूर्तिजापूर व इतर खेडीं मिळून २७७ प्लेगाचे मृत्यू झाले. उमरावती जिल्ह्यांत उमरावती, बडनेरा, मोर्शी, चांदूर, मंगरूळ व इतर खेडीं मिळून हेंच मृत्यूचें प्रमाण १३३ होतें. यवतमाळ जिल्ह्यांत २९ मृत्यु असून यवतमाळ व दिग्रस येथें प्लेगाचा जोर आहे. बुलडाणे जिल्ह्यांत प्लेगाचा आजार सौम्य असून एकंदर मृत्यु ३२ आहेत.

लेफ्टनेंट कर्नल टी सी. ब्राक्डन रजिस्ट्रेशन खात्याचे इन्स्पेक्टर जनरल यांस ९ महिन्यांची फर्लो व हक्काची रजा देण्यांत आली आहे.

रा. रा. दत्तात्रय बासुदेव गोखले ऑफिशिएटिंग इन्स्पेक्टर रजिस्ट्रेशन खातें पश्चिम वऱ्हाड यांस चालू महिन्यापासून त्याच जागीं कायम करण्यांत आलें हें कळविण्यास आनंद वाटतो.

रा. रा. भूपेंद्रनाथ घोष सबार्डिनेट जज्य यांची रजा संपतांच ते बुलडाणे येथील कोर्टावर दाखल होतील.

रा. रा. दामोदर अनंत गडबोले आफिशिएटिंग डेपाटि इन्स्पेक्टर वाशीम यांस आकोट रेंजला बदलण्यांत आलें.

रा. रा. गोपाळ सदाशिव सप्रे मुनसफ यांस उमरावतीस नेमण्यांत आलें.

नोवेंबर तारीख १ रोजीं व त्यानंतर ७ तारखेपर्यंत डिपार्टमेंटल परीक्षा नागपुरास होतील.

**युद्धकर्ज**—मध्यप्रांत व वऱ्हाड मिळून २०७६६४७६ एवढी रक्कम वॉरलोनकडे २९ सप्टेंबर पर्यंत जमा झालेली आहे. या पैकीं पोस्टाकडील कर्जरोखे १३१-८६२७६ रुपयांचे आहेत.

**त्रोटक योजना** — वारलोनचीं पोस्टल सर्टिफिकिटें दाखल केलीं असतां पोस्ट ऑफिस पैसा चुकविते असें सरकारांतून जाहिर झाल्याबरोबर पोस्ट ऑफिसाकडे कांहीं लोक गैरसमजुतीनें पैशाची मागणी करण्याला जातात. ज्यांनीं युद्धकर्ज दिलें आहे त्यांनीं आपलीं कर्जें परत मागूं नयेत. गरीबीच्या अनिवार्य कारणासाठीं आणि पोस्टल सर्टिफिकिटांचा दुरुपयोग होऊं नये म्हणून पैसे परत देण्याची सरकारनें योजना केली आहे. ही त्रोटक व्यवस्था आहे हें कोणी विसरूं नये.

**आभार.**--मध्यप्रांताच्या सरकारनें श्रीमती बिझांटबाईच्या संबंधाची आपली बंदी काढून घेतली याबद्दल सर्व प्रांत त्यांचा ऋणी आहे, आणि पुढील आठवड्यांत बाईची स्वारी नागपूर मार्गानें मुंबईला जाणार आहे तेव्हां सहजीच दर्शन लाभ होईल.

**पैसाफंड:**— माहे आगष्ट व सप्टेंबर मधील पैसा फंडाची पोंच.

| माहिना | जमा |
|---|---|
| आगष्ट | ९।।=।।। |
| सप्टेंबर | २२।-।।। |
| | ३२८८।। |

या पैकीं ।- ( पांच आणे ) रा. अभ्यंकर वकील यांजकडून आलेले असून बाकीची रक्कम रा. रत्नाकर यांनीं फंडाची पेटी फिरवून जमा केलेली आहे.

## नोटिस

नोटीस बेशमी सिताराम आत्माराम पाटील मुक्काम वर्धा

यांसः—

खालीं सही करणाराकडून नोटीस देण्यांत येते कीं, मुक्काम नागपूर येथें तारीख १२।८।१७ रोजीं तुह्मी आमचे जवळून ६० रुपये साठ उसणे घेतले. घरी गेल्यावर लवकरच रुपये आणून देतो ह्मणून ह्मणाले; परंतु आपण रुपये आणून दिले नाहींत. आह्मी नागपूर येथें तुमची पुष्कळ वाट पाहिली. शिवाय जानेफळाहून ही रुपये पाठविण्यासंबंधानें ता० ३१।८।१७ व १२।९।१७ रोजीं दोन पत्रें पाठविलीं. आपण रुपये ही पाठविले नाहींत व पत्राचा जबाब ही दिला नाहीं. करितां या नोटीसीनें कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत रुपये ६० व्याजासह व नोटीसीचे खर्चासह मानिआर्डरनें पाठवावे. न पाठविल्यास रितीप्रमाणें कोर्टांत दावा करून रुपये ६० साठ व्याजासह आणि कोर्टाच्या व नोटीसीच्या खर्चासह वसूल केले जातील. कळावें ही नोटीस ता० ३।१०।१७ इ.

सही

कोंडापा तुकाराम आपा मिटकरी
दुकान जानेफळ द. खुद.

नो० नं० ४२४

## जाहीर नोटीस

नोटिस बेशमी मुक्ती मर्द संपत रा. उंद्री ता. चिखली जि. बुलडाणा हलीं रा. दिवठाणे ता. खामगांव जि. बुलठाणा मी जाहीर नोटीस देते ऐसाजे कीं माझा नवरा मरून सरासरी चार महिने झाले. त्याचा कोणी सख्खा वारस नसल्यामुळें मी दिवठाणे येथें आले व बळीराम वा।। दर्याजी यांचा वडील मुलगा नामें दौलत यांच्यापाशीं मी गंधर्व विवाह भाद्रपद वा।। १० रोज बुधवारीं करणार आहे. माझ्यावर कोणाचा हक्क नाहीं. गंधर्व लागल्यावर दौलत हे माझे सर्वस्वी धनी होतील व त्यांनीं केलेली आज्ञा मी मान्य करीत जाईन. या गंधर्व लावण्याचे कामांत कोणी आडवळा आणूं नये. आणल्यास त्यास मी जबाबदार धरीन. कळावें. ता. ७।१०।१९१७ दस्तुर उमरावसिंग वा।। गुलाबसिंग द० खुद रा. दिवठाणे

सही

मुक्ती मर्द संपत नि।। खु० आंगठा

नो० नं० ४२१

## नोटीस.

विद्यमान सब जज्ज साहेब यांचे कोर्ट मु॥ खामगांव

स. स. नं. १० सन १९१७

अर्जदार

१ भुलाबाई }
२ बनाबाई } मर्द दलवा पाटील राहणार पिंपळगांव ता. खामगांव

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, दलवा वा परसराम पाटील हे ता० ६।१२।१९ रोजीं पिंपळगांव ता. खामगांव मु॥ मयत झाला त्यास पुत्र संतान नसल्यामुळें व अर्जदार नं. १-२ ह्या त्याच्या बायका असल्यामुळें त्यांनीं असाम्याकडून कर्ज वसूल करून घेण्या करितां या कोर्टांत अर्ज दाखल केला आहे. तरी या बद्दल विरुद्ध पक्षकार गंगाबाई मर्द परशराम पाटील रा. पिंपळगांव नाथ ता. खामगांव पुतळाबाई मर्द सुकदेव कुणबी रा. ढोरपगांव ता. खामगांव शंकर वा दवलत पाटील रा. पिंपळगांव नाथ व इतर कोणास या सर्टीफिकेट मिळण्याबद्दल तक्रार करणें असल्यास त्यांनीं नेमलेल्या तारखेस ह्मणजे १०।११।१७ रोजीं या कोर्टांत स्वतः येऊन हजर राहावें. आज ता. २८।९।१७

सही
R. M. Wathodkar
Sub Judge
Khamgaon

नो० नं० ४२३


## अनुभवानें खात्री



पटेल !! जर आपणास आपले हारमोनीयम अगदीं वाईट स्थितींतील नव्या प्रमाणें माफक दरांत दुरुस्त करून घेणें असेल तर आजच खालीं लिहिलेल्या पत्यावर व्यवहार करा. अनुभवानें खात्री पटेल. शिवाय नव्या पेट्या आमचे जंगी कारखान्यांत ऑरडर प्रमाणें अडव्हान्स आल्यास तयार मिळतात. त्याचे दर–हात पेटी सिंगल रीड २० ते २९
" डबल रीड ३०-३५-४०-५०
तीनलाइनी क्याझरेल सूराची किं. रु. ९५.
पाय पेटी सतक ३। ६० ते ८० रु
" " " ३॥ ८५ ते ९९ रु.
" " " ३॥। १०४-११९ रु)
" " " ३॥। तीन लाइनी क्याझरेल सुराची १८० ते २१० रु.

पत्ता—रामचंद्र बोसनसा हार्मोनियम मेकर व रिपेअरर नांदुरा जि० (बुलडाणा

नो. नं. २८४

अंगुरी

# हिंग.

पवित्र आणि अस्सल १४८ उत्तम कस्तुरी ३५, शुद्धशिलाजीत ४८ सुर्मा ममीरा ३ तो. अंगुरी हींग २१, सुगंधित जीरा १८ कागजी बादाम ४५ पैंड, सेवाचा मुरब्बा २ पौं. टिन १।

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५

नो० नं० ९

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विक तावडतोब दूर होतात किं रु. १४८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुनळी, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरळी लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

Dr. H L. Batliwala
Sons & Co. Ltd.
N. N. 6 Dadar Bombay

# लक्षांत ठेवा.

कीं येथें आमचेकडे कमिशनचे (अडतीचे) काम चालत असून आम्ही येथें मिळणारा कापड, किराणा, स्टेशनरी, कांचसामान, दळण्याच्या गिरण्या **जीन व प्रेसचें सामान** वगैरे वगैरे सर्व प्रकारचा माल माफक कमिशन घेऊन भावाची पूर्ण चौकशी करून पाठवितो. व बाहेर गांवाहून विक्री करितां आलेला माल विकून देतो तसेच सायकल, व सायकलला लागणारे सर्व सामान मोटारचे व घोडे गाडीचे गायांचे कापड, व दुसरे लागणारे सामान, खिशांतील विजेचे दिवे, व दुसरे विजेचे सामान, स्टांपस् वगैरे तेल पुरवितो. एकवेळ आरडर देऊन

कामाचे चोखपणाबद्दल खात्री करून घ्या.

डब्ल्यु. व्ही. पिंगळे आणि सन्स

पत्ता— ठाकुरद्वार रोड, काळकादेवी पोष्ट मुंबई नंबर २

नो. नं. ३९८

## गरीबांस फुकट

# रामबाण मलम

(कोणत्याहि त्वग्रोगावर)

गुणकारी किं. ६ आणे.

# केशनाशक पूड.

(५ आणे)

(क्याटलॉग फुकट) पत्ता. व्ही. आर. मुळे नांदुरा. G. I. P.

नो० नं० ३७०

## रोल्डगोल्ड सोन्याचे

**कधींच काळे न पडणारे दागिने**

चंद्रहार किं. रु. ३-४; गोट जोडी २-२॥; पाटल्या जडी २-२॥; वज्रटीका ३-४; ठुशी ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली ४-५. शिंप्याचें मोतीं ल्हान मोठें वाटेल तसें. साची २-३-४; अंगठी १; मळे अष्टपैलू जोडी १॥ बांगड्या जोडी २-२॥. सरी ४

**केंस काळे करण्याचा साबण.**

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केंस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाकसची किं. १॥ रु.

पत्ता— मगनलाल के आणि कंपनी गिरगांव– मुंबई

नो० नं० ५

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखाना:—मुर्डी.

**मदनामृतसंजीवनी.**

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भासंबंधी मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट परमा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व मिष्टान्न भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ६ आणे पडेल दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १५५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें पडळ, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगांस हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना परमा व तज्जन्य दाह तीडक, मुत्रांची लाली, संकोच, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकत जाते. असें रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १ भार २ रु० सर्व औषध व्ही० नें पाठवू.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत यशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, थोक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमा कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं. माल मागविण्याचा पत्ता—

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी, पो० हर्णे, जिल्हा रत्नागिरी

नो० नं० २२


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

## मुख्य प्रधानांचें महत्वाचें भाषण.

ता. २९ रोजीं पार्लमेंटांत मि. लॉईड जॉर्ज यांचें एक महत्वाचें भाषण झालें. ब्रिटिश फौज व आरमार यांनीं केलेल्या अपूर्व कामगिरीबद्दल त्यांचे आभार मानतांना त्यांनीं हिंदुस्थानानें राजनिष्ठापूर्वक दिलेल्या अप्रतिम साह्याचा ही गौरवयुक्त शद्बांनीं उल्लेख केला, आणि युद्ध संपल्यानंतर सरकार हिंदुस्थानाला विसरणार नाहीं असें पुनः एकदां आश्वासन दिलें. तथास्तु!

## शारदोत्सव.

गेल्या २८ सप्टेंबरच्या मुर्तिजापूर येथील हिंदू मुसलमानांच्या मोठ्या जाहिरसभेनंतर मुर्तिजापुरांत हा श्रीशारदोत्सवाचा समारंभ ४ दिवस ह्मणजे ता० २१-२२-२३ व २४ आक्टोबर रोजीं हनुमान मंदिरांत मोठ्या थाटानें झाला. मुर्तिजापूरच्या वेदशास्त्र शाळेचा हा २२ वा समारंभ असून पहिल्या दिवसापासून श्री शारदेची प्राणप्रतिष्ठा मंत्रजागर, विद्यार्थ्यांचें चर्चा पुराण संस्कृत मराठी व्याख्यानें यांनीं चाऱ्ही दिवसांचा क्रम अगदीं शोभायमान झाला होता. शेगांवच्या श्री मोटे यांच्या वेदशाळेचे अध्यापक वे. शा. राजश्री दामोदरशास्त्री हे आपल्या विद्यार्थी समूहासह हजर असून त्यांनीं गुरुसेवेचे रहस्य संस्कृतांत सांगितलें. वे. राजश्री महादेवशास्त्री यांचें आश्रम धर्मावर तसेंच वे. राजश्री बापू शास्त्री यांचे हिंदुधर्मावरील व्याख्यान व वे. जगन्नाथ शास्त्री उगवेकर यांचें व्याख्यान विद्यार्थ्यांचीं उत्साहपर भाषणें हीं ऐकून श्रोतृसमाज फार आनंदित झाला गावांतील आश्रयदाते श्रीमंत नाना साहेब जमादार, इतर सहाय्यक मंडळी व सरकारी अधिकारी यांच्या परिश्रमानें हा महोत्सव मुर्तिजापुरास फार वर्णनीय असा झाला.

## जयश्री.

### ( मित्रसमाजाचा धन्यवाद. )

येथील मित्र समाजाच्या आश्रयाखालीं भरलेल्या टेनिस टुर्नामेंटच्या अखेरीला सर्व पाहुणे मंडळीस फळाहाराची मेजवानी देण्यांत आल्यानंतर रा. रा. काशिनाथ श्रीराम जठार यांच्या अध्यक्षतेखालीं आदितवारीं रात्रीं बक्षिस समारंभ झाला. मित्र समाजाचे प्रेसिडेंट रावबहादुर वासुदेवराव ढोबळे यांनीं बाहेरगांवाहून आलेल्या पाहुण्याच्या खेळगड्यांचें नामनिर्देशासह कौशल्य वर्णन केलें. आणि अशा टुर्नामेंटच्या वीरश्रीमध्यें मलकापूरचे राजश्री सोमण वकील यांच्याकडे बोट करून वृद्ध हीं कसे तरुण होतात आणि जबलपूरचे राजश्री चौधरी सारखी तरुण तरुण मंडळी कितीतरी गोंडस व पाणीदार दिसतात, तसेंच जबलपूरचे बाल राममूर्ती राजश्री शमशुल हक यांच्या अद्भुत शक्तीचे प्रयोग सुवर्ण पदकांना कसे पात्र होतात हें त्यांनीं सांगितलें. त्यानंतर नागपूरचे राजश्री ब्रह्मराक्षस पेन्शनर ए. अ. कमिशनर यांनीं पाहुणचाराची श्रमिती वर्णन केली. आणि खेळांच्या या आनंदांत शरीर संपदा कशा अप्रतिम लाभतात हें सांगितलें. त्यानंतर राजश्री भाऊ साहेब परांजपे यांनीं आपल्या प्रेमळ, उत्साहाच्या व विनोदमय भाषणांत मोठी मौज केली. अलंकार शास्त्रांतील निदर्शना, वक्रोक्ति व्याघात इत्यादि अलंकार श्रोता या भाषणांत सरसतेनें साहजीक शिकेल. नंतर राजश्री जठार यांनीं सर्वांचें अभिनंदन करून डॉ. डी. सिन्हा मित्रसमाजाचे मोठे उत्साही जोमदार व गुलाबी गोडीचे सेक्रेटरी यांस टुर्नामेंटचा सुवर्ण रौप्य पेला अर्पण केला व सुमारें दीडशें पाहुणे खेळगड्यांवर जयश्री संपादणारे राजश्री दस्तूर बॅरिस्टर व महिपतराव देसाई व तसेंच राजश्री अनंतराव नरगुंदकर व काणे वकील यांस त्यांच्या त्यांच्या उच्च—लघु मानाप्रमाणें ४ पेले बक्षीस दिले. एवंच येथील मित्रसमाजाची ही विजयश्री पाहून या टुर्नामेंटला द्रव्यबळानें मदत करणारी येथील शेट सावकार मंडळी व आपल्या सुंदर आगमनानें शोभा आणणारे थोर थोर स्त्री पुरुष आकोलकरांची वाहवा सांगत सांगत व भावी खेळांचे संकेत ठरवीत घरोघरीं गेले.

## सहानुभूती.

### ( पालक वर्गाची संघशक्ति )

सर बेंजामिन रॉबर्टसन यांनीं नागपूर येथील बंद पडलेल्या शाळा व कॉलेजें यांच्या विषयीं दुःखोद्गार काढले असून विद्यार्थ्यांचा समूह कांहीं वक्त्यांच्या व पत्रकारांच्या विचारशून्य उच्चवादाला बळी पडून शिस्तीपासून कसा प्रस्खलन पावत चालला आहे व प्रस्थापित अधिकाराला कसा तृणसम लेखून विषवृक्षाचीं फळें तोडूं लागला आहे हें पालकवर्गाच्या दृष्टीस आणण्यासाठीं त्यांनीं मुद्दाम एक जाहिरपत्रिका काढली आहे. समाजांतील जबाबदार व संस्कृत मनाच्या मंडळींनीं पितृवर्गाला व पालकवर्गाला योग्य ती मदत देऊन सरकार व शिस्त याची नीटशी कल्पना घालून दिल्यास पुष्कळसे पराङ्मुख झालेले विद्यार्थी पुनः चांगले सुवरण्यासारखे आहेत, तेव्हां या प्रसंगीं लोकांनीं चांगली मदत करावी ह्मणून सर बेंजामिन आपली आशा प्रदर्शित करीत आहेत. ईश्वर करो, ही आशा लौकर सफळ होवो आणि सरकार व लोक यांचीं मनें पुनः प्रेममार्गी होऊन रिस्ले गुलाबाचे काटे काढून टाकले जावोत!

## हितशत्रूंची निराशा

हिंदु व मुसलमान यांच्यांत झालेली एकी वरकरणी असून वस्तुतः त्यांच्यांत तीव्र विरोध आहे असें पायोनियर सारखीं आंग्लो इंडियन पत्रें ह्मणत आहेत, व यंदा दसरा आणि मोहोरम हे सण एकाच दिवशीं आल्यामुळें हिंदुस्थानांत कोठें तरी दंगा होऊन आपलें ह्मणणें खरें ठरेल व आपगास टिऱ्या बडविण्यास मिळेल अशी हिंदुस्थानच्या या हितशत्रूंना मोठी आशा होती. पण हिंदु व मुसलमान जातींच्या पुढाऱ्यांनीं मोठें शहाणपणाचें धोरण ठेवून व कित्येक ठिकाणीं तर हिंदूंनीं हार खाऊन कोठे ही दंगा होऊं दिला नाहीं हें पाहून प्रत्येक हिंदवासियास अभिमानपूर्वक आनंदच वाटत असला पाहिजे. हिंदु व मुसलमान या जातींत खरें सख्य झालें आहें कीं नाहीं याची खरी परीक्षेची वेळ हीच होती व या भयंकर दिव्यांतून दोन्ही जातीचे लोक यशस्वी रीतीनें पार पडले याबद्दल त्यांचें अभिनंदन करावें तेवढें थोडें आहे. बिचाऱ्या पायोनियरकर्त्या सारख्या पत्रकर्त्यांची मात्र मोठीच निराशा झाली आहे व त्यामुळें ते चिडून सख्य जुळवून आणणाऱ्या पुढाऱ्यांवर आणि मि. मांटेग्यु व मिसेस बिझांट यांचेवर तीं पत्रें अधिकच त्वेषानें तुटून पडत आहेत. चालू द्या ह्मणावें तुमची कोल्हेकुई. 'हाती चलत है आने गतिमें' ही हिंदी ह्मण यावेळीं अक्षरशः खरी ठरली आहे.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—आरोग्याचे विलास शिकविणाऱ्या या हेमंतऋतूच्या उत्कृष्ट अहोरात्री कापूस ज्वारी इत्यादि वनस्पतींना फलपुष्पांनीं पुन्हा श्रृंगारीत आहेत आणि उद्भवूं पहाणाऱ्या प्लेगाच्या गडबडीमुळें ही नवी वनश्री लोकांस आपोआपच पहाण्यास मिळूं लागली आहे. हल्लीं आकोल्यास १।२ कधीं २।४ प्लेगाचे मृत्यू होतात.

रा. रा. डी. जी. ऑर्चर्ड पोलीस सुपरिंटेंडेन्ट आकोला हे २ वर्षाच्या रजेवर जात आहेत व त्यापुढे ते पेन्शन घेतील. रा. ऑर्चर्ड यांच्या उत्कृष्ट कामगिरीचा उल्लेख वार्षिक रिपोर्टांतून नेहमीं होत असे. पण डेपुटि इन्स्पेक्टर जनरलची जागा मात्र त्यांच्या क्रमांत त्यांना देण्यांत आली नाहीं ह्मणून त्यांनीं हा रामरामच ठोकला आहे. चांगल्या बाणेदार चाकरीचा असा आशाभंग कोणास रुचेल बरें!

**स्तुत्य धर्मादायः**— रावसाहेब पुरुषोत्तम भगवंत देशपांडे एलिचपूर यांनीं सौ. रॉबर्टसन व सौ. स्टँडन यांच्या नांवानें अनुक्रमें ६ व ५ रुपयांच्या दरमहच्या शिष्यवृत्ती देण्यासाठीं कांहीं जमीन देण्याचा संकल्प केला आहे. या देवी थोर कीं रावसाहेबी अंतःकरण थोर?

**दसरा—मोहरम**—हे दोन्ही सण आमच्या वऱ्हाडात हिंदु मुसलमानांच्या ऐक्यानें मुखसेव्य झाले ही आनंदाची गोष्ट होय. येथील श्रीरामरंग मंदिराच्या पुढून ताबुत जात असतांना कांहीं थोडी अल्लड वृत्ती दिसून आली पण प्रौढ मुसलमान बंधूच्या सल्ल्यानें पोलिस व मॅजिस्ट्रेट यांनीं सर्व प्रकार सुरळीत तडीस नेला.

**'हाच तो मुलाचा बाप'**—लोकमान्य नाटक मंडळी'चा हा आवडता लोकप्रिय प्रयोग गेल्या शनिवारीं करण्यांत आला. संगीतानंतर हीं गद्य नाटकें अभिरुचीला पालट पाडतील.

**मॅांटेग अर्ज**—वऱ्हाडतर्फे पाठविण्याच्या अर्जावर लोकांच्या सह्या घेण्याचा ठराव जाहिरसभेंत मंजूर होऊन ती कामगिरी नेटानें चालू आहे.

**केंद्रीकरण**—खामगांव, वाशिम. व मंगरूळपीर येथील कोर्टांचे दिवाणी अधिकार एक हजारपर्यंत ठेवून त्या पुढील दावे आकोल्यास चालावे असा नवा हुकूम झाला आहे. हा हुकूम लोकांच्या गरजाकडे न पाहतां निघालेला असून त्यामुळें पक्षकारांस साक्षी भरण्याचा खर्च भलताच पडूं लागेल व येरझारीखालीं तट्टूही व्यर्थ शिणून जाईल.

## नोटीस

नोटीस कलम ११ आक्ट ८ सन १८९० प्रमाणें.

कि. मुकद्दमा नंबर ९६ सन १९१७ इ.
विद्यमान डिस्ट्रीक्ट जज्ज साहेब यांचें कोर्ट
मुक्काम आकोला पश्चिम वऱ्हाड

नांव रावजी
बापाचें नांव आनंदा
जात राहणार भोकर
तहसील चिखली जिल्हा बुलढाणा
च्या अल्पवयी पुंजाजी वा। राणू कुणबी
उमर वर्षें १०-११
राहणार आकोला ता. आकोला तहसिलीचे (२) शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालनकर्ता (१) नेमला जाण्या विषयींच्या अर्जा संबंधीं—

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं सदर्हू अर्जदारानें सदर्हू अल्पवयीचें (२) शरीर व इस्टेट रक्षणकरण्यासाठीं पालन कर्ता नेमला जाण्या विषयीं अर्ज केल्यावरून सदर्हु अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख १५ माहे डिसेंबर सन १९१७ इ. रोजीं नेमिली आहे. त्यावरून अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदर्हू अर्जदाराच्या अर्जाबद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यांस जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हजर झाले पाहिजे; आणि त्यांस असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख २९ माहे १० सन १९१७ इ. रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्या निशीं दिली

सही
W. R. Dhobley
डि. जज्ज
पश्चिम वऱ्हाड
नो. नं. ४४५ आकोला

## नोटीस.

स. स. नंबर ११ सन १९१७
वि. सबजज्ज सा. खामगांव
यांजकडून
अर्जदार
बच्ची मर्द रामदयाल परदेशी राहणार खामगांव.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं वरील अर्जदार ईचा बाप दत्तु वा। बकतावर परदेशी रा. खामगांव हा तारीख १९-११-१५ रोजीं जळके तेल्याचे ता. खामगांव मुक्कामीं मरण पावला. त्यास अर्जदाराशिवाय कोणीही वारस नाहीं ह्मणून अर्जदारानें सक्सेशन सर्टीफिकेट मिळण्याबद्दल अर्ज केला आहे. तरी अर्जदारास सर्टीफिकेट कां मिळूं नये अशाबद्दल कोणास तक्रार करणें असल्यास त्यांनीं ता० १९[illegible] इ० रोजीं सब जज्ज खाम[illegible] यांचे १० वाजतां सकाळीं ये[illegible]
कळवें. आज ता० [illegible] चिखरकर पांडे
[illegible]मानी द. खुद
[illegible] नं. ४६४
[illegible]चा प्रयत्न [illegible]
[illegible]वादनीच्या नकाशा-

## नोटीस

जयवंता वलद पांडू वाघ कुणबी रा० मुंगसरी तालुका चिखली जिल्हा बुलढाणा यासीः—

नोटीस देणार भागु मर्द जयवंता कुणबी राहणार साखळी बु० तालुका चिखली नोटीस देते अशी कीं ; तुमचे मजशी लग्न लागण्यास अंदाज १८ वर्षे झालीं तेव्हा पासून तुह्मी मजला एक वेळ आपले घरीं अज्ञान असतांना नेले होते. १२ वर्षे पासून अजिबात नेले नाहीं. त्या मुळे माझें अन्नवस्त्रास मला दरसाल रु० २९ प्रमाणे १९ वर्षांचें रु० ३७५ माझा चुलता नामें देवराव विठोबा दांदडे कुणबी रा० साखळी बु० यांचें खर्च होऊन त्यांचें कर्ज झाले आहे. आतां उपवासी राहण्याचा प्रसंग आला आहे. १९ वर्षांपासून मजला नेऊन वागविण्याविषयीं बरेच लोकांनीं तुह्मांस ह्मटलें, व शिवाय तुमचें गांवीं पंच- शामा वलद यशवंता, कृष्णा वल्द रावजी माळी, नारायण जिरे माळी, बळवंता वलद महादु व पांडू वलद परशराम सर्वत्र राहणार साखळी बु० यांनीं मला तुमचें घरीं आणून नांदविण्याविषयीं बोलले व चांगला आग्रह केला परंतु तुह्मी इन्कार करून पंचाचे ही न एकेतां नांदवीत नाहीं. या वरून तुमची वागविण्याची इच्छा नाहीं. तेव्हां मला नवरा असतां विधवे प्रमाणे मी राहणें अयोग्य आहे. करितां ही जगजाहीर नोटीस दिली आहे तर ही नोटीस तुह्मास मिळाल्यावर आठ दिवसाचे आंत मला सोडचिठ्ठी ( फारकती ) देऊन मोकळे करावें. नाहीतर मी पंचानुमतें दुसरा घरठाव करीन. १९ वर्षांपासून तुम्ही मला नांदविण्यास नेलें नसून तुमचा मझा संबंध नाहीं. तेव्हां इं० पि० कोड कलम ४९४ या खालील अपवाद :- त्यांत नवरा अगर बायको ७ वर्षे सतत एकमेकापासून गैरहाजर राहून परस्परास खबर नसली व नंतर विवाह केला तर तो गुन्हां होऊं शकत नाहीं. यास्तव सदर्हू प्रमाणें खुलासा नोटीस दिली आहे तर मजला फारकती देऊन मोकळे करवे. नाहींतर मी दुसरा घरठाव करीन. मग तुमची कोणतीच तक्रार ऐकिली जाणार नाहीं. तें कळावें ता० २३-१०-१९१७. ई०

सही

भागु मर्द जयवंता निशानी आंगठा.

नो० नं० ४३८

## नोटीस.

तीर्थ स्वरूप मुक्ताकाकी जवजे भगाजी खानजोडे राहणार मौजे निजामपूर प्रगणे तालुके वाशिम जि. आकोला इनका —

खालीं सही करणार रा. मौजे निजामपूर प्रगणे रिसोड ता. वाशिम जि. आकोला यांजकडुन नोटिस देण्यांत येते कीं, माझा चुलता व तुमचा नवरा भगाजी पुंजाजी खानझोडे हा नुकताच मरण पावला आहे. आणि तुमचा अन्नवस्त्राचा हक्क मजवर असून तुमचे हयातीपर्यंत अन्नवस्त्र मजला देणें भागच आहे. पण तुह्मांस कांहीं एक कारण नसतां विनाकारणच आपले वडिलोपार्जीत मिळकतीचा माझेविरुद्ध दुरुपयोग करण्याचा उद्देश तुह्मी मनांत आणिला आहे हें चांगले नाहीं. उभयपक्षांस ही अहितकारक आहे. याचा विचार तुह्मी करावयास पाहिजे आहे. मयत भगाजी पुंजाजी यांजला पुत्र संतती नाहीं. तुह्मी त्याची विधवा स्त्री आहां. हिंदु धर्मशास्त्रात विधवेस स्थावर मिळकतीची विल्हेवाट कोणते ही प्रकारें करितां येत नाहीं. करितां आपले चरणापाशीं माझी विनयपूर्वक प्रार्थना आहे कीं, तुह्मी स्थावर आणि जंगम इस्टेटीची कोणते ही प्रकारें विल्हेवाट करूं नये अशी आग्रहाची आपले चरणापाशीं मी आगाऊ विनंती केली आहे. इतकेउपर आपण तसें केल्यास रितीप्रमाणें व्यवस्था करणें भाग होईल. सर्व मिळकत माझेच ताब्यांत आहे. मयताचा व तुमचा बेबनाव असल्यामुळें त्यानला तुह्मी सोडून गेल्यास अजमासे वीस वर्षे पूर्वी पासून तुह्मी मौजे बीबखेड येथें राहात होत्या. तुमचा नवरा भगाजी वारल्यानंतर त्यांचे तेरवा करितांच फक्त तुह्मी येथें आल्या. तुह्मी त्यानला सोडून गेल्या पासुन मयत भगाजी हे माझे एकत्रपणांत राहात होते. मयताचा दिवस ही मीच केला आहे, ज्याअर्थीं मयत भगाजी हा माझे एकत्रपणांत राहात होता त्याअर्थी सर्व मिळकत माझे मालकीची असून माझेच ताब्यांत आहे त्यामुळें तुह्मांस अन्नवस्त्रा खेरीज दुसरा कोणतेही प्रकारें अधिकार नाहीं. करितां तुह्मी कोणतेही प्रकारे इस्टेटीचा दुरुपयोग करू नये. इतकेंही करून केल्यास ते रद्द करण्याबद्दल रिती प्रमाणें व्यवस्था करणें भाग होइल कळावे . दस्तुर रंगनाथ तुकाराम खर्डेकर सही

कृष्णाजी नारायणजी खानजोडे नि० खु०

नो. नं ४३९ आंगठा

## नोटीस.

रा. रा. रामचंद मोतीलाल केला मारवाडी दुकान मलकापूर यांसः—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं, तुह्मी माझे अडतिये असून सन १९१६-१७ इ॥ चे हंगामांत तुमचे अडतींत एकंदर १०३ दोकड्यांचा रुईचा व्यापार मी केला असून पैकीं १८ बोंदरी रुई तुह्मास विकून बाकी मालाच्या गांठी ९७ बांधलेल्या तुह्मी आपले नांगनीं बुरुल कंपनी कडेस पाठविलेल्या मी तुमचे दिलेल्या पत्राप्रमाणें विक्री केली. नंतर मुंबईहून परत आलेवर कंपनीचे बिलाप्रमाणें हिशोब करून माझे खात्यांत तुमचेकडेस घेणें निघत असलेली माझी रकम मागितली असतां आपण कबूल करून माझे कडून कांहीं रकमा माझे खात्यांत थापेनें लिहून घेऊन रकम देण्यास नाकारलें. वरून आतां या नोटिशीपासून ४ दिवसाचे आंत तुह्मी घेतलेल्या बोंद्र्यासह हिशोब सराफी रितीप्रमाणें करून माझी घेणें निघत असलेली रकम व्याजासह मला चुकती करून माझी रसीद घेणें. तसेंच वर लिहिलेल्या ज्या रकमा तुह्मी मला थाप देऊन लिहून घेतल्या आहेत त्या व्यवहाराप्रमाणें योग्य असल्यास मला कबूल होतील. नाहीं तर त्या मला कबूल नाहींत ह्मणून समजावे. मी जबाबदार नाहीं. करितां माझा निकाल वरील मुदतींत न केल्यास आह्मास आमची रकम मिळण्याकारितां योग्य तजवीज करावी लागेल. आणि आमचे या नोटिशीचे खर्चासह होणारे खर्चाबद्दल आपण सर्वस्वी जबाबदार राहाल. कळावें. तारीख मजकूर दस्तुर ठाकूर मोहनसिंह रुपसिंह रघुवंशी मुख्त्यार खास. सही

राघो वा॥ महादु कुंभार झोडगेकर द. खु.

नो० नं० ४४०

## नोटीस

नोटीस कलम ११ आक्ट ८ सन १८९० प्रमाणें.

कि. मुकदमा नंबर ९७ सन १९१७ इ. विद्यमान डिस्ट्रीक्ट जज साहेब यांचे कोर्ट मुक्काम आकोला पश्चिम वऱ्हाड

नांव पर्वतराव
बापाचें नांव सखाराम
जात राहणार वल्हडा
तहसील आकोट जिल्हा आकोला
च्या अल्पवयी (१) शंकर धोंडू (२) तुळशीराम धोंडू
उमर वर्षे नं (१) १२ नं. (२) ८
राहणार वल्हडा ता. अकोट तहसिलीचे (२) शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालनकर्ता (१) नेमला जाण्या विषयींच्या अर्जा संबंधीं—

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं सदर्हू अर्जदारानें सदर्हू अल्पवयीचें ( २ ) शरीर व इस्टेट रक्षणकरण्यासाठीं पालन कर्ता नेमला जाण्या विषयीं अर्ज केल्यावरून सदर्हू अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख १९ माहे डिसेंबर सन १९१७ इ. रोजीं नेमिली आहे. त्यावरून अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदर्हू अर्जदाराच्या अर्जाबद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यास जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हजर झाले पाहिजे; आणि त्यांस असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख २९ माहे १० सन १९१७इ. रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्या निशीं दिली

सही
W. R. Dhobley
डि. जज
पश्चिम वऱ्हाड
आकोला

नो. नं. ४४१

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं माझा चुलता भगाजी पुंजाजी खानजोडे राहणार मौजे निजामपुर प्रगणे रिसोड तालुके वाशिम हा मरण पावला त्यानला पुत्रसंतती नाहीं. चुलती मुक्ताबाई जवजे भगाजी खानजोडे ही विधवा आहे, आणि ती आमचे स्थावर जंगम इस्टेटीचा दुरुपयोग करणार आहे असें समजते. मिळकत वडिलोपार्जित आहे. हिंदु धर्मशास्त्राप्रमाणें विधवेस स्थावर मिळकत गहाण किंवा खरेदी किंवा बक्षिस देण्याचा अधिकार मुळींच नाहीं. सदर्हू मयत भगाजी माझे एकत्रपणांत राहात होता सबब तीं फक्त अन्नवस्त्राची मालकीण आहे. तरी तिजपासून कोणी गहाण किंवा खरेदी किंवा बक्षिस वगैरे कोणते ही प्रकारचा दस्तैवज कोणी करून घेऊं नये. घेतल्यास त्या दस्तैवजातील मिळकत दस्तैवज करून घेणाराचे दस्तैवजाचे जबाबदारीस पात्र होणार नाहीं कळावें, तारीख १९-१०-१७ दस्तुर रंगनाथ तुकाराम खर्डेकर सही

कृष्णाजी नारायणजी खानजोडे रा० निजामपुर नि॥ खुद

नो. नं. ४४२

## नोटीस.

सिताबाई मर्द महादजी नवघरे रा० कारंजा हल्ली व. शहा ता० मुर्तिजापूर ईसः —

खालीं सही करणार इचे कडून कळविण्यांत येते कीं, तुमची ता० ४।१०।१७ ची नोटीस पावली. नोटिशींत केलेली विधानें भ्रामक असून अगदीं बनावट असले मुळें मला कबुल नाहींत. महादजी मेल्यानंतर चार मंडळी व विठु वा॥ संभाजी यांस बरोबर घेऊन तू घेऊन सर्व जंगम इस्टेट घेऊन गेली आहेस आतां माझे जवळ दागदागीनें वगैरे कांहींच राहिले नसून मी जंगम अगर स्थावर मालाबद्दल अगदी जबाबदार नाहीं. तुह्मी वाईट लोकांचे नादानें अज्ञानाचें नुकसान करित आहांत हें बरोबर नाहीं. माझे अन्न वस्त्राबद्दल ही नोटीस पावल्या पासुन ४ दिवसाचे आंत तजवीज करावी तसें न केल्यास रितशीर तजवीज करावी लागेल. कळावे या नोटिशीचा खर्च तुमचेवर आहे. ता० २३।१०।१७ इ.

द. के. बी. ताह्मणकर पि. रा.आकोला

सही

चंद्राबाई मर्द महादाजी तेली
रा. कारंजा पोहेवेशीजवळ नि. आंगटा

नो. नं. ४४३

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांस या जाहिर नोटीशीनें कळविण्यांत येते कीं मी. १९१६ सालीं चि. राजश्री रामनारायण यांस दत्तक घेतलें व त्याचें लग्न करून दिलें. अलीकडेस हा माझा दत्तक मुलगा मला न विचारतां माझे नांवें व किसन गोपाळ तेजमल यांचे नावानें कर्ज काढूं लागला आहे. वास्तवीक त्यांस असें करण्याचें कारण नाहीं व तसा अधिकारही नाहीं. तरी सदर्हू गृहस्थानें जी कांहीं अवास्तव देवघेव केली असेल तिजबद्दल मी अगर माझी जिनगी जबाबदार राहणार नाहीं. कोणी त्याला कर्ज दिल्यास मी तें देणार नाहीं. माझ्या हयातींत चिरंजीव रामनारायण यांस कारभार करण्याचा अधिकार व जरूरी नाहीं. माझी जिनगी त्यानें गहाण विक्री वगैरे नें दिल्यास तें रद्द समजले जाऊन देणेदाराच्या बोजास मी जबाबदार राहणार नाहीं. क. तारीख २९।१०।१७ इ.

सही ( मारवाडींत )
रामप्रताप सीताराम दस्तुर खुद
रा. कौठळ

नो. नं. ४४४

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

Regd-N. No150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१] आकोला—सोमवार तारीख १२ माहे नोव्हेंबर सन १९१७ ई० [अंक ४५

## जाहिरात

### मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

ता. १ जुलै पासून पुढें आणखी प्रसिद्ध होईपर्यंत व्याज दरसाल दर शेकडां ४ रुपये याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ नो नं १ Lyon Scott एजंट

## अनुभवानें खात्री



पटेल !! जर आपणास आपले हारमोनीयम अगदीं वाईट स्थितींतील नव्या प्रमाणें माफक दरांत दुरुस्त करून घेणें असेल तर आजच खालीं लिहिलेल्या पत्यावर व्यवहार करा. अनुभवानें खात्री पटेल. शिवाय नव्या पेट्या आमचे जंगी कारखान्यांत ऑरडर प्रमाणें अडव्हान्स आल्यास तयार मिळतात. त्याचे दर—हात पेटी सिंगल रीड २० ते २५

" डबल रीड ३० ३५-४०-५०

तीनलाइनी क्याझरेल सूराची किं. रु. ९५.

पाय पेटी सतक ३। ६० ते ८० रु.

" " " ३॥ ८५ ते ९५ रु.

" " " ३॥। १०४-११५ रु)

" " " ३॥। तीन लाइनी क्याझरेल सुराची १८० ते २१० रु

पत्ता—रामचंद्र वीसनसा हार्मोनियम मेकर व रिपेअरर नांदुरा जि० (बुलडाणा)

नो. नं. २८४

## जाहिरात

या लेखावरून कळविण्यांत येते कीं वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचें कलम ११६ (१) जे आणि ११६ (१) (२) या अन्वयें वाशीम म्युनिसिपालटीचें हद्दींत इमारतीची रचना आणि पुनर्रचना करण्याकरितां नियम आलिशान चिफ कमिशनर साहेब बहादूर यांनीं मंजूर करून सी० पी० ग्याझेट नोटिफिकेशन नंबर १९६, ३३३ अ ता० २३-७-१७ यांत प्रसिद्ध केले आहेत. पूर्वीचे नियम आलिशान रेसिडेंट साहेब बहादूर यांनीं मंजूर करून रेसिडेंटसी आर्डर नोटिफिकेशन नंबर १८२ तारीख २०-४-१८९९ यांत प्रसिद्ध केलेले नियम रद्द करून त्या ऐवजी हे नवीन नियम केले आहेत. नियमाचा मसुदा वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचे कलम ४७ अन्वये सर्व लोकांचे माहिती करितां प्रसिद्ध करण्यांत आला आहे.

सही

विनायकराव विष्णु गोखले

व्हाइसचेअरमन

म्युनीसिपल कमेटी वाशिम

## नियमाचा मसुदा

(१) कोणी इसम ज्याचा इरादा एखादी इमारत बांधावयाची किंवा तिची पुनररचना करावयाची असेल किंवा ज्यास सार्वजनिक रस्त्यावर किंवा दुसरी म्युनिसिपालिटीची किंवा नझुलची जमिन यावर दरवाजा बांधावयाचा असेल त्याची पुनररचना करावयाची असेल किंवा नवीन दरवाजा पाडावयाचा असेल किंवा नाली अथवा मोरी करावयाची असेल सदर्हुप्रमाणें इमारतीची रचना किंवा पुनररचना करण्याचें अगोदर किंवा नाली किंवा मोरी किंवा वर निर्दीष्ट केलेलें दुसरें काम बांधण्याचे पुनररचना करण्याचें किंवा नवीन उघडण्याचें पूर्वी आपला इरादा या नियमास जोडलेल्या नमुन्याप्रमाणें लेखी नोटीस देऊन कमेटीस कळविला पाहिजे मात्र जेव्हां कोणता ही भाग ज्यास्त वाढवणें त्यांत फेरबद्दल करणें किंवा रचना करणें यांच्या योगानें अस्तित्वांत असलेल्या इमारतीच्या अंतर्गत स्थितींत याचा बदल होतो व तिची बाहेरील व मुख्यरचना बदलली जात नाहीं तेव्हां अशी नोटीस देण्याची जरूर नाहीं.

टीपः— एखादे इमारतीची रचना करणें या उल्लेखाचा अर्थ बऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचें कलम ८९ यांतील खुलाशांत जो अर्थ दिला आहे तोच अर्थ समजला जाईल.

(२) नियम १ प्रमाणें जो प्रत्येक इसम नोटीस देईल त्यानें त्या नोटिशीबरोबर खालील कागद धाडावेत.

१ वीस फुटास एक इंच या स्केलवर या नकाशांत खालील माहिती दिली पाहिजे.

(अ) अस्तित्वांत असलेली इमारत जर असेल तर आणि अर्जदाराचें मालकिची किंवा त्याचे वहिवाटींत असलेली जागा.

(ब) ह्या जमिनीवर बांधावयाचे किंवा पुनररचना करावयाचे इमारतीची व तदंगभूत बाहेर इमारतीची स्थिती.

(क) ह्या जमिनीवर बांधावयाचे किंवा पुनररचना करावयाचें इमारतीचें आणि बाह्य इमारतीचे आपले जाणारे जाग्याचें क्षेत्रफळ.

(ड) शेजारच्या सडका, रस्ते, व गल्या यांचीं नांवें असतील तर व रुंदी व शेजारचे इमारतीची स्थिती.

(ई) अस्तित्वांत असलेल्या नाल्या किंवा नवीन करावयाचे पायखाने किंवा मोऱ्या आणि

२ दहा फुटास १ इंच या स्केलवर काढलेला नकाशा सक्सेशनसह त्याच्या दोन प्रती यांत खालील माहिती असावी.

(अ) ज्या लेव्हलवर इमारतीचा पाया व सर्वांत खालील जमिन किंवा जोते घालावयाचें असेल त्या लेव्हल शेजारच्या सडका व रस्ते यांच्या लेव्हल्स

(ब) किती मजले बांधावयाचे आहेत त्यांची संख्या आणि

(क) इमारतींत प्रत्येक खोलींत उजेड आणि हवा या संबंधानें करावयाच्या व्यवस्था,

(१) मात्र जर नोटिस देणारा एखादा मनुष्य सेक्रेटरी किंवा त्या कामा करितां कमेटीनें नेमलेला दुसरा अंमलदार याची खात्री करून देईल कीं इमारतीस खर्च १०० रुपयाहून कमी लागेल तर प्यारा १।२ यांत मागितलेली माहिती देणारा साधा नकाशा पुरे होईल. मात्र जागेच्या नकाशांत कोणते ही स्थितींत ज्या जागेवर किंवा जागेच्या पायांवर इमारती किंवा बाह्य इमारती उभारावयाच्या असतील तिची स्थिती व लांबी रुंदी बरोबर रितीनें दाखविली पाहिजे.

आणखी त्या नकाशांत मंजूर झाले नंतर इमारत बांधणारे इसमाची त्यांत फेरबदल करावयाची इच्छा असेल तर इमारतीच्या बाह्य किंवा मुख्य रचनेच्या फेरबदलामुळें कांहीं हरकत येत नसेल तर किंवा म्युनिसिपाल कमेटीनें वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचें कलम ८९ अन्वयें दिलेल्या लेखी हुकूमांत कोणते ही रितीनें त्या फेरबदलामुळें प्रत्यवाय येत नसेल तर त्याफेरबदला संबंधानें कमेटीस पुन्हा नोटीस देऊन त्यांची मंजुरी घेण्याची जरूरी नाहीं.

### कारवाई.

(३) नियम १ प्रमाणें आलेल्या नोटिसा या कामा करितां ठेवलेल्या एका रजिष्टरांत नोंदल्या जातील.

(४) नोटीस व तिज बरोबर असलेला

वार्ड मेंबरकडे त्यांचे मता करितां पाठविले जातील व वार्ड मेंबर त्याजकडे कागद पोंहचलेपासून सात दिवसाचे आंत ते कागद आरोग्य आणि इतर मुद्या संबंधानें आपले मत व शेरा देऊन सेक्रेटरीकडे परत करतील.

(५) वार्ड मेंबरकडून कागद आलेवर सेक्रेटरी व्हाईसचेअरमन किंवा चेअरमन सॅनिटेशन कमेटी किंवा कमेटीनें नेमलेला दुसरा अंमलदार याजपुढें ते कागद ठेवतील व व्हाईसचेअरमन सॅनिटेशन कमेटीचे चेअरमन किंवा कमेटीनें नेमलेला अंमलदार ते कागद सब कमेटीपुढें आपले रिपोर्टासह ठेवितील. सब कमेटी ती इमारत योजल्याप्रमाणें बांधण्याची मंजूरी देतील किंवा त्यास योग्य वाटल्याप्रमाणें फ्ल्यान आणि खुलासा यांत कांहीं फेरबदल किंवा दुरुस्ती करण्याचें शर्तीवर परवानगी देतील किंवा वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचें कलम ८९ प्रमाणें इमारत बांधण्याची परवानगी नामंजूर करण्याकरितां आपले रिपोर्टासह तें प्रकरण पाठवितील.

(६) जेव्हां सॉनिटेशन सब कमेटी किंवा म्यानेजिंग कमेटी इमारतीस आपली अखेर मंजूरी देतील तेव्हां सेक्रेटरी यांनी लेखी इमारत बांधण्याचे परवानगीचा दाखला द्यावा. हा दाखला दिल्याचे तारखेपासून १ वर्ष पावेतो अंमलांत राहील. या दाखल्या बरोबर मंजूर केलेला नकाशा दिला जाईल या नकाशांत मुळचें नकाशांत सॉनिटेशन सब कमेटी किंवा म्यानेजिंग सबकमेटी यांनीं केलेले फेरबदल किंवा दुरुस्त्या दाखविल्या जातील.

(७) प्रकरणाचा निकाल झालेवर मंजूर केलेला नकाशा व सूचना यांची नक्कल सेक्रेटरी यांनीं पुढील दाखल्याकरितां म्युनिसिपल ऑफिसांत दप्तरीं ठेवावी.

(८) सेक्रेटरी किंवा दुसरा अंमलदार यास म्यानेजिंग कमेटी किंवा सॅनिटेशन कमेटी नेमतील त्यांनीं इमारत बांधणें सुरू असतांना तिची तपासणी करावी आणि जर त्यास असें वाटेल कीं मंजूर केलेला नकाशा आणि सुचना याप्रमाणें अंमलबारी केली नाहीं तर त्यांनीं सॅनिटेशन कमेटी किंवा म्यानेजिंग कमेटी यांचेपुढें निकाला करितां तो विषय एकदम ठेवावा.

(९) ज्या इसमास इमारत बांधणेंकरितां परवानगी मिळाली आहे त्यास एखादा म्युनिसिपालटीचा अमलदार हुकुम देईल तर त्यांनीं आपला परवानगीचा दाखला व मंजूर केलेला प्लॅन आणि सुचना त्या अमलदाराचें तपास[illegible]णी करितां दाखल करावयात.

### नमुने व प्लॅन

(१०) नियम १ प्रमाणें नोटिसीचा

सेक्रेटरीचे ऑफिसांत दिला जाईल.

(११) नियम २ दोन अन्वयें लागणारा नकाशा मागितल्यास कमेटीचें ऑफिसांत इमारत बांधणारा किंवा तिची पुनररचना करणारे इसमाचे खर्चानें तयार केला जाईल व तो खर्च कमेटी वेळोवेळीं ठरवील त्या दरानें घेतला जाईल.

(१२) नियम १ ते ९ मोडल्याची शाबीती माजिस्ट्रेट पुढें झाल्यास त्याबद्दल ५० रुपयापेक्षां जास्त नाहीं इतका दंड केला जाईल आणि जेव्हां नियम मोडणें चालूं राहणारें असेल तेव्हां पाहिले दिवसानंतर जितके दिवस नियम मोडणें चालू राहिल तितक्या प्रत्येकीं दिवसाबद्दल दररोज पांच रुपयाप्रमाणें आणखी दंड केला जाईल.

सेक्रेटरी

## नोटीस

सेक्रेटरी म्यु. कमेटी वाशीम यांस

मी खालीं सही करणार वऱ्हाड म्युनीसिपल कायद्यांचें कलम ११६ (१) (जे) अन्वयें केलेलें नियमास अनुसरून या नोटीसीनें कळवितो कीं भाग मध्यें जवळ असलेले हल्लीं नंबर ची इमारत मजल्याची बांधावयाची आहे किंवा तिची पुनररचना करावयाचा माझा इरादा आहे. नियमाप्रमाणें अवश्य असलेले प्लॅन सेक्शन आणि एलिव्हेशन आणि दुसरा तपशील दाखविणारे कागद याच्या दोन प्रती सोबत दिल्या आहेत.

सही

पत्ता

सन १८८६ चे वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचें कलम ८९ अन्वयें इमारत बांधण्याची किंवा तिची पुनररचना करण्याची नोटीस देणारें कोणा इसमास कमेटीस देतां येतील असे लेखी हुकूम.

(१) ज्या इमारती नवीन बांधावयाच्या आहेत त्या संबंधानें खालील हुकूम अंमलांत राहील.

(अ) जी जमीन भरून काढली आहे किंवा जी घाणेरडे पदार्थ किंवा मेलेल्या जनावरांचीं प्रेतें किंवा दुसरे घाणेरडे किंवा त्रासदायक पदार्थ टाकण्याकरितां उपयोगांत आणली आहे त्या जमिनीवरील असले पदार्थ कमेटीचे पसंतीप्रमाणें पूर्णपणें काढून टाकल्याशिवाय अशा इमारतीचा कोणताही पाया त्या जागेवर घातला जाणार नाहीं.

(ब) मनुष्याचे वस्ती करितां उपयागांत आणावयाचे इमारतीचा सर्वांत खालील मजल्याची जमिनीचे (सभोंवतालच्या) जमिनीचे सपाटीहून दीड फुटापेक्षां कमी उंच नसावी.

(क) प्रत्येक इमारतींत वस्तीकरितां उपयोगांत आणावयाचें खोलीचें सपाटीचें क्षेत्रफळ ८८ चौरस फुटापेक्षां कमी नसावें व त्या खोलीस कमींत कमी एक दरवाजा वरील हवेंत उघडणारा असावा किंवा ते सायवान किंवा खोली बाहेरील हवेंत उघडले जातात. हा सायवानांत किंवा खोलीमध्यें उघडणारें असावें.

(ड) अशा प्रत्येक इमारतींत वस्तीकरितां उपयोगांत आणावयाची प्रत्येक खोली ती त्या इमारतीचे छोटे मुर्णीतील खोली नसल्यास प्रत्येक भागामध्यें जमिनीपासून छता, पर्यंत कमीत कमी आठ फूट उंच असावी आणि छावणीतील प्रत्येक खोली पांचफूट असावी.

(इ) हवा मोकळी वहावी ह्मणून किंवा सफाईचें कामाची सोय व्हावी ह्मणून किंवा आगीचा प्रतिकार व्हावा ह्मणून सॅानिटेशन सब कमेटी किंवा म्यानेजिंग सब कमेटी नविन होणारे इमारत व शेजारची नवीन इमारत यांच्यामध्यें ३ तीन फुटाहून कमी नाहीं इतकी जमीन सोडण्याकरितां खुली सोडण्याकरितां हुकूम करूं शकतील.

(फ) नवीन काढलेल्या सडका किंवा अस्तित्वांत असलेल्या सडका जेथें अधिक रुंद किंवा सरळ करावयाच्या असतील तेथें सॅानिटेशन कमेटी किंवा म्यानेजिंग कमेटी विरुद्ध हुकूम न करतील तर नवीन बांधले जाणाऱ्या इमारतीच्या पूर्ण लांबीभर ६ सहा फुटांपेक्षां कमी नाहीं इतक्या रुंदीची जागा ह्या इमारतीचे सर्वांत जवळ असणारें हद्द किंवा सडकेच्या बाजूची नाली यांच्या दरम्यान सोडावी लागेल.

(२) सडकेचे नालीचे बाजूनें कोणीं इसम इमारत बांधण्यास किंवा तिची पुनररचना करण्यास इच्छील तर सदरहु नाली व नालीस लागून सर्वांत जवळ असणारे इमारतीचा भाग यांचे दरम्यान कमींतकमी १॥ दीड फूट रुंद जमीन त्यांस सोडावी लागेल.

(३) खालील सूचनाप्रमाणें नवीन करावयाची किंवा उंच करावयाची इमारतीची उंची ज्या सडकेवर ही इमारत असेल त्या सडकेच्या रुंदीचे मानानें ठरविण्यांत येईल.

१ जर सडकेची रुंदी २६ फुटापेक्षां ज्यास्त नसेल तर ती सडकेच्या मानानें दीड फुटापेक्षां जास्त उंच केली जाणार नाहीं किंवा तिची असलेली उंची वाढवितां येणार नाहीं.

२ सडकेची रुंदी २६ फुटाहून ज्यास्त असून ४० फुटांपेक्षां जास्त नसेल तर इमारत ४० फुटापेक्षां जास्त उंच केली जाणार नाहीं किंवा तिची उंची वाढली जाणार नाहीं.

३ जर सडकेची रुंदी ४० फुटाहून अधिक असेल तर इमारत सडकेच्या रुंदीपेक्षां जास्त रुंदी केली जाणार नाहीं किंवा तिची उंची वाढवितां येणार नाहीं.

(४) जर इमारत दोन सडकांस लागून असेल तर तिची उंची जितका तिचा भाग अधीक रुंदीचे सडकेवर असेल तितक्या भागाची उंची त्या अधिक रुंदीचे सडकेचे मानानें करितां येईल व त्या इमारतीचा भाग कमी रुंदीचे सडकेवर असून अधिक रुंद सडकेपासून ८० फुट अंतरापर्यंत ती त्याच मानाने करितां येईल. मनुष्यांचे वस्ती करितां उपयोगांत आणावयाची कोणतीही खोली जुन्या किंवा नव्या पायखान्यावर बांधिली जाणार नाहीं.

(५) कमेटीचें मताप्रमाणें नालीचें पाणी जमा करण्याची व तेथून तें वाहून नेण्याची अवश्यक असणारी योजना केल्याशिवाय इमारतीचे कोणतेही भागाचा स्नान करण्याकरितां व कपडे धुण्याकरितां व घरांतील भांडीं धुण्याकरितां कोणताही इसम उपयोग करणार नाहीं किंवा दुसऱ्यास उपयोग करूं देणार नाहीं.

(६) वरील हुकमामध्यें कांहीं सांगितलें असेल तथापि कमेटीस योग्य वाटेल तर लेखी परवानगी देऊन खालील हुकूम करण्याचा कमेटीस अखत्यार राहील.

(अ) एखादे इमारतीच्या संबंधानें नियमाप्रमाणें अवश्य लागणारे लांबीमध्यें फेरफार करण्याचा हुकुम करणें.

(ब) तीन महिन्यापेक्षां जास्त मुदतीपर्यंत ठेवावयाचे नाहीं अशा कोणत्या ही हंगामी इमारतीस वर लिहिलेले हुकूम किंवा त्यांपैकीं एखादा हुकूम त्याचें अमलबारी करण्यापासून माफी करणें परंतु प्रत्येक इमारती संबंधानें घ्यावयाची परवानगी किंवा माफीही त्यांस योग्य वाटतील अशा शर्तींनिशी देण्याचा कमेटीस अखत्यार राहील.

### पायखान्याची रचना.

(७) कमेटीनें पसंत केलेल्या जागेखेरीज कोणत्या ही जागेवर पायखाना नवीन केला जाणार नाहीं साधारणपणें घरांत राहणारे वयांत आलेले बारा मनुष्याकरितां एक खोली पुरविली जाईल.

(८) पायखान्याची खोली किंवा त्याचा पाया किंवा त्याची एखादी नाली किंवा मोरी जिचा उपयोग मैलापाणी वाहण्याकरितां केला जाईल अशी मातीची किंवा विटा आणि मातीची बांधिली जाणार नाहीं.

(९) प्रत्येक पायखान्यास वरचे बाजूनें चार चौरस फुटांपेक्षां कमी नाहीं इतकी एकंदर क्षेत्रफळाची किंवा अधिक छिद्रें ठेविलीं जातील.

### नाल्याची रचना

(१०) इमारतीस लागून असणाऱ्या सांडपाण्याच्या आणि मैलापाणी जाण्याच्या सर्व नाल्या यांची रचना अशी केली जाईल कीं म्युनिसिपालिटीचे अमलदारांस सहज रितीनें तपासतां यावयात आणि सॅानिटेशन कमेटी आणि म्यानेजिंग कमेटी यांच्या विशेष लेखी परवानगी शिवाय त्यांचे अच्छादन केलें जाऊं नये. मनुष्याचें राहण्याकरितां ज्या खोलीचा उपयोग व्हावयाचा असेल त्या खोलींतून मैल्याची नाली किंवा मैलापाणी जाणें करितां नालीचा नळ नेला जाणार नाहीं.

(११) जरूरीचे वेळीं व्हाइस चेअरमन किंवा सॅानिटेशन कमेटीचे चेअरमन किंवा कमेटीनें दिलेला दुसरा अंमलदार यांनीं वार्ड मेंबरचे शिफारसी वरून कमेटीचे हुकूमावर अवलंबून कोणती ही इमारत अथवा दुसरें काम सुरू करण्याची परवानगी घ्यावी परंतु त्याचा हुकूम सॅनिटेशन कमेटी किंवा म्यानेजिंग सब कमेटी यांचे पसंतीवर व मंजुरातीवर अवलंबून राहील.

नो. नं. ४३४


## लक्षांत ठेवा.

कीं येथें आमचेकडे कमिशनचे (अडतीचे) काम चालत असून आह्मी येथें मिळणारा कापड, किराणा, स्टेशनरी, कांचसामान, दळण्याच्या गिरण्या जीन व प्रेसचें सामान वगैरे वगैरे सर्व प्रकारचा माल माफक कमिशन घेऊन भावाची पूर्ण चौकशी करून पाठवितो. व बाहेर गांवाहून विक्री करितां आलेला माल विकून देतो तसेच सायकल, व सायकलला लागणारे सर्व सामान मोटारचे व घोडे गाडीचे गाद्यांचे कापड, व दुसरे लागणारे सामान, खिशांतील विजेचे दिवे, व दुसरे विजेचे सामान, ल्यांपस् वगैरे तेल पुरवितो. एकवेळ आरडर देऊन कामाचे चोखपणाबद्दल खात्री करून घ्या.

डब्ल्यु. व्ही. पिंगळे आणि सन्स

पत्ता— ठाकुरद्वार रोड, काळकादेवी पोष्ट मुंबई नंबर २

नो. नं. ३९८



४० रोगावर एकच जालीम औषध

## सुधासंजीवनी



यानें अजीर्ण, खोकला, दमा, संधीवात, प्रमेह, प्रदर, धुपणी, संग्रहणी, अतीसार वगैरेवर तत्काल गुण येतो.

याची एक बाटली जवळ ठेवणारास वैद्याची गरज राहणार नाहीं. एकदाच खातरी करा किंमत रु. १ टपाल खर्च निराळा. नमुना -॥- अनुपान पत्रकसोबत. गांवोगांव एजंट पाहिजेत. भरपूर कमीशन. आजच पत्र लिहा.

सुधासंजीवनी डेपो

खामगांव (वऱ्हाड)



## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तबडतोब दूर होतात किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H L. Batliwala Sons & Co. Ltd.**

N. N. 6 Dadar Bombay

वऱ्हाडसमाचार

आश्विन वद्य १३ पिंगल संवत्सर १८३७

## शिक्षण विषयक सुधारणा.

जगांत स्थित्यंतरें हीं नेहमीं चाललींच आहेत. पण प्रस्तुतच्या युद्धानें या स्थित्यंतरांचें पाऊल फार त्वरित केलें आहे. गेल्या दोन वर्षांत विलायतेंत ज्या सुधारणांविषयक निरनिराळ्या योजना पुढें मांडण्यांत आल्या व त्यांना लोकांची व सरकारची संमति मिळून त्यांतल्या कित्येक झपाट्यानें अंमलांत ही आल्या त्यावरून विलायतेंतल्या लोकांना सुद्धां आपण जगाचे फार मागें आहों, आणि प्रगतीच्या मार्गांत झपाट्यानें पुढें पाऊल टाकीत न गेल्यास आपण इतर राष्ट्रांच्या मागें पडूं अशी जाणीव भासूं लागली आहे असें स्पष्ट दिसत आहे. विलायतेंतले शिक्षणविषयक मंत्री मि. फिशर यांनीं तयार केलेली शिक्षणविषयक योजना इतकी क्रांतिकारक व दूरपरिणामी आहे कीं युद्धामुळें झपाट्यानें प्रगति करण्याची अवश्यकता इंग्लंडला येऊन पडली नसती तर ती योजना लोकांनीं मुकाट्यानें ऐकून तरी घेतली असती कीं नाहीं याची आह्मांला शंका वाटते. हिंदुस्थानांतली सरकारी शिक्षण नीति विलायतेंतल्या त्या नीतीचाच प्रतिध्वानि असला तरी तो प्रतिध्वनी इतका सूक्ष्म आहे कीं त्या प्रतिध्वनीवरून मूळच्या सिंहनादाची ओळख तरी पटेल कीं नाहीं कोण जाणे! तथापि विलायतेंत उत्पन्न झालेल्या विलक्षण उत्साहाचा यत्किंचित् अंश जरी इकडे सरकारच्या शिक्षण विषयक नीतींत प्रातिबिंबित होईल तरी पुष्कळ कार्य होईल. मि. फिशर यांच्या योजनेचा मुख्य रोख गरीब स्थितींतल्या लहान मुलांच्या शिक्षणाकडे मुख्यतः असून त्यांना आपल्या अंगच्या शारीरिक, बौद्धिक व नैतिक शक्तीचा उपयोग स्वतःची उन्नति व देशाची सेवा यांत करण्याची संधी मिळावी असें करणें हा मि० फिशर यांचा मुख्य उद्देश आहे. शिक्षणप्रसाराबरोबर शारीरिक शक्तीचा ऱ्हास होण्याची कशी भीती असते याचें उत्तम उदाहरण आमचा हिंदुस्थान देश आहे. इंग्लंडमध्यें क्रिकेट, फुटबॉल सारखे मर्दानी खेळाची आवड मुलांमध्यें ज्यास्त असतांही तेथें शारीरिक शक्तीचा ऱ्हास होण्याची भीति नाहींशी झाली नाहीं, ह्मणून या गोष्टीकडे मि. फिशर यांनीं लोकांचें लक्ष प्रथम वेधिलें आहे. लहानपणापासून उघड्या हवेंतल्या खेळापासून होणारा फायदा मुलांना मिळावा ह्मणून मि. फिशर यांनीं असें योजिलें आहे कीं पांच वर्षांच्या आंतील मुलांकरितां उघड्या हवेंतील नर्सरीस्कूल्स (ह्मणजे ज्यांत शिक्षकिणी मुलांना प्रेमानें खेळवितील अशा शाळा) स्थापन कराव्या; पुढें चौदा वर्षें पर्यंतच्या मुलांना कोणताही अपवाद न ठेवतां शाळेंत घालण्याची सक्ती ठेवावी, व त्यापुढें १८ व्या वर्षापर्यंतच्या वयाच्या व उद्योगधंदा करूं इच्छिणाऱ्या मुलांसाठीं पुढील शिक्षणाच्या शाळा ( Continuation Schools ) स्थापन कराव्या. मि. फिशर यांच्या योजनेंत अर्धावेळ शाळेंत जाण्याच्या पद्धतीला स्थान दिलेलें नाहीं. १२ वर्षां खालच्या वयाच्या कोणत्याही मुलाला कोणत्याही कारणानें रोजगाराला लावावयाचें नाहीं. फक्त सुटीचे दिवसांत सकाळीं ८ च्या पुढें व संध्याकाळीं ८ चे आंत कामाला लावण्यास हरकत नाहीं. या योजनेनें मुलांवर ज्यादी लहानपणीं मजुरी करण्याच्या श्रमाचें व थोडेसे मोठे झाल्यावर शाळेंतला अभ्यास व मजुरी या दोहींचे श्रमाचा त्यांचेवर पडणारा भार वाचेल व त्यांची शरीर प्रकृति सदृढ राहील मि. फिशर हे ह्मणतात कीं सक्तीच्या 'कांटिन्युएशन' शाळा व लहान मुलांना कामावर लावण्याची मनाई यांच्यायोगें एकंदर देशावर अधिक खर्चाचा बोजा पडेल ही गोष्ट खरी आहे. पण हा पैसा फुकट जाणारा नाहीं, सव्याज देशाला परत मिळणारा आहे. एका हातानें तो सव्याज घ्यावयाचा असा हा प्रकार आहे. मि. फिशर यांचें हें बिल ह्मणजे आधुनिक काळांतली शिक्षणविषयक सनदच आहे इतकें त्याविषयीं इंग्लंडच्या लोकांचें उच्चमत आहे. या बिलच्या अंतर्भूत असलेलीं मूल्यवान् तत्वें मि. फिशर यांच्याच शद्बांत द्यावयाचीं ह्मणजे तीं अशीं आहेत. माणसाच्या व राष्ट्राच्या जीवनाला अवश्य अशा ज्या गोष्टी आहेत त्यांत शिक्षण ही प्रधान गोष्ट आहे. हें शिक्षण राष्ट्रांतल्या तरुणांना जितकें मिळावयास पाहिजे तितकें आजपर्यंत मिळत गेलें नाहीं. शिक्षण या संबंधानें माणसाची सर्वांगीन पूर्णता सिद्ध व्हावयास पाहिजे. त्यांत शारीरिक, बुद्धिविषयक व अध्यात्मिक शिक्षण ही येतें. निरनिराळ्या दर्जांच्या व स्थितींतल्या माणसाच्या शिक्षणपद्धतींत भिन्नता पाहिजे ही गोष्ट कबूल केली तरी त्या सर्व शिक्षणपद्धतींना सर्वसामान्य अशीं कांहीं अवश्य तत्त्वें आहेत. तीं कायम ठेवून शिक्षणपद्धति ठरविणें ही गोष्ट अर्वाचीन सुधारणेला अशक्य नाहीं. शिक्षण जितकें पुरुषांना तितकेंच स्त्रियांना ही अवश्य आहे, आणि श्रीमंताच्या मुलांच्या शिक्षणाचीं मूलभूत तत्त्वें गरीबांच्या शिक्षणाच्या मूलतत्त्वांहून निराळीं नाहींत. तत्त्वें एकच आहेत, परिस्थित्यनुरूप शिक्षणपद्धति निराळ्या असल्या पाहिजेत इतकेंच.

वरील विवेचनावरून शिक्षणविषयक जबाबदारीसंबंधानें आतां कोठें इंग्लंडांत खरी जागृति झाली आहे असें ह्मणणें भाग पडतें. हिंदुस्थानाला तर या जागृतीचा पैलतीर ही अद्याप अंधुक सुद्धां दिसूं लागला नाहीं. पण आज नहीं उद्यां ही सुधारणेची—ही जागृतीची—लाट हिंदुस्थानावर आली पाहिजे तरच हिंदुस्थानचा तरणोपाय आहे. आमच्या हल्लींच्या शिक्षणपद्धतींत असंख्य दोष आहेत. किंबहुना हल्लींच्या पद्धतीचें अजीबात निर्मूलन करून अधिक विचारग्राह्य, अधिक तेजस्वी, अधिक राष्ट्रीय अशी पद्धति तिच्या जागीं स्थापित झाली पाहिजे. इंग्लंडांत मि. फिशरसारखे सरकारी अधिकारी लोकांना जागृत करीत आहेत. इकडे मिसेस बिझांट, मि. अरुंडेल, मि. अर्नेस्ट वुड वगैरे सारखे लोकांच्या विश्वासास पात्र झालेले लोकांचे पुढारी सरकारी अधिकाऱ्यांस जागृत करण्यास पाहत असतात, पण ते जागे होत नाहींत; इतकेंच नाहींतर झोपमोड केल्याबद्दल उलट त्रासिकपणा ही दाखवितात! ही स्थिति अशीच किती काळपर्यंत चालणार आहे तें कळत नाहीं. सरकारी अधिकाऱ्यांच्याच हातीं जोंपर्यंत शिक्षणसूत्रें राहतील तोंपर्यंत कम ज्यास्त मानानें हाच प्रकार चालू रहावयाचा. यासाठींच हिंदुस्थानांतल्या तरुणांचें शिक्षण राष्ट्रीय झालें पाहिजे व तें राष्ट्रांतल्या प्रमुख लोक नायकांच्याच हातीं पाहिजे असें सर्व विचारी लोकांचें ह्मणणें आहे. आमच्या सरकारी ऑफिसरांत मि. फिशरसारखा खऱ्या कळकळीचा, दूरदृष्टीचा, अनुभवानें पोक्त आणि स्पष्टवक्ता असा पुरुष निर्माण तूर्त तरी आह्मांस जवळ जवळ अशक्य गोष्टींत लेच दिसतें. 'कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी' असें जें एका संस्कृत कवीनें ह्मटलें आहे तें शिक्षणविषयक सुधारणांसंबंधानें खास नव्हे.

---

## महायुद्धाची प्रगति.

गेल्या दोन आठवड्यांपासून महायुद्धाचें नांव काढल्याबरोबर प्रथम इटलीच्या नाजूक स्थितीचा प्रश्न डोळ्यासमोर उभा राहतो. गेल्या आठवड्याच्या आरंभीं कांहीं इटालियन सैन्याची धूळदाण झाल्याची खबर आली होती. या संबंधाची साविस्तर हकीकत आल्याशिवाय नक्की बातमी कळण्यास कांहीं मार्ग नाहीं. येवढें मात्र अलीकडच्या तारांवरून स्पष्ट दिसतें कीं प्रसंग मोठा बिकट आहे. तथापि या संकटाला तोंड देण्याची इटालीची पूर्ण तयारी आहे ही त्यांतल्यात्यांत समाधानाची गोष्ट आहे. टागलियामेंटोपलीकडे इटालियन लोक हटले त्यांत सुद्धां इटालियन घोडेस्वारांच्या पलटणीचा मोठा स्वार्थत्याग दिसून आला. शत्रूच्या यांत्रिक तोफांच्या भडिमाराला न जुमानतां अत्यंत समयोचित कृत्य करण्यास ते कचरले नाहींत. त्यांच्या आड इटालियन सैन्याला दडून आपला उद्देश सिद्धीला नेतां आला ही कांहीं सामान्य गोष्ट नव्हे. याप्रसंगीं इटालियन सेनापति कार्डोना यांच्या करामतीचीं तारीफ होत आहे ती योग्यच ह्मटली पाहिजे. कारण, दुसऱ्या तुकडीची शिथिलता दिसल्याबरोबर तिसऱ्या तुकडीला माघार घेण्याचा हुकुम त्यांनीं दिला नसता तर ती शत्रूच्या हातीं नेमकी लागली असती. इटालियन लोक आज दोन वर्षें ज्या ठिकाणीं ठाणें धरून बसलें होते व जें त्यांनीं मोठ्या बहादुरीनें संभाळलें होतें त्याच्या संरक्षणार्थ त्यांनीं पुष्कळशा जड तोफा वगैरे ठेवणें हें साहजिक होतें. एकाएकीं मागें पाय काढण्याची वेळ आली तेव्हां हें जड सामान बरोबर नेणें त्यांना शक्य नव्हतें. अर्थात् त्यांनीं जातांना त्या मोडून तोडून टाकिल्या, व त्या शत्रूच्या हातीं लागल्या. त्यांत शत्रूंनीं फुशारकी मारण्यासारखें वस्तुतः कांहीं नाहीं. ज्या तोफा नेण्या सारख्या होत्या त्या इटालियन लोकांनीं दोरखंड बांधून त्यांनीं टागलियामेंटोपर्यंत ओढून नेण्यास सोडलें नाहीं. या सर्व हकीकतीवरून इटलीची स्थिति नाजूक—फार नाजूक— असली तरी निराशाजनक दिसत नाहीं. अडचणीच्या जागेंतून बाहेर पडून उघड्या मैदानांत आल्यावर इटालियन लोक निकरानें लढल्याशिवाय राहणार नाहींत; आणि तेव्हांच त्यांच्या शक्तीची खरी परीक्षा जर्मनांना होईल.

इटालियन लोकांवरचा ताण कमी करण्याचा एक उपाय असा सुचविण्यांत आला आहे कीं मित्रराष्ट्रांनीं आड्रीयाटिक समुद्रांत आपल्या आरमाराकडून आक्रमण करावें ह्मणजे आस्ट्रियन आरमाराला बंदरांतून बाहेर पडणें भाग पडेल ते बाहेर पडलें ह्मणजे मित्रराष्ट्रांच्या आरमाराला त्याला चिरडून टाकण्यास वेळ लागणार नाहीं. इटालीच्या आरमाराचे आधिपति अब्रूझीच ड्यूक हे आहेत. त्यांची हुषारी ग्राडो हे महत्त्वाचें ठिकाण त्यांनीं युक्तीनें काबीज केलें तेव्हां दिसून आलीच आहे.

---

## पश्चिमरणक्षेत्र

या युद्धभूमीवर मित्रराष्ट्रांची सरशी कायम आहे. गेल्या आठवड्यांत शेमिनेडेम्स या ठिकाणाहून जर्मन शिपायांना जावें लागलें. तें सोडतांना त्यांची तारांबळ इतकी उडाली कीं त्यांना खंदक व बोगदे यांचा नाश करण्याचें सुचलें नाहीं इतकेंच नाहीं, तर चुलीवर शिजून तयार झालेलें सूप (मांसार्क) पिऊन ताजेतवाने होण्याचें ही सुचलें नाहीं. ते जितक्या घाईनें पळाले तितक्या घाईनें मित्र सैन्याला तें ठिकाण हस्तगत करतां आलें नाहीं. याचें कारण, विश्वासघातकी जर्मनांनीं कोठें कशीं घातयंत्रें लावून ठेविलीं असतील कोणास ठाऊक! यासाठीं ते फार सावधगिरीनें गेले. हीं घातयंत्रें शोधून काढण्यांत मात्र जर्मन लोकांची हुशारी अवर्णनीय आहे. नुकतेंच आमच्या वाचण्यांत आलें कीं त्यांनीं आतां युक्ति शोधून काढली आहे कीं ज्याच्या योगानें तारेवांचून विद्युत्शक्तीनें शत्रूचा नाश व्हावा. ही युक्ति सफळ झाली तर सैन्य ठेवण्याचा अवाढव्य खर्च ही करण्याचें कारण उरणार नाहीं.

---

## पालेस्टाईन रणक्षेत्र.

मिसर देशच्या सरकारी जाहिरपत्रकावरून कळतें कीं गाझाच्या पश्चिमेस व नैर्ऋत्येस जंगी तोफांची चांदमारी सुरु आहे. इंग्रज सैन्यानें बीरशेवा हें ठिकाण घेतलें. ते लोक ५००० गज पुढें सरले व तुर्कीं [illegible] पुढील तीन रांगा त्यांनीं काबी[illegible] शत्रूंनीं तीनदां हल्ले केले [illegible] निष्फळ झाले. बीरशेव[illegible] १९ तोफा [illegible] तुर्की लो[illegible] २६ [illegible]

[illegible] पांगरी
दर्यराव चिवरकर पांडे
[illegible]मानी द. खुद
[illegible] नं. ४६४
[illegible]चा प्रयत्न [illegible]
[illegible]वायतीच्या [illegible]

तार तर याहून अधिक उमेदकारक आहे. ती ह्मणते कीं एकंदर २०७ ऑफिसर व २४२९ तुर्की शिपाई कैद केले आहेत.

## ग्रीसची दगलबाजी.

ग्रीसचा माजी राजा कॉन्स्टंटाईन व त्याची राणी ( जर्मन केसरची बहीण ) ही मित्र राष्ट्रांशीं बाह्यतः सख्य ठेवीत होती तरी आंतून दगलबाजीचे त्यांचे प्रयत्न सुरू होते. जर्मनीशीं त्यांचा गुप्त पत्रव्यवहार होता. जनरल सारेल यांच्यावर हल्ला करण्यास राणीनें आपल्या भावाला सुचविलें होतें, इतकेंच नाहीं तर एक सारखा आग्रह चालला होता. हा व इतर कांहीं तार व्यवहार आतां उघडकीला आला आहे. त्यावरून ग्रीसच्या माजी राजाच्या व राणीच्या दगलबाजीविषयीं शंका राहिली नाहीं.

## वर्तमानें

ता. ९ नोवेंबर रोजीं दिल्ली येथें ना. व्हाइसराय साहेबांच्या अध्यक्षत्वाखालीं हिंदुस्थानांतल्या राजेरजवाड्यांची दुसरी परिषद झाली. व्हाइसराय साहेबांनीं युद्धाचे कामीं राजे लोकांनीं दिलेल्या मदती बद्दल स्तुतिपर उद्गार काढले व राजेलोकांचें एक कौन्सिल स्थापून त्यांचे उद्देश व अधिकार निश्चित करावे अशी जी कांहीं संस्थानिकांची इच्छा आहे ती महत्त्वाकांक्षा कांहीं वाईट नाहीं, पण ती पूर्ण होण्यास अशा परिषदा आणखी कांहीं वेळ भरून अनुभव आल्यावर मग त्या गोष्टीचा विचार करतां येईल असें सांगितलें व सैन्यभरतीच्या कामीं संस्थानिकांनीं शक्य तेवढी मदत देण्याची अवश्यकता आहे असें सुचविलें.

मद्रासकडे मि. सीताराम आयर नांवाच्या पूर्वी सरकारी नोकरींत असलेल्या एका इसमावर राजद्रोहाचा आरोप ठेवून चौकशी चालली आहे. आरोपीनें तटस्थ राष्ट्रांच्या हिंदुस्थानांतील वकीलां मार्फत जर्मनीचे युवराज, व प्रधान यांच्याशीं पत्रव्यवहार ठेवण्याची व त्या पत्रांत हिंदुस्थानांतील लोकांनीं बंड करण्यासाठीं जर्मनीकडून मदत मागितल्याचा आरोप ठेवण्यांत आला आहे.

१९१८ च्या जुलैपासून म्हैसूर संस्थानांत ८ व १० वर्षांच्या वयाच्या मुलींचें शिक्षण सक्तीचें करण्याचें ठरलें आहे.

हिंदुस्थानांत प्राथमिक शिक्षणाची प्रगति फार मंद पावलानें होत आहे ही गोष्ट मि. मांटेग्यु यांचेबद्दल स्टेट सेक्रेटरीचें पार्लमेंटांत काम करणारे मि. फिशर यांनीं हौस ऑफ कॉमन्समध्यें कबूल करून त्याबद्दल खेद प्रदर्शित केला.

जर्मन लोकांनीं एक विचित्र जहाज तयार केलें आहे. थोड्या दिवसापूर्वी बेलज्यमच्या किनाऱ्यापाशीं एक जर्मन जहाज बुडविण्यांत आलें होतें. आतां असें कळतें कीं या जहाजावर कोणी ही माणूस नव्हतें बिन तारेच्या तारायंत्रानें तें चालविलें जात असे

## नि[illegible]ली चळवळ.

खापर्डे हे लोक सार्वजनिक दादाभाई हे येऊ [illegible]गके आहेत लोकांची इच्छा आहे

ही मोठ्या संतोषाची गोष्ट आहे. तिकडे स्वराज्यसंघाची मोहीम चांगली यशस्वी झाली व पुष्कळ गुजराथी व्यापारी राजकीय चळवळीला येऊन मिळाले. भडोच येथें तीन व गोध्रा येथें दोन अशा एकंदर पांच परिषदा यंदाचे सालीं गुजराथेंत झाल्या. पैकीं शिक्षण परिषद व प्रांतिक राजकीय परिषद यांचे अध्यक्ष दक्षिण आफ्रिकेंतल्या राजकीय चळवळीचे वीराग्रणी मि. गांधी हे होते. सत्याग्रहाच्या प्रश्नासंबंधाच्या त्यांच्या मतावरून ते कशा प्रकारचे राजकीय पुढारी आहे याची माहिती लोकांना आहेच. देशकालमानाकडे दृष्टि न देतां केवळ कल्पनातरंगांत निमग्न राहणारे ते नाहींत. त्याच प्रमाणें पक्षाभिमान त्यांचे ठायीं नसून सरळ व सत्य गोष्ट निर्भीडपणें बोलून दाखविण्यास ते कचरत नाहींत. बिहार प्रांतांतल्या प्रश्नाची चौकशी करण्याच्या कमिटींत त्यांनीं केलेल्या कामाचा परिणाम बिहार प्रांताच्या सरकारच्या मनावरही झाल्यावांचून राहिला नाहीं, व त्या प्रश्नाचा बराच समाधानकारक निकाल लागला. असे योग्य पुढारी गुजराथ प्रांताला लाभले या बद्दल त्या प्रांतांचें अभिनंदन केलें पाहिजे. अशा पुढाऱ्याच्या नेतृत्वाखालीं गुजराथ प्रांत राजकीय चळवळींत चांगलाच पुढें येईल अशी उमेद आहे.

## दिवाळीचा सण

आपल्या पूर्वजांनीं वर्षांतून ठराविक वेळीं जी सणांची योजना केली आहे व प्रत्येक वेळीं अमुक अमुक गोष्टी कराव्या ह्मणून जें ठरविलें आहे तें आरोग्याच्या दृष्टीनें फार विचार करण्यासारखें आहे. पण आपण त्यांनीं घालून दिलेल्या नियमांतल्या शद्बांचें तेवढें ग्रहण करतों, अर्थाचें नाहीं. त्या नियमांतल्या गर्भित हेतूकडे आपलें लक्ष जात नाहीं. त्यामुळें अनेक प्रकारचीं दुःखें भोगीत आहों. यंदाचा दिवाळीचा सण जवळ आला आहे. या सणाचा मूळ हेतु स्वच्छता राखणें हा आहे. त्या मूळ हेतूकडे लक्ष देऊन लोकांनीं आपापल्या घरांची मोऱ्यांची व शौचकूपांची स्वच्छता ठेविल्यास पुष्कळसे रोग कमी होऊन लोकांचें आरोग्य सुधरेल. यासाठीं प्रत्येक गांवच्या लोकांनीं एकेक जनरल कमिटी नेमावी, व मोहल्लेवार पोटकमिट्या नेमून त्या कमिट्यांनीं आपापल्या हद्दींत होईल तेवढी स्वच्छता ठेवावी, ज्या गोरगरीबांना घरें सारविण्यास, व चुन्यानें रंगविण्यास अडचण असेल त्यांना द्रव्यद्वारें साह्य करावें, वगैरे बऱ्याच व्यावहारिक सूचना इंदूरचे मल्हारिमार्तंड विजय पत्राचे संपादक रा. वासुदेव गोविंद आपटे बी. ए. यांनीं विनंतिपत्रकाच्या द्वारें केल्या आहेत. त्यांच्या सूचने प्रमाणें यंदा इंदूर दरबारानें वागण्याचें ठरविलें असून खर्चासाठीं ९ हजार रु. ची मंजुरी ही दिल्याचें कळतें. या बाबतींत इंदूरनें घेतलेला पुढाकार अभिनंदनीय आहे.

## स्वराज्यासाठीं लायकी.

हिंदुस्थानचे लोक स्वराज्याचे हक्क मागत आहेत, पण त्यांचे अंगीं स्वतःचें परचक्रापासून रक्षण करण्याची शक्तिच नाहीं, अर्थात् स्वराज्याला ते लायक नाहींत असा आक्षेप कित्येक लोक घेत असतात. त्यांचें ह्मणणें कीं इंग्रजांनीं हिंदुस्थानचें संरक्षण करावयाचें आणि हिंदी लोकांनीं राजकीय सत्ता भोगावयाची हा शुद्ध अन्याय आहे. या आक्षेपाला मि. गांधी यांनीं गोध्रा येथील प्रांतिक परिषदेच्या वेळच्या आपल्या भाषणांत चांगले उत्तर दिलें आहे. ते ह्मणतात कीं इंग्रजांनीं शिपाईगिरी व हिंदी लोकांनीं मुत्सद्देगिरी करावयाची अशी कामाची वाटणी कोणींच कधीं सुचविली नाहीं. ती अगदींच हास्यास्पद आहे. हिंदी लोक मुत्सद्देगिरी बरोबर देशरक्षणाचा भारही स्वतःवर घेण्यास तयार आहेत; आणि त्या साठींच आह्मांला व्हालंटियर होण्याची परवानगी द्या. इकडे लष्करी शिक्षणाच्या शाळा काढा, जहाजें बांधण्याची विद्या आह्मांला शिकवा इ. गोष्टी आज कित्येक वर्षांपासून ते इंग्रज सरकारला सुचवीत आहेत. शस्त्रबळापेक्षां ही माणसाच्या अध्यात्मिक बळावर मि. गांधी यांची अधिक मदार आहे. ह्मणून ते ह्मणतात कीं हिंदी लोकांनीं शस्त्रबळापेक्षां आपलें आध्यात्मिक बळ अगोदर वाढविलें पाहिजे व प्रेमानें सर्वांना जिंकलें पाहिजे. मि. गांधी यांचें हें मत या कलियुगांत व्यवहाराच्या कसोटीला टिकणारें नाहीं. ते ह्मणतात त्या प्रमाणें केवळ प्रेमबळावर विसंबून फ्रान्स, बेलज्यम, इंग्लंड वगैरे मित्र राष्ट्रें राहिलीं असतीं तर त्यांचा जर्मनीपुढें टिकाव लागला असतां काय? मि. गांधी ह्मणतात त्या प्रकारचें अध्यात्मबळ तर आह्मांस पाहिजेच आहे व तें आमचें बळ वाढतें आहे याला प्रमाण मि. गांधी सारखे थोर पुरुष या राष्ट्रांत निर्माण होत आहेत हेंच देतां येईल. पण त्याबरोबर आमचें शस्त्रविद्येचें ज्ञान ही सरकारानें वाढविलें पाहिजे. ह्मणजे स्वराज्यासंबंधाचे आक्षेपक ह्मणतात त्याप्रमाणें मुत्सद्दीगिरीबरोबर शिपाईगिरींत ही आमचे लोक पुढें येतील. सारांश, स्वराज्याची लायकी आमचे ठायीं आहे, ती दाखविण्याचे प्रसंग व साधनें यांची अनुकूलता सरकारानें द्यावी ह्मणजे झालें.

## योग्य मागणी

वऱ्हाड प्रांताचें भाषा, रीतारिवाज, राहणी, वगैरे गोष्टींत मध्यप्रांतापेक्षां मुंबई इलाख्यांतल्या खानदेश, नासिक, नगर, वगैरे जिल्ह्यांशीं अधिक साम्य असतां १९०३ सालीं जेव्हां लार्ड कर्झन साहेबांनीं हा प्रांत निजाम सरकारापासून खंडानें कायमचा मिळविला तेव्हां तो मुंबई इलाख्याला न जोडतां मध्यप्रांताला जोडला! कर्झन साहेबांना लोकमताचे विरुद्ध वागण्यांतच स्वतःच्या बुद्धिमत्तेची मोठी फुशारकी वाटत असे कीं काय कोण जाणे! मध्यप्रांताला जोडला तर जोडला. पण ब्रिटिश मुलखांतल्या रयतेस असलेले हक्कही आमच्या प्रांताला मिळाले नाहींत. वऱ्हाडच्या लोकांविषयीं जो हा अन्याय झाला आहे त्याला कांहीं कायद्याच्या बारीक अडचणी कारण आहेत असें कळतें. पण कायद्याच्या अडचणी दूर करण्यास सार्वभौम ब्रिटिश सरकार असमर्थ असल्याचें हें कदाचित् पाहिलेंच उदाहरण असेल! इच्छा असल्यावर सरकारला कायद्याच्या अडचणीनें प्रतिबंध केल्याचें दुसरें उदाहरण आह्मांस ठाऊक नाहीं. या संबंधांत वऱ्हाडांतल्या लोकमतानें आपला प्रभाव सरकारावर पाडणें अत्यंत अवश्य आहे व तें काम यवतमाळच्या डिस्ट्रिक्ट असोसिएशननें सुरू केलें आहे हें पाहून आह्मांस आनंद वाटतो. या असोसिएशननें वर्तमानपत्राच्या द्वारें आपली तक्रार जनतेपुढें मांडली आहे आणि ती अगदीं वाजवी आहे. वऱ्हाड व मध्यप्रांत यांना समान हक्क कां नसावे? मध्यप्रांताला जर लोकनियुक्त प्रतिनिधि कौंसिलांत पाठवितां येतात तर वऱ्हाडला हा तसें कां करतां येऊं नये. वऱ्हाडच्या लोकांनीं प्रतिनिधि निवडावयाचे आणि सरकारानें त्यांची नेमणूक करावयाची असें कां? त्याचप्रमाणें वऱ्हाडच्या उत्पन्नाचा पैसा वऱ्हाडच्याच सुधारणेच्या कामीं लागेल, इतर प्रांतांना त्याचा फायदा मिळून वऱ्हाड प्रांत कोरडाचा कोरडा राहील असें न होईल असा ही बंदोबस्त तावडतोब होणें जरूर आहे. या संबंधांत आमच्या वऱ्हाड प्रांतातर्फेच्या नामदार सभासदांनीं कौंसिलांत हा मुद्दा चर्चेसाठीं आणिला होता, पण अखेर कांहीं निष्पन्न झालें नाहीं. वऱ्हाडच्या चारी जिल्ह्यांतून या संबंधानें ठिकठिकाणीं सभा भरून हजारों लोकांच्या सह्यांचे अर्ज गेले पाहिजेत व मोठीच चळवळ झाली पाहिजे. हा काळ मुकाट्यानें बसण्याचा नाहीं. आज १४ वर्षें आह्मी स्तब्ध राहिलों हीच चूक झाली. पण हीच चूक अजून ही आह्मांस सुधारतां येईल. वऱ्हाड प्रांताच्या पुढाऱ्यांनीं आपल्या अंगांतला आळस झाडून खटपट केल्यास कार्यसिद्धि होणार नाहीं असें आह्मांस वाटत नाहीं. कार्यसिद्धि होवो न होवो आह्मी स्वतःच्या व भावी पिढ्यांच्या हितास जपणें हें आमचें कर्तव्य आहे व तें न केल्यास त्याबद्दल आह्मांला भावी इतिहासकारांस जाब द्यावा लागेल अशी जाणीव लोकनायकांच्या मनांत पूर्णपणें बिंबली पाहिजे.

## मराठा शिक्षण परिषद्

### (खामगांवास ११ वी बैठक)

ही मराठा शिक्षण परिषद सर्व महाराष्ट्रभर आपल्या कार्य विस्तारानें चांगली नांव लौकीकास आलेली आहे आणि या परिषदेंत आमच्या वऱ्हाडच्या मंडळींनीं उचलेला कार्यभाग ही मोठा असून त्याच्या नांवास शोभण्यासारखा आहे. यंदाचा वार्षिक समारंभ खामगांव येथें तारीख २७।२८।२९ डिसेंबर रोजीं भरणार आहे आणि आजपर्यंतच्या या परिषदेच्या कामाला जें यश आलें आहे तें पाहतां आह्माला आमच्या मराठा बंधूंचा अभिमान वाटतो. आणि यंदाच्या सभेंत शिक्षणाच्या क्षेत्रांत मोठी उत्क्रांती घडून आणणारे संकल्प उदयास येतील असा भरंवसा या परिषदेनें जमवूं घातलेल्या फंडावरून व तिच्या चालकांच्या औत्सुक्यावरून आह्मास वाटूं लागला आहे. यांच्याच शिक्षण विषयक प्रेरणेनें हिंदू समाजांतील उच्चवर्ग ही त्यांच्या बरोबरीनें अधिक वर ओढल्या जातील किंबहुना मराठा बंधूच्या या कार्याला

कांहीं नवें उत्तेजनही मिळेल अशी आम्हास मोठी उमेद आहे.

पण हल्लींच्या राजकीय बाबतींत कांहीं सरकारी बाजूनें क्षुद्र प्रयत्न करण्यांत आले आणि आमच्या मराठा बंधूमध्यें कांहीं फाटाफूट व भेद करण्याचा प्रयत्न ही करण्यांत आला. पण कॉंग्रेसचें ध्येय किंवा होमरूलचें ध्येय हें सर्वांस सारखेंच मान्य असल्यामुळें ही सरकारी प्रयत्नांची गुप्त वेलांटी सरकारच्याच चुकीच्या धोरणाला अधिक अपयशकारक झाली. येथें ही फाटाफूट करण्यासंबंधाची जी अल्पशी जाहिरसभा भरली होती तेथें मॉंटेग्च्या अर्जावर व कॉंग्रेसच्या ठरावावर लोकांनीं भराभर तेथेंच आपल्या सह्या दिल्या. हें श्रेय म्हणजे सात्विक महाकार्याचा प्रसादच होय. जर कांहीं सरकारी अधिकारी इकडे डोळेझाक करितील आणि संघटण होत चाललेल्या सर्व राष्ट्रशक्तींचे तुकडे तुकडे पाडूं इच्छितील तर त्यांचा तो प्रयत्न आपण आंधळे बनून दुसऱ्यांच्या डोळ्याला पट्या बांधून पुष्कळशा खांच खळग्यांच्या पृष्टभागावर आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ खेळण्यासारखें होईल. यंदाच्या अध्यक्षांच्या जागीं मुधोळचे संस्थानिक रा. रा. मालोजीराव नानासाहेब हे लाभणार आहेत.

रा. रा. बाजीराव नामदेव खोबडे वकील खामगांव यांनीं स्वागत मंडळींचे चिटणीस या नात्यानें प्रतिनिधी व प्रेक्षक यांच्या संबंधानें ठरलेल्या फीचे दर व जेवणखाण्याचे दर या संबंधाचें नियमन आमच्याकडे प्रसिद्धीस पाठविलें आहे तें आम्ही पुढील तारखेच्या अंकीं मोठ्या आनंदानें प्रसिद्ध करूं.

## स्वागतम्.

**(राजश्री मॉंटेग यांचें आगमन)**

गेल्या शुक्रवारीं मुंबई बंदरांत आमचे स्टेट सेक्रेटरी येऊन दाखल झाले ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. पक्षनें जे प्रश्न घातले ते सोडविण्याची जशी जबाबदारी धर्मराजावर आली होती तशीच जबाबदारी राजश्री मॉंटेग यांच्यावर आहे. इंडिया जो स्वराज्याचा प्रश्न घालीत आहे त्याचें उत्तर धर्मराजवृत्तीनें राजश्री मॉंटेग श्रीमंत चक्रवर्ती बादशहा यांना कळवितील तरच इंडिया व साम्राज्य यांचा एकजीव अधिक समरसतेनें होणारा आहे. ईश्वरी रसायन शाळेंत हा राष्ट्रीय प्रयोग निःसंशय जगाला या सांप्रतच्या असुरी महायुद्धांत देखील सन्मार्ग दर्शक होईल अशी आम्हांस उमेद आहे.

## वऱ्हाडवृत्त

**शांत पापं**— आमच्या लेजिस्लेटिव्ह कौंसिलमध्यें राजश्री सर बेंजामिन हे विद्यार्थ्यांच्या संबंधाचा व डिस्ट्रिक्ट सर्किलराचा निर्णय मोठ्या कल्याणदृष्टीनें करतील तर तें फार सुंदर होईल.

**उजवा सूर**— आमच्या प्रांतिक कायदे कौंसिलच्या बैठकींत जेव्हां व्हॉइसरायच्या कायदे कौंसिलांत धाडावयाच्या प्रतिनिधीची निवड होईल, तेव्हां राजश्री दादासाहेब खापर्डे हे निवडून यावेत आणि राजश्री दादाभाई हे येऊ नयेत अशी तीव्रतर लोकांची इच्छा आहे आणि हीच गोष्ट खरी होईल असा आमचा उजवा सूर भविष्य सांगतो.

'लोकमान्य नाटक' मंडळींचा परवाच्या रात्रीचा "मराठ्यांचा आत्मयज्ञ" हा खेळ 'हाच मुलाचा बाप' याच्या सारखा लोकप्रिय व सद्बोधक वाटतो.

**राष्ट्रदिन**— तारीख १२ डिसेंबर रोजीं जो हा महोत्सव सर्व साम्राज्यभर मोठ्या थाटावर होणार आहे, त्याची पूर्व पीठिका सरकारी रितीनें जाहिर होईल तर लोकांस या समारभांत सामिल होण्याचा अधिक उत्साह येईल. लढाईंत यशस्वी झाल्यानंतर ज्या चैनी व आनंदीआनंद व्हावयाचे आहेत त्यांची ही पहिली तालिमच दिसते.

**प्लेग**— आकोल्यास प्लेगाचे मृत्यु दोनचार या प्रमाणांत कधीं कधीं होतात; पण सर्वोत्कृष्ट गोष्ट कीं लोक वनोद्यानांत दिवाळी करण्याच्या खटपटींत आहेत आणि सृष्टी हाच रामबाण उपाय शिकविते.

राजश्री ऑर्चर्ड पोलीस सुपरिंटेंडेंट यांच्या जागीं राजश्री व्हाइट हे येऊन दाखल झाले.

**वीरश्री**— राजश्री कान्हेन्टी उमरावतीचे पोलीस सुपरिंटेंडेंट यांच्या प्रोत्साहनाच्या संभाषणामुळें सुमारें १७ लोक एकदम सैन्यांत भरती झाले. वीररसाचा परिपोष करणारे असेच प्रेमळ उद्योग कितीतरी पाहिजेत.

रा० रा० गोपाळ नागोजी कोठेकर वकील यवतमाळ यांच्या कडून १ हजार रुपयांचा जात मुचलका व २ जामिनदार घेण्यांत येऊन त्यांच्या संभाषणाबद्दल सकरी निषेध करण्यांत आला. या राजद्रोहाबद्दल अपील व्हावयाचें आहे.

**कापूस**— तारीख ३ नोव्हेंबरपर्यंत येथें गुदस्ता १४८३७ कापसाच्या गाड्या आल्या होत्या तेथें यंदा १२०१२ गाड्या आल्या आहेत. या आकड्यांची फोड पाहतां उमरावती जिल्ह्यांत यंदा कापसाचें पीक चांगलें असून त्याच्या खालोखाल बुलढाणा जिल्हा आहे. पण आकोला व यवतमाळ हे जिल्हे मध्याच ८ आणे पीक दाखवितात.

**सत्याग्रह आश्रम**— या आश्रमांत जाऊन राहिलेले आमचे सन्मित्र रा० रा० किशोरीलाल मश्रूवाले हे परवा २ दिवस येथें आले होते, तेव्हां त्यांनीं आपल्या मित्रमंडळीस राजश्री गांधी यांचें चरित्र सांगितलें आणि सर्वजण आनंदाश्रूंनीं सद्गदीत झाले. त्या आश्रमाची पावनशक्ती सर्व राष्ट्राला पुनीत करण्याएवढी खरोखर दांडगी आहे, आणि कदाचित् त्यांचा प्रत्यक्ष सहवासही येत्या २-३ महिन्यांत घडण्याचा सुयोग दिसतो.

**पंढरी**— येत्या कार्तिकी एकादशीला रेल्वेच्या गैरसोयीमुळें यात्रेकरूंनीं मनांतल्या पंढरपुरांत चंद्रभागेचें स्नान करून राष्ट्रीय कामाकडे हीं धर्मवृत्ती लावण्याची संधी दवडूं नये.

**सुट्टी**— दिवाळीच्या महोत्सवानिमित्त सालाबादप्रमाणें ता० १९ नोव्हेंबरच्या अंकाची आम्ही सुटी घेऊन त्याच्या पुढील सोमवारीं वाचकांची पुनः आनंदानें भेट घेऊं.

## नोटीस.

वि० सेकंड ॲडिशनल डि० ज० साहेब आकोला यांचे कोर्टांत-

कि० मु० नंबर २२ सन १९१७
चौ० ता० ८-१२-१९१७

अर्जदार कवतीका मर्द चंद्रभान कुणबी रा० घुंगसी ता० मुर्तिजापूर अर्ज सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याबद्दल सर्वत्र लोकांस या नोटिशीनें जाहिर करण्यांत येते कीं अर्जदार कवतीका मर्द चंद्रभान इनें आमचे कोर्टांत मयत चंद्रभान वा सोनाजी कुणबी रा० घुंगसी ता० मुर्तिजापूर याचे इस्टेटीबद्दल सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याविषयींचा अर्ज केला आहे. तरी सदरहु मयताचे इस्टेटीशीं ज्याचा कांहीं हक्क संबंध असेल त्यांनीं आपले कागदोपत्रीं पुराव्यानिशीं आमचे कोर्टांत तारीख ८-१२-१९१७ रोजीं हजर राहावें. सदरहु तारखेस कोणी हजर न राहिल्यास तक्रार ऐकली जाणार नाहीं व वरील अर्जदार इजला सक्सेशन सर्टिफिकेट दिलें जाईल कळावें. तारीख १०-११-१७ इ.

सही
N. G. Subhedar
2nd Addl District Judge
Akola

N. N. 452


# पाहिजे.

दिवाणी, फौजदारी, व मुलकी कोर्टांच्या कामाकरितां अनुभवीक व इंग्रजी जाणणारा असा मनुष्य पाहिजे. खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा अगर समक्ष भेटावें.

सही
गुलाबराय गोविंदराय
दुकान-आकोला (वऱ्हाड)
नो० नं० ४५३

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखाना:—मुर्डी.

**मदनामृतसंजीवनी.**

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भासंबंधी मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळंतरोग, मु॰ मुर्तिजापूर ता॰ कुंडा दुष्टमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयांचे आंत वेगळा टपालखर्च ९ आणे पडेल दर एकदम ३१ गो० १ रु० ७१ गो० २ रु० १६१ गो० ४ रु० २७१ गो० ६ रु० ११० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**— पानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगींस हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**— कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तीडक, मुत्रांची लाळा, संकोच, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकेत जाते. असें रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १ भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवूं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत. यांशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, थोक रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. इ० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा करूं. माल मागविणेचा पत्ता

नवबरे द.
१ माधव देवराव चिवरकर पांडे
आमानी द. खुद

नो० नं० २२

ता. नं. ४६४


...चा प्रयत्न ...
...वायतीच्या नकाशा-

गरीबांस फुकट

## रामबाण मलम

( कोणत्याहि त्वग्रोगावर )
गुणकारी किं० ६ आणे.

## केशनाशक पूड.

( ९ आणे )

(क्याटलॉग फुकट) पत्ता. व्ही. आर. मुळे नांदूरा. G. I. P.

नो० नं० ३७०


### नोटीस.

चि. भुजापा नागापा लिंगायत वाणी छपरे रा. मौजे माजरम नजीक गडग ता. बेटगी जि. नांदेड इलाके मोगलाई यांसः –

खालीं सही करणार रा. रिसोड ता० वाशीम जि० आकोला यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, माझी सासु नामे गनुबाई नागापा ह्मणजे तुमची आई इनें माझी मुलगी सेवंती इजला आजुळास भेटण्याकरितां ह्मणून नेली आणि तेथें तुह्मी कांहीं एक विचार न करितां माझे संमती शिवाय सदर्हू मुलीशी तुह्मी गंधर्व करून घेतल्याचे मजला परस्परें समजते. असे जर खरे असेल तर तुमचे आईनें व तुह्मी नात्या संबंधानें किंवा सपिंडा संबंधानें कांहींच विचार केला नाहीं. सदर्हू मुलगी तुमची भाची आहे. ह्मणजे तुमचे बहीणीची मुलगी आहे असें असतां तुह्मी त्या मुलीशी माझे संमती वाचून वरील नात्यानें गंधर्व तुह्मांस कसे करून घेतां येते. हा नात्या संबंधानें व जाती संबंधानें मोठाच गुढ प्रश्न आहे तुह्मी गंधर्व केलेच नसेल तर चांगलेच आहे. पण जर गंधर्व करून घेतले असेल तर ही नोटीस पावतांच फारकत करून ताबडतोब पाठवावी. तसे तुह्मी न केल्यास ठकबाजी करून तुह्मी गंधर्व त्या मुलीसी करून घेतले. अशा अपराधाबद्दल तुमचेवर फौजदारी कोर्टात फिर्याद करणें भाग होईल. तशी फिर्याद तुमचेवर कां करूं नये याचे कारण नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत कळवावें. असेंही तुह्मी न केल्यास तुमचे विरुद्ध फौजदारींत फिर्याद केली जाईल किंवा गंधर्व झाले नाहीं असें समजले जाईल झाले असल्यास तुमची फारकती संबंधानें संमती आहे असें समजले जाईल व तिजला दुसरा नवरा करून देण्यांत येईल. त्याची जोखीम तुमचेवर आहे. तारीख २९।१०।१९१७ इसवी

दस्तुर रंगनाथ तुकाराम खर्डेकर

सही

१ यादव ईश्वरासेटे राहणार रिसवड दस्तुर खुद

नो० नं० ४४७


### जाहिरात

[illegible]शैव धर्माभिमान्यांस विनंती.

पत्ता- फत्तेखेर्डा [illegible] शंकर जिरे यम मेकॅनिक रिपेअरर नांदुरा मुक्काम जि० ( बुलडाणा ) स्वा- [illegible] न होऊन आहेत.

नो. नं. २८४


त्याबद्दल आपणा सर्वांस अत्यंत अभिमान असणें स्वाभाविक असून कल्याणकारक आहे. हल्लीं पटावर असलेले महाराज यांचें वर्तन गैरचालीचे असलेमुळें व दुसऱ्याहि इतर कारणामुळें व व संस्थेची स्थिती सर्व बाजूनीं खालावली आहे इकडे यापुढें दुर्लक्ष केल्यास त्याचा परिणाम संस्थानचा नाश झाल्यावांचून राहणार नाहीं. तेव्हां संस्थानचा नाश न व्हावा व येथील कारभार सुरळीत चालावा ह्मणून विचार करण्याकरितां मिती कार्तिक शुद्ध ९ रोज शुक्रवार तारीख २३।११।१७ इ. रोजीं फत्तेखेर्डा येथें श्री पलसिद्धाचे मठांत सभा भरविणार आहों तर त्यावेळीं आपण अगत्य अगत्य येण्याचे करावें. आपण न आल्यास सभेस पास होणाऱ्या ठरावास आपली संमती पूर्ण आहे असें आह्मी समजूं ता० २०।९।१७ इ.

सह्या पंचाच्या

पुंजापा सदाशिव आपा वरवंडकर द० खुद

शिवापा कडापा जानेफळ द० खुद

नारायण देवापा जानेफळकर द. खुद

रामाआपा शंकरआपा देउळगांव माळी द० खुद

नागापा आपासेट देउळगांव माळी द० खु.

बापुआपा गंगारामआपा मेरा बु॥ द० खु०

तुकाराम येलापा मेरा बु॥ द. खु.

शंकर परशरामआपा नागझरी द. खु.

गोपाळ शंकरआपा रा० खेर्डा द. खु.

नो० नं० ४४८

[illegible]

### नोटीस.

रा. रा. नेमाजी वा विठोबा जैन राहणार डोंगरगांव ता. मुर्तिजापूर जि. आकोला यांसः—

मी खालीं सही करणारीन बयना मर्द नेमाजी जात जैन राहणार आकोला ता. व जि. आकोला इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, मी आज चार वर्षां पासून हुशार होऊन आज पावेतो मजला तुह्मी नेले नाहीं. तर आतां आपण चार वर्षांची खावटी रुपये ३०० घेऊन येणें व आपण जातीभ्रष्ट झाला आहांत, तर त्या करितां पांच गांवचे पंच येथे घेऊन येणें, व मजला घेऊन जाणें. ही नोटिस पावल्या तारखेपासून आठ दिवसाचे आंत घेऊन जा, नाहीं तर मी हीच सोडचिठ्ठी समजून दुसरा घरठाव करणार. कळावें ही नोटिस लिहिली असे तारीख १।११।१७ इसवी

सही

बायना मर्द नेमाजी जैन राहणार आकोला नि॥ हातची बांगडी द. गुलाबरावजी जैन रा. आकोला

नो. नं. ४४९

### नोटीस.

नोटिस बेशमी येडू वा॥ भवाणी राहणार भोपळवरी तालुके मोकरदन जिल्हा औरंगाबाद ( मोगलाई ) पोष्ट देऊळगांवराजा तालुके चिखली (वऱ्हाड)

यांसः—

शामाबाई नवजे नारायण पाटील दंदले राहणार खल्याळ गव्हाण तालुके चिखली इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, माझा नवरा नारायण पाटील यास मयत होऊन अदाज आठ वर्षें होत आहेत, त्यावेळीं माझा हल्लींचा अज्ञान मुलगा सरासरी १ वर्षाचा होता. पुढे माझे नवऱ्याचे हातचे कर्ज रुपये २४०० चे होते त्याबद्दल सावकाराचा हुकुमनामा होऊन जप्ती आली. मी बाप मनुष्य व मुलगा बळवंत वा॥ नारायण हा अज्ञान व तुह्मी मुलाचे बापाचे बहिणीचे चिरंजीव तेव्हा तुह्मी आह्मांस भरंवसा दिला कीं, मी सदर्हू सावकाराचे रुपये भरतो तुह्मी ज्यावेळीं मुद्दल रुपये द्याल त्यावेळीं तुमची जिनगी तुह्मास वापस करीन, व त्याप्रमाणे तुह्मी रुपये २४०० सावकारास देऊन हरासांत नंबर तुमचे नांवें करून घेतले. आजपर्यंत तुह्मी दिलेल्या भरंवशाचे वचनावर भरंवसा ठेऊन आह्मी होतो, परंतु आह्मांस असें समजते कीं, सदर्हू शेतें तुह्मी दुसरे लोकांस विक्रीस काढली आहेत, तरी हे तुह्मास उचीत नाहीं. अज्ञानाचे हित करणें हें तुमचे कर्तव्य आहे. करितां ही नोटिस देणें भाग पडले. तरी या नोटिशीवरून तुह्मास कळविण्यांत येते कीं तुह्मी जी नारायण पाटील याची इस्टेट हरासांत घेतली ती त्याचे अज्ञान मुलाचे हिताकरतांच ह्मणून इतक्या थोड्या किंमतीस घेतली आहे. ती अज्ञानाची इस्टेट असल्यामुळें सदर्हू अज्ञान अगर त्याचे तर्फे मी ज्यावेळीं तुमचे मुद्दल रुपये चोविसशे तुह्मास देईन त्यावेळीं तुह्मी वापस दिली पाहिजे असें तुमचेकडून न झाल्यास व तुह्मी त्याची विक्री वगैरेचा व्यवहार केल्यास तो रद्द असे. त्याबद्दल अज्ञान मुळींच जबाबदार नाहीं. फक्त वरील रकम घेऊन तुह्मास सदर्हू अज्ञानास त्याची इस्टेट वापस द्यावी लागेल, व ती तुह्मी आपसांत न दिल्यास अज्ञान अगर त्याचेतर्फे मी तुमचेकडून कोर्टमार्फत घेईन तसेच आणखी

### जाहिर नोटिशीनें

रा. सतापा दंदले राहणार खल्याळ गव्हाण ता. चिखली जि. बुलढाणा पोष्ट देऊळगांवराजा यांस कळविण्यांत येते कीं येडू वा॥ भवाणी भोपळे यानें जी मयत नारायण पाटील याची मौजे गव्हाण येथील इस्टेट ह्मणजे आंब्याची पट्टी व गायचराई ही शेतें हरासांत घेतली आहेत ती माझी अज्ञान मुलगा बळवंत वा॥ नारायण याचे मालकीची इस्टेट आहे हे वरील नोटिशीवरून आपणा सर्वांस समजले करितां सदर्हू शेतें कोणी गहाण खरेदी वगैरे घेऊं नयेत घेतल्यास तीं त्याला अज्ञान वयांत आल्यावर अगर त्याचे तर्फे मला येडु यानें ज्या रकमेस तीं जमीन घेतली ती मुद्दल रकम वापस देऊं, त्यावेळीं द्यावी लागतील कळावें. तारीख ३१।१०।१९१७ इसवी

सही

शामाबाई मर्द नारायण पाटील दंदले राहणार खल्याळ गव्हाण तालुके चिखली पोष्ट देऊळगांव राजा निशाणी आंगठा

नो० नं० ४५०

### जाहिर नोटीस

रा. रा. हिरालाल गणपतलाल अगरवाले सावकार राहणार मौजे भांबेरी पोष्ट भांबेरी तालुके आकोट यांसः—

खालीं सही करणारीन इजकडून या जाहिर नोटिशीनें जाहिर केले जाते कीः—

१ मौजे भांबेरी ता. आकोट येथील सर्वे नंबर २ एकर २०॥२८ गुंठे आकार रुपये ५७ हा संबंध नंबर माझी सवत लक्ष्मी मर्द रामजी इनें बनवारीलाल शेट यांना रुपये सहा हजाराला माझे निमे हिस्या सुद्धा खरेदी दिला होता.

२ माझा निमे हिसा विकला ह्मणून मी तिजवर दिवाणींत फिर्याद करण्या करितां तुह्मास कुलमुखत्यारपत्र दिले. व फिर्यादीचे खर्चासाठीं मजपाशीं रुपये नसल्यामुळें मी तुह्मासच सावकार करून वरील नंबरांतील एक द्वितीयांश हिस्सा माझे मालकिचा व मौजे किनखेड येथील सर्वे नंबर २२ यांतील एक द्वितीयांश हिस्सा माझे मालकीचा असे रकम रुपये ४०० चारशेमध्ये तुमचेपाशीं गहाण ठेऊन त्याचा भरणा नोंदणार अंमलदारासमक्ष घेऊन गहाण एकत्र कुटुंबांतील तुमचा भाऊ शामलाल गणपतलाल याचे नांवानें तारीख ३१।१।१९१७ रोजीं लिहून नोंदून दिले.

३ गहाणखत नोंदून दिल्यावर लागलीच कचेरीचे बाहेर येऊन संबंध रकम माझे मालकीचा एक द्वितीयांश हिस्सा सोडून घेण्यासाठीं माझे सवतीवर व खरेदी घेणारावर दिवाणींत दावा करण्यासाठीं रकम तुमचे पदरांत घातली.

४ मुखत्यारपत्राचे आधारें तुह्मी दिवाणींत फिर्याद आकोले येथील मुनसफ नंबर २ याचेकडे दिवाणी मुकदमा नंबर २३६ सन १९१७ ची फिर्याद रा. रा. यशवंतराव ओक वकील यांचे मार्फत तुह्मी दाखल केली. त्या फिर्यादीचा निकाल चौकशीची तारीख ९।११।१९१७ चे आंत झाल्यामुळें पुढें काम चाललें नाहीं.

यासाठीं आपल्यास या नोटिशीनें कळवितें कीं फिर्यादीस खर्च जो झाला असेल तो मजला समजाऊन द्यावा. व ती रकम तुह्मी रुपये ४०० मधून कापून घ्यावी. व बाकीची रकम रुपये जे राहतील ते गहाणाचे रकमेंत वसुलांत घ्यावे. व गहाणापैकीं मुद्दल आणि व्याज राहील ते मजला मागून घ्यावे, मी देण्यास तयार आहे. आणि माझा लिहून घेतलेला गहाणाचा रोखा मजला वापस द्यावा व आतां माझे कांहीं सरकारी काम राहीले नसल्यामुळें मी तुह्मास दिलेला मुखत्यारनामा आज तारखेपासून यापुढें रद्द केला आहे. तर या मुखत्यारनाम्याचे आधारें यापुढें तुह्मी माझे नांवानें कोणता ही व्यापार धंदा करूं नये. ही नोटिस दिली सही मुक्काम आकोला ता. ९।११।१९१७

सही

१ लुंगाई मर्द रामजी कुणबी पा. भारसाकळ नि॥ खुद आंगठा

नो० नं० ४५१

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-N. No150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१] आकोला—सोमवार तारीख २६ माहे नोव्हेंबर सन १९१७ ई० [अंक ४७


### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

ता. १ जुलै पासून पुढें आणखी प्रसिद्ध होईपर्यंत व्याज दरसाल दर शेकडां ४ रुपये याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।१०।१७ } Lyon Scott एजंट

नो नं १

---

### अनुभवानें खात्री



**पटेल !!** जर आपणास आपले हारमोनीयम अगदीं वाईट स्थितींतील नव्या प्रमाणें माफक दरांत दुरुस्त करून घेणें असेल तर आजच खालीं लिहिलेल्या पत्त्यावर व्यवहार करा. अनुभवानें खात्री पटेल. शिवाय नव्या पेट्या आमचे जंगी कारखान्यांत ऑरडर प्रमाणें अडव्हान्स आल्यास तयार मिळतात. त्याचे दर—हात पेटी सिंगल रीड २० ते २५

" डबल रीड ३० ३५-४०-५०

तीनलाइनी क्याझरेल सुराची किं. रु. ९५.

पाय पेटी सतक ३। ६० ते ८० रु.

" " " ३॥ ८५ ते ९५ रु.

" " " ३॥। १०४-११५ रु)

" " " ३॥। तीन लाइनी क्याझरेल सुराची १८० ते २१० रु.

पत्ता—रामचंद्र बोसनला हार्मोनियम मेकर व रिपेअरर नांदुरा जि० (बुलडाणा)

नो. नं. २८४

---

# लक्षांत ठेवा.

कीं येथें आमचेकडे कमिशनचे (अडतीचे) काम चालत असून आम्ही येथें मिळणारा कापड, किराणा, स्टेशनरी, कांचसामान, दळण्याच्या गिरण्या **जीन व प्रेसचें सामान** वगैरे वगैरे सर्व प्रकारचा माल माफक कमिशन घेऊन भावाची पूर्ण चौकशी करून पाठवितो. व बाहेर गांवाहून विक्री करितां आलेला माल विकून देतो तसेच सायकल, व सायकलला लागणारे सर्व सामान मोटारचे व घोडे गाडीचे गाद्यांचे कापड दुसरे लागणारे सामान, खिशांतील दिवे, व दुसरे विजेचे सामान, त्यापैकी वगैरे तेल पुरवितो. एकवेळ आरडर देऊन कामाचे चोखपणाबद्दल खात्री करून घ्या.

डब्ल्यु. व्ही. पिंगळे आणि सन्स

पत्ता—ठाकुरद्वार रोड, काळकादेवी पोष्ट मुंबई नंबर २

नो. नं. ३१८

---

४० रोगावर एकच जालीम औषध

**सुधासंजीवनी**



यानें अजीर्ण, खोकला, दमा, संधीवात, प्रमेह, प्रदर, धुपणी, संग्रहणी, अतीसार वगैरेवर तात्काल गुण येतो. याची एक बाटली जवळ ठेवणारास वैद्याची गरज राहणार नाहीं. एकदाच खातरी करा किंमत रु. १ टपाल खर्च निराळा. नमुना ।-। अनुपान पत्रकसोबत. गांवोगांव एजंट पाहिजेत. भरपूर कमीशन. आजच पत्र लिहा.

संजीवनी ऑफिस

खामगांव (वऱ्हाड)

---

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारेंस वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हे औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, तेजनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विका[र] ताबडतोब दूर होतात किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन माफकाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुनली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H L. Batliwala Sons & Co. Ltd.**

N. N. 6 Dadar Bombay


---

### नोटीस.

विद्यमान सब जज साहेब कोर्ट खामगांव

सक्सेशन मु. नं. ८ सन १९१७

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, पेठ खामगांव येथें रुकीनाबेग मर्द शेखकादर बक्ष जात मुसलमान ही ता. ८-४-१७ रोजीं मयत झाली. मैतास वारस हमीनाबेग मर्द शेख रमजान रा. मीरपूर ता. कुंडा जि. प्रतापगड व करीमबक्ष वा शेखबक्कर व आलाबोदीन वा शेखबक्कर असे असून मैताचे इस्टेटीबद्दल वारसाचे सर्टीफिकेट मिळावें म्हणून करीमबक्ष व आलाबोदीन यांनीं या कोर्टास अर्ज केला आहे करितां या लोकांस वारसाचें सर्टीफिकीट कां दिलें जाऊं नये याचें कारण दाखविण्या करितां मैताचे आणखी जे कोणी वारस असतील त्यांनीं ता. २२-१२-१७ रोजीं आमचे समोर हजर व्हावें. कळावें ता. १५-११-१७

सही

R. M. Wathodker

Sub Judge

Khamgaon

N. N. 462

---

### जाहिरात

वऱ्हाडप्रांत, वर्धा व नेमाड जिल्ह्याचे शेतकीचे वार्षिक संमेलन व प्रदर्शन "Our Day" (आवर डे) चे प्रदर्शन ज्या ठिकाणीं होणार आहे, त्याच ठिकाणीं भरविलें जाणार आहे. शेतकीचें प्रदर्शन ता. १२ ते १६ डिसेंबर सन १९१७ पावेतो उघडे राहील. तें मोफत पाहण्यास सर्वांस मोकळीक आहे. ता. १६ डिसेंबर सन १९१७ रोजीं शेतकीचें वार्षिक संमेलन भरेल त्यांसही सर्वत्रास येण्यास मोकळीक आहे. कळावें. ता. ६ नवंबर सन १९१७

सही

D. R. Dongere

For Deputy Commissioner

63

---

### जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस खालीं सह्या करणार १ शाहाजी वा माहादजी व भवानी वा शाहाजी नवघरे मराठी राहणार मौजे पांगरी नवघरे प्रगणे व तालुके वाशिम जिल्हा आकोला

यांजकडून:—

विनय पूर्वक कळविण्यांत येते कीं, शाहाजीचा नातु व भवानी याचा मुलगा नामें सोनाजी वा भवानी अजमासे वय २० राहणार मौजे पांगरी नवघरे तालुके वाशिम याची वर्तणूक चांगली नसून दुर्वर्तन करितो. सबब त्यास आम्ही घरांतून काढून दिलें. त्यास सहा ६ महिने झाले आहेत. त्याला कर्ज काढण्याची मुळींच जरूरी नाहीं. शाहाजीला १ सुर्याजी व २ भवानी आणि ३ अर्जुना अशी ३ तीन मुलें असून या सोनाजी शिवाय ७ सात नातु आहत. व भवानी यांस सोनाजी शिवाय ३ तीन मुलें आहेत. व सूर्याजी, अर्जुना, यांस ही मुलें आहेत. आम्ही सर्वत्र एके ठिकाणीं राहतों. आमचे पैकीं सोनाजी वा भवानजी हा नीट चालीचा नाहीं. त्यास आम्ही चांगले प्रकारें वागवित असतां वागत नाहीं. लोकांचे फंदानें वागतो. सोनाजी हा आमची स्थावर इस्टेट इतर लोकांस लिहून देण्याचे विचारांत आहे असें समजलें आहे. सबब या जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, सोनाजी वा शाहाजी नवघरे रा. पांगरी नवघरे याला कोणी कर्ज देऊं नये. अगर त्याजपासून कोणी ही कोणत्या ही प्रकारे स्थावर इस्टेटीबद्दल दस्तैवज करून घेऊं नये. कोणी कर्ज दिल्यास त्या कर्जाबद्दल आम्ही अगर आमची इस्टेट जबाबदार राहणार नाहीं. आम्ही जिवंत आहों तो पावेतो आमचे इस्टेटीवर सोनाजी याचा कोणत्या ही प्रकारे हक्क नाहीं. करितां या नोटिशीनें सर्वत्रास जाहीर केलें आहे. कळावें हे विनंती. तारीख १६ माहे नवंबर सन १९१७ इ. दस्तुर दामोदर महादेव अर्जनवीस वाशीम

सह्या

१ शाहाजी वा महादाजी याची नि. दस्तुर वर प्रमाणें

१ भवानी वा शाहाजी याची नि॥ दस्तुर वर प्रमाणें

साक्ष

१ मारोती सखाराम पटवारी राहणार पांगरी नवघरे द. खुद

१ हरी वा यमाजी राहणार पांगरी नवघरे द. खुद

१ माधव देवराव चिवरकर पांडे आमानी द. खुद

नो. नं. ४६४

## नोटीस

**नोटीस कलम ११ आक्ट ८ सन १८९० प्रमाणें.**

कि. दि. मुकद्दमा नंबर ९९ सन १९१७ इ. विद्यमान डिस्ट्रीक्ट जज्ज साहेब यांचें कोर्ट

मुक्काम आकोला पश्चिम वऱ्हाड

नांव केशवराव

बापाचें नांव व्यंकटराव

जात सोनार राहणार सावळापूर

तहसील एलिचपूर जिल्हा उमरावती

च्या अल्पवयी बहीणा

उमर वर्षें १६

राहणार सावळापूर ता. एलिचपूर तहसिलीचे (२) शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालनकर्ता (१) नेमला जाण्या विषयींच्या अर्जा संबंधीं—

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं सदर्हू अर्जदारानें सदर्हू अल्पवयीचें (२) शरीर व इस्टेट रक्षणकरण्यासाठीं पालन कर्ता नेमला जाण्या विषयीं अर्ज केल्यावरून सदर्हु अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख १९ माहे डिसेंबर सन १९१७ इ. रोजीं नेमिली आहे. त्यावरून अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदर्हू अर्जदाराच्या अर्जाबद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यांस जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हजर झाले पाहिजे; आणि त्यांस असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख ९ माहे ११ सन १९१७ इ. रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्या निशीं दिली

सही

W. R. Dhobley

डि. जज्ज

पश्चिम वऱ्हाड

नो. नं. ४९५ आकोला

## नोटीस.

नोटीस बेशमी भगवंतराव विठोबा देशमुख रा. मौजे गुगळी ता॥ मलकापूर जि. बुरडाणे.

यांसी:—

खाली सही करणार इजकडून नोटीस देण्यात येते कीं मी तुमची सून असून तुमचे माझे बनत नसल्यामुळे आपण चार पंचासमक्ष अन्नवस्त्रा बद्दल दरसाल ७५ पंचाहात्तर रुपये देण्याचे कबूल केले व सदर्हू रुपये श्रावण शु॥ १३ च्या दिवशी देण्याचा करार केला आहे. त्याप्रमाणे सन १३२७ फसली सालचे रुपये आपणाकडून गेल्या श्रावण शु॥ १३ स यावयाचे असून तेव्हां पासून आपणास बरेच वेळ मागणी केली असतां आपण आज देऊं उद्या देऊं अशी टाळा टाळी करीत आहा. मजला खर्चाची टंचाई असल्यामुळें सावकाराकडून कर्ज काढावे लागलें. तरी [illegible]१२।१०।१७ या नोटीसीनें कळविण्यांत येते कीं [illegible] चे कडेस पाठवि[illegible] [illegible] नोकरींत असल्या[illegible]

ही नोटीस पावल्यासून आठ दिवसाचे आत माझे रुपये सदर्हू सुद्धां व या नोटीसीचे खर्चासह मजला आणून देउन मझी पावती घ्यावी तसें न केल्यास मजला रिती प्रमाणे कोर्टांत दावा आणावा लागेल. व खर्चाचा बोजा तुमचेवर राहील कळावे तारीख १२-११-१९१७ इसवी.

सही.

गंगाबाई जवजे त्रिंबकराव देशमुख रा. मौजे सिदखेड ता. मलकापूर जि० बुरडाणे.

नो० नं० ४९६

## नोटीस.

नोटीस बेशमी सखाराम वा॥ शामु माळी राऊत रा० पारखेड ता० खामगांव

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी या पूर्वी ह्मणजे ता० ४-१०-१७ ला वऱ्हाडसमाचारमधून आपणांस नोटीस दिली होती. त्याप्रमाणें आपणाकडून कांहींच एक वर्तन घडून आलें नाहीं सबब आतां या नोटिशीनें असे जाहिर करते कीं ही नोटीस आपणांस पोहोंचो अगर न पोहोचो किंवा आपणहून न घेवो मजला आपले नोटीस पावल्याचे पोंचेचीही कांहीं एक गरज नाहीं. कारण पूर्वीची नोटीस हीच माझी फारकती आहे. व त्यावरून मजला आतां दुसरा घरठाव करण्यास मजला कोणत्याच प्रकारची अडचण नाहीं व त्याजवरून तुमचा माझे वरील नवरेपणाचा हक्क ही उडाला. तुमचा व माझा कोणतेच प्रकारचा संबंध राहीला नाहीं. व ही नोटीस देण्याचे ही कारण उरले नव्हतें, परंतु केवळ जनापवादास्तव ह्या दुसऱ्या नोटिसीनें तूं तुझे मनांत सारासार विचार करून तूं तुझे मन शुद्धीवर आणून तुझी तूं नुकसान न करितां यथा योग्य करावयाचे असल्यास ही नोटीस पावल्यापासून तीन दिवसाचे आंत जे कांहीं करावयाचे ते करावें. नाहींपेक्षां मी तुझी फारकतीची वाट न पहतां लागलीच गंधर्व लावीन. कळावें ही नोटीस दिली असे ता० ८-११-१७ इ०

सही

भुलाबाई मर्द सखाराम माळी रा० माटरगांव नि० आंगठा

नो० नं० ४९७

## जाहिर नोटीस

गंगाभागेरथी भोल्ही मर्द तुकाराम सोनटके तेली रा० मौजे निमकर्दा तालुका बाळापूर जिल्हा आकोला पोष्ट पारस

ईसः—

खालीं सही करणार याचेकडून या जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं आमचा तुकाराम वा॥ जानु सोनटके तेली हा साक्षांत चुलत भाऊ होता. त्याची तूं बायको आहेस. तो मेल्यास अजमास दाहा वर्षें झालीं. तो मेल्यावर त्याची स्थावरजंगम जिनगी आह्मी तुझे ताब्यांत तुजला उपभोग घेण्यासाठीं ठेवीली होती व आमचे चुलत भावास एक मुलगी नमे लुगी ही असल्यामुळें तिजला साडीचोळी करण्यासाठीं ठेविली होती आतां आज पंधरा दिवस झाले मुलगी मेली व तिजला कोणी संतान नाहीं आणि तुझा अगदी वृद्धापकाळ झाला असून तुझा फार दिवस वाचण्याचा भरंवसा नाहीं आणि म्हातारपणामुळें आतां तुझी बुद्धी ठिकाण्यावर नाहीं. तुजला आम्हीं आमचे घरी आणतो तर तुझा जावई पुंजाजी ही सर्व इस्टेट गिळून टाकण्यासाठीं तुजला फेरप देतो आणि तो तेथील कामकर्ते पाटील पटवारी यांना मदतीला घेऊन तुझेपासून शेताचे व घराचे लेख लिहून नोंदून घेण्याचे विचारांत आहे. परंतु कायद्यानें तुजला त्यास कोणत्याच प्रकारचा लेख करून देतां येत नाहीं व त्याचा बोजा ही तुझे मरणानंतर त्या जिनगीवर बसुशकत नाहीं यासाठीं ही आह्मी तुजला नोटीस देतो कीं शेत उभे पीका सुद्धां आणि घर आमचे ताब्यांत दे आणि सोने तोळे ३-१ चांदीची सरी २ को परवाळ्या गुंडवाळ्या नथ एकंदर जी जंगमाजिनगी आमचे ताब्यांत द्यावी. जवारी बैल ह्मैसरमेंत जी आहे ती सर्व आणि तूं आमचे घरी यावे आह्मी तुझे मरेपर्यंत प्रतीपाळ करून मेल्यावर क्रियाकर्म करूं. याप्रमाणें ही नोटीस पावताच न केल्यास आह्मी तेथें येऊन आमचे ताब्यांत सर्व जिनगी शेतांतील उभे पीकासुद्धां घेऊं ही नोटीस दिली सही मुक्काम आकोला तारीख १९।११।१९१७

सही

१ दत्तु मानाजी नि. खु रा. उमरी

१ सुन्या वा॥ कुकाजी नि० खु. रा. उमरी

१ दवलत वा॥ जानु नि. खु. रा उमरी

१ सीताराम वा॥ मानाजी नि० खु. रा. उमरी ता. आकोला

नो० नं० ४९८

## नोटीस

नोटीस बेशमी शिवलिंग ऐय्या राहणार फत्तेखेर्डा ता० मेहकर यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस द्वारें सर्वत्रांस जाहिर रीतीनें कळविण्यात येते कीं, शिवलिंग ऐय्या गुरु विश्वनाथ ऐय्या याला आह्मी संस्थानांतून १२ वर्षें काढून दिला होता व त्यानंतर त्यांनीं आमची फार फार विनंती केली यामुळें पुन्हा त्या इसमास संस्थानांत घेतले व कांहीं दिवसानंतर तो इसम विनहुकुमानें व बेकायदेशीर चालीनें व अनेक प्रकारची संस्थानची नुकसानी करूं लागला यामुळें त्या इसमाचा संस्थानच्या व्यवहाराशी कांहीं संबंध नाहीं. त्याच्याशीं जर कोणी कांहीं मठाचे बाबतींत व्यवहार केला तर मठ त्याचा जबाबदार राहणार नाहीं अगर त्याला मठाचे शेतीचा अगर इतर कांहीं बाबतींतील माल, पीक, पैसावगैरे जर कोणी दिला तर त्याबद्दल मठ जबाबदार राहणार नाहीं व तो पुन्हा न्यायाअंती योग्य रितीनें असूल केला जाईल. कळावें द० मलकारजूनऐय्या राहणार फत्तेखेर्डा आज ता० ११।११। १९१७ इ०

सही

गंगाधर श्रीगुरु पलसिद्ध महास्वामी श्रीक्षेत्र मठ महासंस्थान फत्तेखेर्डा द० खु०

नो० नं० ४९९

## जाहीरखबर

आमचा कसबे आकोले येथील रजपुत पुऱ्याचे दक्षिणेकडील मळा विकावयाचा आहे. या मळ्यांत एक मोठी चार मोठी चालण्यासारखी विहीर असून एक मोठा बंगला आहे. शिवाय नौकर लोकवगैरे राहण्याकरितां घरेंही आहेत. बगीच्याही आहे. ज्यास विकत घेण्याची इच्छा असेल त्यांनीं खलील पत्त्यावर भेटावे ह्मणजे बोलणें चालणें करूं. ता. सही

देवराव विनायक

C/o श्रीगणेश कंपनी

राममंदिराजवळ अकोला

नो. नं. ४६०

## जाहीरखबर

मौजे वाकी ता० अकोला येथें माझा चार जीनचा कारखाना आहे. तो मला विकावयाचा आहे. ज्यास घ्यावयाचा असेल त्यानें खाली लिहिलेल्या पत्त्यावर भेटावे. कळावें ता० २२।११।१७ सही

वासुदेव देवराव

C/o श्रीगणेश कंपनी

राममंदिराजवळ अकोला

नो. नं. ४६१

## नोटीस

नोटीस बेशमी १ छोटेसाहेब वा॥ हसूभाई २ प्यारे साहेब वा॥ मलूभाई रा० शहर बाळापूर

यांसः—

खालीं सही करणाराकडून नोटिस देण्यांत येते कीं मी व महमद हुसेन वा॥ शेख नादू राहणार बाळापूर आह्मी उभयतां तुमचे शेत कोलखेड येथील मळीचे दरसाल २७० दोनशे सत्तर रुपये पट्ट्यानें केलें आहे. यंदा तुमचे शेतांत कपाशी व ज्वारी बाजरीचा पेरा पेरला आहे. पीकवगैरे तयार आहे. आह्मी तुमचे पट्ट्यांत सेतसारा वेळेवर देण्याचे कबूल केलें आहे. तुह्मास माल हरकत करण्याचा व आपले ताब्यांत ठेवण्याचा कोणतेही प्रकारें हक्क नसून तुह्मी बळजबरीनें आमचा माल कापूस वजन सातरगांव वजन २४ मण १ धडा तुह्मी घेऊन आपले खोपडीवर ठेविला आहे. व मी वारंवार तुह्मांस बाजारांत माल चालु भावानें विकण्याकरितां सांगितले असतां तुह्मी कानावर घेत नाहीं. व माल विकून आपले पट्ट्यांत पैसे मजरा करून पावती कायदा प्रमाणें देत नाहीं. करितां आज तुह्मास मी नोटिशीने जाहिर करितो कीं हल्लीं बाजार भाव आकोला पेठचा १८५ एकशे पंचायशीं रुपये खंडी आहे. तरी माल विकून पैसे जमा करणें व पावती देणें. कदाचित् भाव उतरला किंवा पाणी वगैरे पडून माल खराब झाला किंवा विस्तवानें

जळाला किंवा चोरी गेला तर त्याची सर्व प्रकारें जबाबदारी तुमचेवर आहे. मी पूर्ण आपल्या अर्ध्या हिश्याचे तुमच्या जवळून पैसे भरून घेईन व आतां पुढें मी तुह्मास या नोटिसीनें असें कळवितो कीं आपल्या पत्र्याच्या शर्तीविरुद्ध माझा माल जबरीनें घ्याल किंवा मझ्याशी विनाकारण तक्रार कराल तर तुह्मी फौजदारीस पात्र व्हाल. वरील मालाचे रुपयांतून तुमची पत्र्याची रकम, अढत, गाडीभाडे वगैरे वजा करून राहिलेली योग्य रकम मला परत करावी. क. ता० २२।११।१९१७

सही

भोलेखां वा। महेताबखां रा. बाळापूर दस्तुर खुद

नो. नं. ४९४

## पत्रव्यवहार.

### ज्ञानकोशास " देणगी "

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांस—

वि. वि. संदेश ता० ६ नोव्हेंबर १९१७ च्या अंकांत " नारिंगी निशाण " या लेखा खालीं " बंधु समाज " पुणें या संस्थेची हकीकत आलेली आहे. त्या लेखांत वऱ्हाडांतील लोकांनीं नारिंगी निशाणानें चांगलें स्वागत करावें अशी प्रार्थना करून पुढें " परंतु त्यांच्या प्रेमांतून थोडें बहुत उतराई आश्रय मिळाल्यास डॉक्टर केतकर यांच्या विश्व कोशास एक हजार रुपये देण्याचा नारिंगी निशाणाचा इरादा आहे. " असे अस्पष्टार्थी शब्द घातले आहेत.

वरील शब्दांत व्यक्त होणाऱ्या हेतूबद्दल एवढेंच लिहावयाचें आहे कीं बंधुसमाजाच्या सदिच्छेबद्दल आह्मी आभारी आहों. तथापि आह्मांस त्यांची देणगी स्वीकारतां यावयाची नाही. देणग्या स्वीकारूं नयेत असा मंडळाचा ठराव ही आहे. ज्ञानकोशाबद्दल प्रेम व अभिमान बाळगणाऱ्या महाराष्ट्रास आणि विशेष करून वऱ्हाड नागपुरकरांस आह्मांस एवढेंच सांगावयाचें आहे कीं ज्यांना ज्ञानकोशास मदत करावयाची असेल त्यांनीं शेअर होल्डर अगर वर्गणीदार होऊन ती प्रत्यक्ष करावी. आह्मांस जी संस्था मदत करण्याचें योजीत असेल तिला पैसे दिल्यानें आह्मांस मदत होईल असें समजूं नये. जी मदत आह्मांस प्रत्यक्ष होईल तीच खरी. कळावें हे विज्ञापना. ता० १८।११।१९१७

**गोविंद चिंतामण तांबे.**

ज्ञानकोश मंडळाचे सेक्रेटरी

## पत्रव्यवहार

खामगांव ता० १२-११-१७

अनेक रामराम वि. वि.

वऱ्हाडचे कमिश्नर साहेब यांना विनंती केल्यावरून त्यांनीं सरकारी नोकर असलेल्या मराठा गृहस्थास येत्या म. शि. परिषदेस हजर राहण्यास हरकत नाहीं असें सरक्युलर ता० १२।१०।१९१७ ला काढून त्याची नक्कल आमचे कडेस पाठविली आहे करितां सरकारी नोकरींत असलेल्या मराठा गृहस्थांस त्यांनीं परिषदेस अवश्य हजर राहावें अशी विनंती आहे.

२ वऱ्हाडांतील व मध्यप्रांतांतील सर्व शाळेंतील विद्यार्थ्यांस कळविण्यांत येते कीं खामगांव येथें ता. २७।२८।२९ डिसेंबर १७ रोजीं भरणाऱ्या मराठा शिक्षण परिषदेस हजर राहण्यास व तींमध्यें कोणतेंहि काम करण्यास वऱ्हाडचे विद्याखात्याचे अधिकारी मे. इन्स्पेक्टर साहेब यांजकडून ता. १७।१०।१९१७ ला व मध्यप्रांताचे डायरेक्टरसाहेब यांजकडून ता. ६-११-१७ ला लेखी परवानगी आली आहे करितां ज्या विद्यार्थ्यांना स्वयंसेवक व्हावयाचे असेल त्यांनीं आपलें नांव गांव पत्ता लवकर कळवावा.

३ तारीख ११-११-१७ इ. रोजीं रविवारीं १२ वाजता रावबहादूर केशवराव मानराव देशमुख यांचे वाड्यांत प्रमुख मराठा गृहस्थांची सभा भरून मराठा शिक्षण परिषदे करितां वर्गणी गोळा करण्यांत आली व जागचे जागीं १९०० रुपयांचे आकडे पडले.

आपला

B. N. Bobde

Secretary R. C. M. E. Conference

## मराठा शिक्षण परिषद बैठक ११ वी.

### ता. २७।२८।२९ डिसेंबर १९१७ प्रतिनिधी व प्रेक्षक यांचे ठरलेले नियम.

१— २५ रुपये अगर त्यांहून जास्त रकम देणारास स्वागत मंडळाचे सभासद समजले जाईल.

२— १०० रुपयांपेक्षां जास्त रकम देणारास स्वागत मंडळाचे सभासद समजून त्यास बसण्याकरितां डायसवर जागा मिळेल.

३— कोणत्या ही मनुष्यास १० डिसेंबरचे आंत ८ रुपये देऊन व त्यानंतर १२ रुपये देऊन स्वतंत्र सभासद होतां येईल.

४— समाजाकडून येणाऱ्या प्रतिनिधीस अथवा स्वागत मंडळाचे सभासदास भोजनाबद्दल व परिषदेच्या मंडपांत हजर राहण्यास निराळा आकार द्यावा लागणार नाहीं.

५— स्वतंत्र प्रतिनिधींनीं व सभासदांनीं परिषदे करितां येतांना आपला येण्याचा दिवस व वेळ आठ ८ दिवस अगोदर व समाजा मार्फत येणाऱ्या प्रतिनिधींनीं १५ दिवस आगोदर कळवावी व त्यांनीं आपापले बिछाने बरोबर आणावेत.

६— समाजामार्फत अथवा स्वतंत्र रीतीनें येणाऱ्या प्रतिनिधींनीं समाजाकडेस प्रतिनिधी फी भरल्याची पावती दाखवून अथवा फी भरली नसल्यास ती भरून देऊन आपलें नांव प्रतिनिधी कचेरींत नोंदून द्यावें. व प्रतिनिधीचें तिकीट, ब्याज व भोजनाची पास घेऊन त्यांचे करितां नेमिलेल्या जागेंत उतरावे.

७— समाजातर्फे निवडून येणाऱ्या प्रतिनिधींसाठीं त्यांचीं नांवें भरून पाठविण्याकरितां समाजाचे चिटनिसाकडे तक्ते पाठविले आहेत; हे त्यांनीं भरून १५ दिवस अगोदर पाठवावेत. स्वतंत्र प्रतिनिधींनीं हा तक्ता मागविल्यास त्यास पाठविण्यांत येईल.

८— परिषदेच्या बैठकीस हजर राहू इच्छिणारास **तिन्ही दिवसांची प्रेक्षक फी २ रुपये पडेल** त्यास व स्वतंत्र प्रतिनिधींस प्रत्येक जेवणाबद्दल ८ आणे पडतील. मात्र त्यांनीं सायंकाळचे जेवणाचे तिकीट दिवसाचे १२ वाजे पावेतों, व सकाळचें जेवणाचें तिकीट आधले दिवशीं रात्रीं ९ वाजे पावेतों विकत घेऊन ठेवावे. त्यांची उतरण्याची सोय समाजा मार्फत केली जाईल. ( त्यास नियम ५ लागू आहे. )

९— स्त्री-प्रतिनिधी, व स्त्री प्रेक्षक यांना जेवणाची, प्रतिनिधी, अथवा प्रेक्षक फी पडणार नाहीं मात्र त्यांनीं येण्याचे अगोदर १५ दिवस कळविलें पाहिजे. त्यांची मंडपांत बसण्याची स्वतंत्र व्यवस्था केली जाईल.

खामगांव ता. ६।११।१७ } आपला स्नेहांकित

**बाजीराव नामदेव बोबडे वकील**

चिटनीस स्वा० मं०

**मराठा शिक्षण परिषद**

## वऱ्हाडसमाचार

कार्तिक शुद्ध १३ पिंगल संवत्सर १८३९

## स्वराज्य आणि ब्रिटिश वसाहती.

सध्या राजकीय सुधारणा हा एकच विषय सर्वांच्या निदिध्यासाचा विषय होऊन बसला आहे. अधिकारी वर्ग आणि बिनअधिकारी वर्ग यांच्या अहोरात्र चिंतनाला, वर्तमानपत्रांच्या संपादकांच्या लेखांना आणि वक्त्यांच्या भाषणांना स्फूर्ति देण्याला याच्या इतका बलवत्तर व समर्थ असा दुसरा विषय नाहीं. सुशिक्षित व अर्ध शिक्षित, जमीनदार आणि रयत, ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर, सर्वांना असें खास मनापासून वाटत आहे कीं राष्ट्राच्या आयुष्यांत अतिशय निकराचा असा जो एक काळ येत असतो कीं ज्याच्या योग्य किंवा अयोग्य निर्णयावर राष्ट्राची एकंदर भवितव्यता अवलंबून असते, तो काळ हिंदुस्थानाला आतां आलेला आहे, आणि यावेळीं आपण आपल्या हिताला जपलों नाही तर आपली कायमची हानि होईल. आपण मागूं तें ह्मणजे सगळें किंवा बहुतांशानें मिळेलच अशी खात्री नसली तरी आपले हक्क शक्य तेवढ्या जोरानें मागणें हें आपलें कर्तव्य आहे अशी जाणीव सध्या आपल्या राष्ट्रांत प्रत्येक वर्गांत, प्रत्येक जातींत, प्रत्येक संघांत उत्पन्न झालेली दिसत आहे, आणि देशांतल्या असंख्य वर्गांकडून, जातींकडून आणि संघांकडून आपापल्या हक्कांच्या संरक्षणाची मागणी सरकाराकडे होत आहे. मि. मांटेग्यु यांनीं दिल्लीस पोहोंचतांच या वर्गांच्या, जातींच्या व संघांच्या प्रतिनिधींची मुलाखत घेण्यास व अर्ज ऐकण्यास सुरुवात केली आहे. राष्ट्रीय शक्ति सगळी एका दिशेनें एका बिंदूवर—स्वराज्य प्राप्तीच्या मागणीवर—मारा न करतां जशा रीतीनें विभागली जावी तशी न जातां ती जातवारींत, किंवा संघवारींत विभागली जावी, आणि ब्राह्मण व ब्राह्मणेतर व ब्राह्मणेतरांत ही पुनः मराठे निराळे, जैन निराळे, लिंगायत निराळे, असे असंख्य सूक्ष्मभेद उत्पन्न व्हावे ही राष्ट्रहिताच्या दृष्टीनें दुर्दैवाची गोष्ट ह्मटली पाहिजे. तथापि त्यांतल्या त्यांत येवढेंच समाधान मानावयाचें कीं हल्लींची अधिकारी वर्गाच्याच हातांत सगळी सत्ता एकवटण्याची जी पद्धत आहे तीच उत्तम आहे असें मात्र कोणी ही म्हणत नाहीं. हिच्यांत सुधारणा हवी आहे आणि ती लोकांच्या हातांत सत्ता देण्याच्या दिशेनें हवी आहे याविषयीं सर्वांचें एकमत आहे. लोकांच्या हातांत सत्ता सगळी देऊन अधिकारी वर्गानें लोकांना—आपल्या खऱ्या मालकांना—जबाबदार रहावें हा इष्ट सुधारणेचा मूलमंत्र प्रत्येकाच्या मागणींत आहे. पण एकदम सगळी राजसत्ता लोकांचे हातांत देऊन इंग्रज लोकांनीं येथून गाशा गुंडाळावा, व हिंदुस्थानचा व ब्रिटिश साम्राज्याचा अर्थाअर्थीं कांहीं संबंध राहिला नाहीं असें हिंदुस्थानानें समजावें असा अर्थ लोकांच्या या मागणीचा नाहीं; तसें होणें इष्ट नाहीं, उलट अनर्थकारक आहे हें लोकांना पूर्णपणें कळत आहे. पण सुधारणेचें नांव काढतांच ज्यांच्या अंगाचा तिळपापड होतो असे पायोनियर, व मद्रासमेल मधील लेखक हिंदुस्थानाविषयीं गैरसमज उत्पन्न करून ठेवण्यासाठीं मुद्दाम ब्रिटिश जनतेला भासवूं पाहत आहेत.

ब्रिटिश साम्राज्याखालीं राहून पुनः एक प्रकारें स्वतंत्र अशा प्रकारची राज्यपद्धति ह्मणजे वसाहतीची राज्यपद्धति होय, आणि ह्मणूनच वसाहतींचाच नमुना ना. गोखले, मेथा प्रभृति कांग्रेसच्या पुढाऱ्यांनीं तूर्त आदर्श ह्मणून आपल्या दृष्टीपुढें ठेविला. ही नमुन्याची निवड उत्तम झाली ही गोष्ट निर्विवाद आहे. स्थूल दृष्टीनें या नमुन्यावर हिंदुस्थानच्या नव्या राज्यपद्धतीची घडी बसवावयास पाहिजे आहे हेंच सर्वांचें ह्मणणें आहे. परंतु ब्रिटिश वसाहती सगळ्या एकाच प्रकारच्या नाहींत. त्यांच्यांत ही बारीकसारीक भेद असल्यामुळें त्यांच्या प्रत्येकीच्या राज्यपद्धतींत थोडी थोडी भिन्नता आहे. ही कशी आहे तें पुढें दिलेल्या गोष्टीवरून कळून येईल.

न्यू साउथ वेल्स, व्हिक्टोरिया, साउथ आस्ट्रेलिया, क्विन्सल्यांड, तास्मानिया व पश्चिम आस्ट्रेलिया या सर्वांत एकेक गव्हर्नर एक्झिक्युटिव्ह कौंसिल, एक सेनेट, व एक प्रतिनिधिसभा आहे. आस्ट्रेलियाच्या सेनेटमध्यें ३६ सभासद असून त्यांची निवडणूक ६ वर्षांकरितां झालेली असते. प्रतिनिधि सभेंत ७० लोकनियुक्त सभासद ३ वर्षांकरितां असतात. कांहीं वसाहतींत सिनेटबद्दल फक्त कायदे कौंसिलें आहेत, व त्यांची नेमणूक कांहीं ठिकाणीं सरकाराकडून सान्या जन्माकरितां करण्यांत येते, तर कांहीं ठिकाणीं ती लोकनियुक्त व ३ वर्षांकरितांच आहेत. पण [illegible] चा प्रयत्न [illegible]

[illegible] वायतींच्या नकाशा

करितांच आहेत, कांहीं ६ वर्षांकरितां आहेत; कानडा, व दक्षिण आफ्रिका यांमध्यें ही मुदत पांच वर्षांची आहे. वसाहतींचे स्वराज्याधिकारप्राप्त व क्राउन कॉलोनीज असे जे दोन मुख्य वर्ग आहेत त्यांपैकीं दुसऱ्या वर्गाच्या वसाहतींत गव्हर्नराच्या हातीं अधिक सत्ता असते. अशा क्राउन कालोनीचें उत्तम उदाहरण सीलोन बेट हें आहे. या प्रतीच्या वसाहतींच्या राज्यपद्धतींत व हिंदुस्थानच्या राज्यपद्धतींत विशेषसा भेद नाहीं. या वसाहतींच्या राज्यपद्धतींत व हिंदुस्थानच्या राज्यपद्धतींत मुख्य भेद हा आहे कीं सरकार लोकांना जबाबदार असलें पाहिजे ही गोष्ट वसाहतींच्या बाबतींत जसें सरकारनें कबूल केलें आहे तसें हिंदुस्थानच्या बाबतींत अद्याप केलेलें नाहीं. तें त्यांच्याकडून करवून घेणें अपरिहार्य आहे आणि हल्लींच्या आपल्या सगळ्या चळवळींचा तो **महामंत्र आहे हें** आपण ध्यानांत ठेवलें पाहिजे. हें तत्त्व कबूल करूनच ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें ज्या त्या वसाहतीला राज्यकारभाराचे कमी अधिक अधिकार सार्वभौम सरकाराकडून देण्यांत आले आहेत. हे अधिकार एकदम पूर्णांशानें मिळालेल्या अशा वसाहती ह्मणजे कानडा, आस्ट्रेलिया व दक्षिण आफ्रिका या होत.

हे अधिकार राष्ट्रघटनेच्या कामीं अत्यंत श्रेयस्कर झाले आहेत हें वरील तीन ही वसाहतींच्या इतिहासावरून दिसून येईल. आपला काबू या वसाहतींवर राहिला नाहीं तर त्या आपल्या आईपासून विभक्त होतील व त्या दोघींतलें प्रेमबंधन तुटेल असा भ्रम कित्येक ब्रिटिश मुत्सद्यांचे ठायीं होता, पण आतां त्याचें निराकरण झालें आहे; इतकेंच नाहीं, तर वयांत आलेल्या मुलाला किंवा मुलीला आई बापांच्या काचा खालीं राहण्यानेंच विभक्त होण्याची बुद्धि होते, पण कांहीं विवक्षित मर्यादेंत त्यांना स्वतंत्रता दिल्यास राजनिष्ठेचें बंधन अधिक दृढ होतें अशी आतां ब्रिटिश लोकांची खात्री झाली आहे. क्राउन कालोनीला स्वराज्यप्राप्त वसाहतीइतकें स्वातंत्र्य न ठेविल्यामुळें होणाऱ्या दुष्परिणामाचा ही ब्रिटिश राष्ट्राला अनुभव आलेला आहे. जसजसे लोकांना अधिकार ज्यास्त द्यावे व व त्यांचेवर जबाबदारी टाकावी, तसतशी लोकांत ज्यास्त शांतता व समाधानवृत्ति नांदते याचा अनुभव जमेका व माल्टा या दोन वसाहतींच्या बाबतींत सरकारला आला आहे व वाईटपणा घेऊन शेवटीं तेथील लोकांना ज्यास्त हक्क देणें सरकारला भाग पडलें आहे. वसाहतींच्या संबंधाच्या या इतिहासाच्या अनुभवानें वस्तुतः ब्रिटिश राष्ट्राचे डोळे उघडावयास पाहिजेत. पण अधिकाराचा लोभ शहाण्या माणसांच्या दृष्टीला सुद्धां पुष्कळ वेळां अधत्व--निदान मंदत्व—आणितो; आणि आज हिंदुस्थानची स्वराज्याधिकाराबद्दलची मागणी जरी न्यायाची व रास्त आहे अशी साक्ष जरी सगळे ब्रिटिश मुत्सद्दी देत आहेत तरी येथील मूठभर अधिकारी व स्वतःच्या पोळीवर तूप ओढूं पाहणारे त्यांचे पायोनियरसारखे पाठराखे यांचा होमरूलच्या चळवळीमुळें जो थयथयाट चालला आहे याचें रहस्य तरी या [illegible]लालसेंतच आहे असें विचारी माणसास दिसून आल्यावांचून राहणार नाहीं.

वरील कारणांमुळें वसाहतींच्या राज्यकारभाराचा इतिहास हिंदुस्थानच्या राज्यकर्त्यांसच नव्हे तर आह्मां हिंदुस्थानवासी लोकांना ही अत्यंत बोधप्रद आहे. पण आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं असे इतिहास आमच्या शाळांतून शिकविले जात नाहींत. ते शिकविले गेल्यास लोकांमध्यें आपल्या नैसर्गिक हक्कांची जाणीव उत्पन्न होऊन नसतें लचांड उत्पन्न होईल अशी भीती अधिकारी वर्गाला वाटते कीं काय कोणास ठाऊक! पण ह्मातारीनें कोंबडा झांकून ठेविला तरी उजाडावयाचें राहत नाहीं ही ह्मण खरी आहे. सरकारी अधिकाऱ्यांनीं तर कित्येक ठिकाणीं इंग्लंडचा इतिहास ही राज्यव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टीनें शिकविला जाऊं नये अशी ही तजवीज करून ठेविली असल्याचें कळतें. पण अधिकाऱ्यांचा हा प्रयत्न वरील ह्मणींतल्या ह्मातारीच्या प्रयत्ना इतकाच वेडगळपणाचा आहे हें सांगावयास नकोच. जो प्रयत्न ब्रिटिश सार्वभौमसत्तेच्या संरक्षणार्थ व हिंदुस्थान आणि ब्रिटिश साम्राज्य यांच्या मधील प्रेमाच्या दृढीकरणार्थ अवश्यमेव करावयास पाहिजे त्यालाच हे अधिकारी भितात हें आश्चर्य आहे. वसाहतींच्या इतिहासाच्या अध्ययनानें हिंदुस्थानच्या लोकांत राजनिष्ठा शिथिल होईल ही त्यांची कल्पना अगदीं चुकीची आहे. त्या अध्ययनानें हिंदुस्थानच्या लोकांत स्वराज्यप्राप्तीविषयींची जागृति अधिक होईल ही गोष्ट खरी, पण कानडा, आस्ट्रेलिया किंवा दक्षिण आफ्रिका यांच्याप्रमाणें हिंदुस्थानला ही ब्रिटिश साम्राज्याविषयीं अधिक ममता वाटूं लागेल आणि साम्राज्याच्या हिताच्या दृष्टीनें हा लाभ कांहीं लहान नाहीं.

---

## हुंडणावळीबद्दलचा भत्ता.

१८९३ सालीं जेव्हां सोन्याच्या पौंडाच्या मानानें चांदीच्या रुपयाची किंमत उतरली तेव्हां हिंदुस्थानांतल्या युरोपियन ऑफिसरांनीं काव काव करून आपल्या अर्ध्या पगारावर हुंडणावळ ह्मणून आणखी कांहीं भत्ता सरकारकडून मिळविला, आणि तेव्हां पासून त्यांचा तो भत्ता आतांपर्यंत चालू आहे. त्यावेळीं पौंडाचा भाव १ शि. ६ पेन्स धरला जात असे. याप्रमाणें १९११ पर्यंत चाललें होतें. पुढें त्या वर्षीं सरकारनें दर तिमाहीला बाजार भावाच्या मानानें भत्याचें प्रमाण ठरविण्याची कटकट चुकविण्यासाठीं पौंडाचा भाव १ शि. ४ पेन्स ठरवून टाकिला, आणि पगारावर शेंकडा ६। रुपये भत्ता आकारण्याचा प्रघात घातला. हाच प्रघात आतांपर्यंत चालू होता. यंदा युद्धामुळें चांदीचा भाव तेजीचा होऊन तो १ शि० ४ पेन्सवर गेल्या कारणानें या भत्याच्या प्रमाणांत ही फेरबदल करण्याची अवश्यकता ज्ञणून त्यासंबंधानें एक जाहिरपत्रक काढलें आहे. वस्तुतः हुंडणावळीबद्दल भत्ता देणें हीच अगोदर सरकारचे हातून चूक झाली होती, आणि युद्धाच्या निमित्तानें ती चूक सुधारण्याची सुसंधी सरकारला आयती मिळाली होती तिचा फायदा घेऊन त्यांनीं हा भत्ता अजीबात काढून टाकला असता तर सध्याच्या काळांत खर्चांत बरीच काटकसर त्यांना दाखवितां आली असती. पण तसें करण्याचें धैर्य त्यांना झालें नाहीं, आणि चांदीचा भाव आज दोन वर्षें जरी वाढला आहे, तरी युरोपियन ऑफिसरांचा भत्ता आतांपर्यंत चालूच राहिला! सरकारच्या काटकसरीचें लक्ष नोट पेपर किती खर्च होतो येथपर्यंत बारकाईनें गेलें तरी ही येवढी बाब आतांपर्यंत त्यांना दिसली नाहीं. १९१८ पासून या भत्याचें प्रमाण सरकारनें थोडेंसें कमी केलें आहे, आणि १९०१ सालाचे अगोदर जें प्रमाण होतें तें पुनः प्रस्थापित करण्याचा त्यांचा विचार **ठरला आहे.** पब्लिक सर्व्हिस कमिशननें तर हा भत्ता त्यांचे पगारांत कायमचा मिळवून टाकण्याचीच शिफारस केली आहे! ह्मणजे पुढें मागें जरी चांदीचा भाव आणखी चढला, तरी त्या मानानें भत्याचें प्रमाण कमी होण्याचें कारणच **नाहीं.** ही शिफारस सरकारला कितपत **रुचते हें अद्याप** पाहणें आहे. पण तूर्त तरी **सरकारचें** हें नवें धोरण न्यायाला अनुसरून आहे ह्मणून त्याचें अभिनंदन केलें पाहिजे

---

## प्रे. विल्सन यांचें शिक्षणाधिकाऱ्यांस पत्र

हिंदुस्थानचे विद्यार्थी ह्मणजे पुस्तकांतले किडे असतात, त्यांना व्यवहारांतलें कांहीं कळत नाहीं, असा आक्षेप वारंवार करण्यांत येत असतो. हा आक्षेप जर खरा असेल तर त्याबद्दलचा दोष कोणाकडे आहे हें मात्र कोणी पाहत नाहीं. परवा मुंबईस औद्योगिक कमिशनपुढें झालेल्या साक्षींत एक दोघा युरोपियन साक्षीदारांनीं धंदेशिक्षणासंबंधानें या आक्षेपाची पुनरुक्ति केली होती; पण हा दोष काढून टाकण्यास सरकारनें काय करावयास पाहिजे तें मात्र तितकें निर्भीडपणानें सांगितलें नाहीं. विद्यार्थ्यांनीं विद्यार्थी दशेंत आपल्या पुस्तकी जगाच्या पलीकडे इकडे तिकडे पाहूं नये, कोणत्याही सभेला जाऊं नये किंवा कोणत्याही चळवळींत पडूं नये ह्मणून निर्बंध घालण्यांत प्रांतिक सरकारांमध्यें जणूं काय स्पर्धा लागली आहे. अशा अडचणींत हिंदुस्थानचे विद्यार्थी ग्रंथकीटक बनले आणि आपल्या देशाच्या सामाजिक, सांपत्तिक, व इतर स्थितीविषयीं अज्ञानांत राहून कर्तृत्वशून्य बनले तर त्याबद्दलच्या पापाचे वांटेकरी कोण समजले जातील हा विचार सुद्धां सरकारी अधिकाऱ्यांचे डोक्यांत आलेला दिसत नाहीं. पण अमेरिकेसारख्या स्वतंत्र विचाराच्या देशांत कसा भिन्न प्रकार आढळतो तें पाहण्यासारखें आहे. मनुष्याच्या हातून हल्लींपेक्षां ज्यास्त कर्तृत्वशक्ति कशी दाखविता येईल, व ती दाखवितां येईल अशा प्रकारची शिक्षणपद्धति अमेरिकेंत सुरू करण्याची किती अवश्यकता आहे तें शिक्षकांचे मनावर बिंबविणारें एक पत्र अमेरिकेचे प्रेसिडेंट डा० विल्सन यांनीं नुकतेंच शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठविलें आहे. त्यांत ते ह्मणतात—'प्रस्तुतच्या युद्धांत खाद्य व राष्ट्राला लागणारे इतर अवश्य पदार्थ यांची पैदास व वाटणी या दोन सध्याच्या महत्त्वाच्या प्रश्नांनीं एक व्यक्ति दुसऱ्या व्यक्तीवर व एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रावर कसें अवलंबून असतें तें चांगलें निदर्शनास आणिलें आहे. लढाईमुळें सध्या बरेच लोक जरी दूर पाठवावे लागले आहेत तरी या प्रश्नाकडे दुर्लक्ष करतां येत नाहीं. इतके लोक गेले तरी सदर पदार्थांची पैदास व वाटणी पूर्वींच्या सारखीच ठेवणें भाग आहे. आपणांस जगावयाचें असेल तर या गोष्टीचा विचार केलाच पाहिजे. मनुष्यजातीविषयीं ज्यास्त व्यापक दृष्टि मुलांत उत्पन्न होईल असें शिक्षण मुलांना देणें आतां जरूर आहे. समाज व राष्ट्र यांच्या प्रश्नाविषयींचें ज्ञान त्यांना करून देण्याकडे आतां आपण अधिक वेळ दिला पाहिजे व अधिक लक्ष घातलें पाहिजे. असे धडे मुलांच्या शिक्षणक्रमांत घालण्याविषयीं शिक्षणाधिकाऱ्यांना सूचना करण्यांत आल्या आहेत.' ह्मणजे अमेरिकेंत मुलांची दृष्टि अधिक व्यापक करण्याकडे व त्यांच्या कर्तृत्वशक्तीचें क्षेत्र वाढवून प्रचलित सामाजिक व राष्ट्रीय प्रश्नाकडे मुलांचें लक्ष ओढण्याकडे अमेरिकेच्या प्रेसिडेंटाचा कल स्पष्ट आहे. आमचे अधिकारी विद्यार्थ्यांची दृष्टि अधिक संकुचित करून त्यांना ग्रंथकीटक बनवूं पाहत आहेत.

---

## महायुद्धाची प्रगति.

### रशिया.

रशियाची स्थिति अधिकाधिक निराशाजनक होत चालली आहे, आणि रोज येणाऱ्या तारा परस्परांशीं इतक्या विरोधी असतात कीं खरा प्रकार काय आहे तें नक्की कांहींच कळत नाहीं. वास्तविक पाहतां प्रस्तुतचें युद्ध सुरू करण्यांत रशियाची उत्सुकता ग्रेटब्रिटनपेक्षां ज्यास्त होती. एकदा युद्ध सुरू केल्यावर ग्रेटब्रिटननें त्याला दारूगोळा वगैरे पुरविण्याचे कामीं मदत देण्यांत कोणत्याही प्रकारें कुचराई केली नाहीं. रशियाचेपाशीं मनुष्यबळ ही पुष्कळ आहे; पण निश्चयाचें बळ नाहीं, किंबहुना तेंही आहे, पण व्यवस्थितपणा व नीतिबळ नाहीं असें ह्मटलें पाहिजे. **जुलै १९१६** मध्यें ग्यालिशियावरील स्वारीच्या वेळीं त्यानें शत्रूला आपल्या समशेरीचें जें तेज दाखविलें तें आमही त्याच्या ठायीं आहे, पण आपसांतल्या दुहीमुळें तें तेज आज उलट त्याच्या स्वतःच्याच नाशाला कारण होऊं पाहत आहे! रशियांत यादवी माजली नसती, आणि त्याची तलवार पूर्वींच्या सारखीच चमकत राहती तर आज युद्ध कांडाचें शेवटचें प्रकरण लिहिण्याची पाळी आली असती. पण आज त्या गोष्टी मनांतल्या मनांत मांडे खाण्यासारख्या झाल्या आहेत; आणि आज केरेंझस्कीला राजद्रोही रशियनांनीं पकडलें, किंवा पळायाला लाविलें, आणि रशियाच्या राजधानींत लोकांच्या घरादारांची जाळपोळ सुरू झाली अशा प्रकारच्या अमंगल बातम्या वाचण्याची पाळी दुर्दैवानें आली आहे. परंतु या येणाऱ्या बातम्या मास्को व पेट्रोग्राड पुरत्याच असतात. बाकीचा रशिया कोणाच्या बाजूचा आहे व काय करीत आहे, कांहीं कळत नाहीं. या एकंदर प्रकारावरून एक गोष्ट स्पष्ट होते आणि तीही कीं रशियाकडून आता

बरेच दिवस पर्यंत मित्रराष्ट्रांना मदत मिळण्याची आशा करावयास नको, आणि म्याक्सिमालिस्ट लोकांच्या हातांत सत्ता गेली आहे ही गोष्ट खरी असल्यास ते जर्मनीशीं तहाचें बोलणें लावण्यास प्रारंभ करतील हें ही आपण धरून चाललें पाहिजे.

## इटली

जनरल मॉरिस हे आपल्या साप्ताहिक रिपोर्टांत लिहितात कीं पियाव्हे लाईनला चिकटून राहण्यास इटालियन समर्थ झाले ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. या लाईनवर गेल्या आठवड्यांत शत्रूंनीं दक्षिण व उत्तर दोन्ही बाजूंनीं जोराचे हल्ले चालविले होते. पण इटालियन लोकांनीं नेटानें त्यांचा प्रतिकार केला, आणि जरी शत्रूंनीं पूर्वेच्या बाजूनें भोक पाडून प्रवेश केला, तथापि इटालियन लोकांना चिमट्यांत धरण्याचा त्यांचा प्रयत्न सिद्धीला गेला नाहीं याबद्दल समाधान मानिलें पाहिजे. उत्तरेच्या बाजूचीं कित्येक मजबूत ठिकाणें अद्याप इटालियनांच्या ताब्यांत आहेत व त्या बाजूनें व त्याच प्रमाणें दक्षिणेच्या बाजूनें शत्रूस ते आंत शिरकूं देणार नाहीत पण यासंबंधांत रूटरची बातमी फार नाउमेदकारक आहे. पियाव्हे लाईनचा बचाव करणें इटालियनांना दुरापास्त आहे असें त्याचें ह्मणणें आहे. लवकरच ती लाईन सोडून त्यांना दुसरीकडे जावें लागेल हें त्याचें ह्मणणें खरें ठरल्यास मात्र प्रसंग कठीण आहे असें ह्मणावें लागेल. फ्रेंच व ब्रिटिश फौजांची कुमक चांगली होत आहे. यामुळें इटालियन लोकांना विरोध करण्यास चांगलें उत्तेजन मिळत आहे. मांटफेरेना व मांट टॉम्बा यावर हल्ला करून शत्रु इटालियन लोकांच्या सर्व ठिकाणीं येऊन भिडले आहेत. शत्रूंच्या फौजावर फौजा येत आहेत, व तोफखाना ही आला आहे. इटालियन लोकांचा घेरण्याचा, किंवा तोफांचा मारा करून त्यांना जेरीस आणण्याचा अथवा दुसरा कांहीं शत्रूचा विचार आहे कीं काय तें कळत नाहीं. पण लवकरच या ठिकाणच्या युद्धाला कांहीं तरी नवें स्वरूप येईल असा रंग दिसतो. शत्रु आपली बाजू मजबूत करून राहिलेला पाहून इटालियन लोकांची ही त्याला तोंड देण्याची तयारी वाढत चालली आहे, इतकेंच तूर्त सांगतां येतें.

## पश्चिम रणक्षेत्र.

या ठिकाणीं मित्रराष्ट्रांची प्रगति मंद गतीनें चालली आहे पण ती निश्चयात्मक आहे आणि या क्षेत्रांत इंग्रजांची सरशी निर्विवाद आहे. या ठिकाणीं जर जर्मन लोकांना पराभवावर पराभव न मिळते तर शत्रु फारच शेफारून गेला असता. पण येथें आज कित्येक महिनेपर्यंत नाक चांगलें ठेंचलें जात असल्यामुळें या युद्धांत अखेर मित्रराष्ट्रांनाच जय मिळेल ही उमेद कायम राहिली आहे. पासाचें डेल येथें शत्रूंनीं वारंवार हल्ले केले, पण ते सगळे यशस्वी रीतीनें परतविण्यांत आले. या ठिकाणीं इंग्रजांनीं शत्रूंचीं कांहीं ठाणीं ही घेतलीं. समुद्रावर ही शत्रूशीं कांहीं आरमारी चकमकी झाल्या, पण त्यांत इंग्रजांचाच जय झाला.

## पूर्व आफ्रिका.

या ठिकाणीं जर्मनांचा पुरा मोड होऊन त्याच्या पिछाडीच्या लोकांना त्यांच्या ठाण्यांपासून हाकून लावण्यांत आलें, व युद्धांत शत्रूंनीं कैदी ह्मणून धरलेल्या हिंदी व आफ्रिकन लोकांची सुटका करण्यांत आली.

जर्मनीच्या ताब्यांत असलेला आफ्रिकेचा बराचसा भाग या पूर्वींच इंग्रजांनीं घेऊन तेथें शांतता प्रस्थापित केली आहे. दंग्या धोप्यांमुळें हा भाग इतके दिवस व्यापारासाठीं खुला ठेवण्यांत आला नव्हता, पण आतां तो जानेवारीपासून व्यापारासाठीं खुला करण्यांत येईल अशी बातमी आहे.

## जनरल मॉड यांचा मृत्यु.

मेसोपोटेमियांतले इंग्रजांचे सुप्रसिद्ध सेनापति जनरल मॉड यांस थोड्या दिवसांच्या आजारानें ता. १८ नोवेंबर रोजीं ख्रिस्ताज्ञा झाल्याचें दुःखदायक वर्तमान आलें आहे. गतवर्षी तुर्क लोकांनीं मेसोपोटेमियांत बरीच गडबड उडवून दिली होती व इराणांत जर्मनीनें कारस्थान सुरू ठेवून हिंदुस्थानाला शह देण्याचा त्याचा विचार होता. अशा आणीबाणीच्या वेळीं बगदादसारखें मजबूत ठिकाण काबीज करून त्याचें उत्तम रीतीनें संरक्षण केल्याचें व त्यामुळें हिंदुस्थानावर येऊं घातलेल्या संकटाचा अंकूर जागचे जागीं खुडून टाकण्याचें श्रेय जनरल मॉड यांनीं संपादन केल्यामुळें त्यांची मोठी कीर्ति झाली होती. अशा हुषार व कर्तृत्वशाली सेनापतीच्या सेवेला ब्रिटिश साम्राज्यानें सध्याच्या—निकराच्या काळीं मुकावें ही मोठीच हानि ह्मटली पाहिजे. पण परमेश्वरी इच्छेपुढें कोणाचा इलाज नाहीं.

## इतर बातम्या.

मि. मांटेग्यु हे दिल्लीस डेप्युटेशनें व पुढारी गृहस्थ यांच्या मुलाखती घेऊं लागले आहेत. या मुलाखतींत कोणत्या गोष्टींसंबंधानें चर्चा झाली तें बाहेर आलें नाहीं व येणार ही नाहीं. तथापि या मुलाखतींच्या वेळीं जो मोकळेपणा असावयास पाहिजे तो सरकारी नियमांच्या फाजील निर्बंधामुळें नसतो अशा विषयीं फार तक्रार आहे

लवकरच पारिस येथें होणाऱ्या कान्फरन्सला जपानचे वकीलास हजर राहण्याविषयीं निमंत्रण गेलें आहे.

युद्धाचे संबंधांत लष्करी व्यवस्थेत कांहीं तरी एकता असावी असे उद्गार मुख्य प्रधान मि. लाईड जॉर्ज यांनीं पारिस येथें काढल्यावरून त्या संबंधानें पार्लमेंट सभेंत माजी मुख्य प्रधान मि. ॲस्क्विथ यांनीं प्रश्न विचारला होता. त्यावर पुष्कळ आवेशयुक्त भाषणें झालीं. मि. लाईड जॉर्ज यांनीं एक लांबलचक भाषण करून आपल्या विधानाचें समर्थन केल्यावर चर्चा थांबली.

'अवरडे' फंडास लॉर्ड चेम्सफोर्ड यांनीं ५००० रुपये व लेडी चेम्सफोर्ड यांनीं १००० रु. दिले आहेत.

## लोकमताचा विजय.

### (नामदार खापर्डे यांची निवडणूक)

गेल्या १२ तारखेच्या प्रांतिक कायदे कौंसिला तर्फे व्हाइसरायच्या कायदे कौंसिलाच्या सदस्याच्या जागीं श्रीमंत रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांची बहुमतानें निवडणूक बिनसरकारी नामदारांनीं केली ही आमच्या प्रांताला मोठी अभिनंदनाची गोष्ट होय. नामदार दादासाहेब खापर्डे हे आमच्या प्रांतांतच काय पण सर्व राष्ट्रभर आपल्या उज्वल ओजस्वी व स्वराज्यवादी विचारांनीं मशहूर आहेत. यांच्या आयुष्यांतील गेलीं ३० वर्षे सार्वजनिक कार्यांनीं परिप्लुत आहेत. यांची आनंदी व विनोदी वृत्ती, बहुश्रुत चतुरस्रता आणि विचारांची कल्याणदृष्टी या तिन्ही सद्गुणास यांच्या पांडित्यानें व रसाळ वक्तृत्वनें विलक्षण सौंदर्य येते आणि यांच्या सुखसंवादांत आल्हाद न पावणारा असा हरीचा लाल विरळाच सापडेल. यांच्या परिपक्व अनुभवाचीं अमृतफळें आमच्या राष्ट्राला उत्तरोत्तर अधिक लाभतीलच, पण त्यांच्या प्रेमळ कर्तबगारी मुळें वरिष्ठ कायदे कौंसिलांच्या वातावरणांत अधिक मित्रभाव व संस्कृत आर्य वृत्ती हीं विशेष प्रकारें नांदूं लागतील असा आह्मास भरंवसा वाटतो.

## मॉंटेग--विज्ञप्ति.

### (इंडियाची कृष्ण शिष्टाई)

राजश्री मॉंटेग हे इंडियांतील राज्यकारभारा संबंधाची लोकांची गाऱ्हाणीं ऐकण्यासाठीं मुद्दाम आले आहेत आणि ते आमच्या चक्रवर्ती बादशहाकडे जी येथून हकीकत नेतील तिच्या अनुरोधानें राष्ट्राचा भावी भाग्योदय व्हावयाचा आहे. आणि ह्मणूनच आमच्या राष्ट्रांतील थोर थोर मुत्सद्दी, राष्ट्रभक्त, मोठमोठ्या संस्था, समाज, परिषदा आपापल्यापरीनें राष्ट्राची बाजू ब्रिटिश वैभवाला व इंडियाच्या आर्य संस्कृतीला शोभेल अशाच प्रकारानें राजश्री मॉंटेग यांच्यापुढें मांडीत आहेत. सारांश एवढाच कीं, युरोपांतील निरनिराळ्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्यासाठीं व मानवी सुधारणेच्या विजयासाठीं ह्मणून जे विक्राळ महायुद्ध सुरू आहे. त्याच महायुद्धानें पवित्र ह्मणून ठरविलेलीं स्वराज्याचीं ध्येयें बेलज्यमसारख्या क्षुद्र राष्ट्रासाठीं संपादून देण्याकरितां ब्रिटिश साम्राज्य आपल्या सर्व संपदा अर्पण करीत आहे; इतकेंच नाहीं तर सर्व मानव सृष्टीची पुनर्रचना ज्याच्या त्याच्या स्वराज्याच्या पायावर करून देण्यासाठीं आपलें साम्राज्य ही या महायुद्धांत पणास लावून ब्रिटिश साम्राज्य अत्यंत अभिमानास्पद वाटूं लागलें आहे. त्याच परम पवित्र ब्रिटिश साम्राज्यापाशीं इंडियाच्या राष्ट्राच्या पूर्व परंपरेला अनुसरून स्वराज्याची मागणी आज राजश्री मॉंटेग यांच्याद्वारा स्वराज्यसंघाचे प्रतिनिधी व राष्ट्रीय सभेचे मुख्य प्रातिनिधी स्वमुखानें व सुवर्ण पत्रिकेच्या अक्षरानें करणार आहेत. आमचा दिवस इंडियाच्या राष्ट्रांतला नवीन मन्वंतर घडवून आणणारा आहे. ह्मणून आजच्या दिवसाच्या कार्यक्रमाकडे सर्व राष्ट्राचे डोळे लागले आहेत. श्रीमती बिझांट देवी, लोकमान्य टिळक आदिकरून प्रांताप्रांताचे महात्मे आज दिल्लीस जमलेले आहेत आणि त्यांच्याच नामावळींत आमच्या प्रांतातर्फे वकीली करण्यास नामदार श्रीमंत खापर्डे, रावबहादूर मुधोळकर, व राजश्री वासुदेवराव चिपळूणकर हे गेले आहेत हें कळविण्यास आनंद वाटतो. आणि ही मंडळी जेव्हां दिल्लीहून परतून आजच्या समारंभाचा गार्भित अर्थ लोकांस निवेदन करितील, तेव्हांच ही स्वराज्याची शिष्टाई परमेश्वर कृपेनें कशी यशस्वी होत चालली आहे याची खरी कल्पना येईल.

## ग्राम पंचायत.

### (राजश्री जठार यांचा सरकारी नकाशा)

गेल्या प्रांतिक कायदे कौंसिलांत सर बेंजामिन यांनीं ग्राम पंचयतीची संस्था या प्रांतांत चालू करावयाची आहे अशाविषयीं उल्लेख आपल्या भाषणांत केलेला आहे. या संबंधांत कायद्याचा मसुदा तयार होऊन सर्व गोष्टी निश्चित झाल्यावर ग्राम पंचायती स्थल विशेषानें अनुभव घेण्यासाठीं ह्मणून चालू करण्यांत येतलि असा अंदाजा दिसतो. आमच्या जिल्ह्याचे लोकप्रिय डिपटी कमिशनर रा. रा. काशीनाथ श्रीराम जठार यांच्याकडे ग्राम पंचायतीची निरनिराळ्या प्रांतीं चौकशी करून आपल्या प्रांताला अनुरूप असा मसुदा तयार करण्यासाठीं मुद्दाम कामगिरी दिली होती. त्या अन्वयें राजश्री जठार याचा रिपोर्ट आतां स्थानिक सरकारापुढें तयार आहे. तो आह्मी वाचून पाहिला आणि त्यामध्यें राजश्री जठार यांची चौकस दृष्टी, प्रगमनशील विचारपद्धती व लोककल्याणाची सद्बुद्धी या चांगल्या जागृत आहेत. पण या रिपोर्टांत एक मोठें व्यंग्य आहे आणि त्याचा दोष राजश्री जठारांकडेस नाहीं. हा रिपोर्ट आह्मी २५ वर्षे पूर्वी वाचला असतां तर कदाचित् त्याबद्दल आह्मी राजश्री जठार यांचा धन्यवाद गाइला असता. पण त्यांना अलिकडील विचारा मधील क्रांती दिसून आली नाहीं ह्मणा किंवा नव्या राजकीय वातावरणांत त्यांना फिरण्याची मनाई आहे ह्मणून ह्मणा किंवा अधिकाराच्या रेघांनीं मनाची सर्वत्र व्याप्ति झाली आहे ह्मणून ह्मणा, त्यांचा हा ग्राम पंचायतीचा खर्डा ह्मणजे डिपटि कमिशनरच्या अधिकारश्रीला अधिक वैभवशाली करण्याचाच प्रयत्न आहे. आमचे स्वराज्यवादी जर हा खर्डा वाचतील तर ते त्यांतील शिरोभागी असलेल्या तत्वांना ह्मणजे अधिकाऱ्यांच्या पूर्ण वर्चस्वाला नाकें मुरडतील. ही ग्रामपंचायत जिल्हा बोर्डाची किंवा तालुका बोर्डांची पूर्वसंस्था व्हावयाची आहे आणि तिच्यांतील सर्व अधिकार तालुका बोर्डाकडे व परंपरेनें जिल्हा बोर्डाकडे केंद्रीभूत व्हावयाला पाहिजे होते; पण तसा कांहीं या खर्ड्यांत प्रकार दिसून येत नाहीं. लोकांच्या हातीं सत्ता देण्याचा हा प्रयत्न खरी सत्ता लोकांच्या हातीं देऊनच अनुभवण्यासारखा आहे आणि ग्रामपंचायतीचीं सर्व सभासूत्रें या खर्ड्यांतील अभिप्रायांप्रमाणें सरकारच्या हातीं नसलीं पाहिजेत. हा मूळ तत्वाचाच वाद आहे आणि त्यामुळेंच राजश्री जठार यांचा प्रयत्न सफल न होतां त्यांच्या ग्रामपंचायतीच्या नकाशा-

उठवून दिसत आहेत. या रिपोर्टावर जी छोटी कमिटी बसणार आहे तिच्यामध्यें निदान लोकमताच्या विचाराचें स्वराज्य असावें पेवढीचं आह्मी सध्या विनंती करितो. नाहींतर डोंगर पोखरून उंदीर काढला असा हा ग्रामपंचायतीचा प्रकार होईल.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—अनुराधा नक्षत्रापासून थंडी पुन्हा चांगली कडक पडूं लागली आहे आणि हे कार्तिकाचे अारोग्याचे दिवस लोकांस विशेष सुखदायी असल्यामुळें आकोल्यासारख्या प्रेगांच्या ठिकाणचे लोक जंगलच्या वस्तीला भराभर जातं चालले आहेत.

**प्लेग**--आकोले जिल्ह्यांत प्लेगाचे मृत्यु १० नोव्हेंबरच्या सप्तकापर्यंत १९६ झाले त्याच्या खालोखाल उमरावती जिल्हा १९२ मृत्यु दाखवितो. यवतमाळ व बुलडाणा या जिल्ह्यांत या रोगाचा तुरळक प्रादुर्भाव आहे.

रा. रा. रामलाल दीनानाथ पांडे यांस बिलासपुराहून येथे आडिशनल डिस्ट्रिक्ट जज्य नेमण्यांत आले आणि रा. रा. रामचंद्र वासुदेव परांजपे यांस येथून बिलासपूरच्या कोर्टावर सबजज्ज व सेशनजज्ज नेमण्यांत आलें

रा. रा. बाळकृष्ण बंधूजी चौबळ सबजज्ज आकोला यांची बदली भंडाऱ्यास होऊन त्यांच्या जागीं रा. रा. हरप्रसाद भार्गव यांस भंडाऱ्यांहून आकोल्यास बदललें.

**कपाशी**—कपसाला भाव २०० रुपये खंडीपर्यंत येण्याच रंग दिसतो पण कराशीचें उत्पन्न रुपयांत ८ आणे देखील नाहीं. १९१६ सालीं १० नोव्हेंबरपर्यंत १३ हजारावर गठडी मुंबईकडे रवाना झाली तेथे यंदा ९॥ हजारापर्यंतच आकडा पोंचला आहे. एक गठडी ह्मणजे ३॥ हड्रेटवट

गेल्या १८ व्या तारखेला खामगांव येथील नागरिकांची राजश्री बिसनचंद यांच्या अध्यक्षतेखालीं जाहिरसभा भरून 'स्वराज्य' या विषयावर राजश्री वासुदेवराव चिपळूणकर यांचे मराठींत व राजश्री पृथ्वीराज व्यास यांचीं हिंदीत व्याख्यानें झालीं. लोकांचा विशेषतः मारवाडी मंडळीचा उत्साह वर्णनीय होता.

येत्या डिसेंबर १० तारखेला प्रांतिक कायदे कौंसिलाची बैठक भरणार आहे.

राजश्री बारसाहेब डिस्ट्रिक्ट जज्ज उमरावती हे पुसद कोर्टाची तपासणी करून आकोल्यास १ दिवस मुक्कामाला होते. तेवढ्यांत ही त्यांच्या मुलाखतीचा लाभ व्हावा ह्मणून पुष्कळजण त्यांच्या भेटीस गेले होते.

रा. रा. महादेव अंबादास अमरावतीकर यांस मोर्शीला सबजज्य नेमण्यांत आलें.

मेहकरच्या मुनसफ कोर्टांत २०० पर्यंत स्माल कॉज कोर्टाचे दावे चालविण्याचा अधिकार देण्यांत आला आहे.

आलिशान नामदार चीफ कमिशनर साहेब हे गेल्या शुक्रवारीं व्हाइसरॉय साहेबांच्या मुलाखतीसाठीं दिल्लीला रवाना झाले पण २ डिसेंबरला त्यांची स्वारी परत येऊन पुलगांव, आर्वी, हिंगणघाट वगैरे भागांत फिरणार आहे.

**राष्ट्रदिन** ( अवरडे ) तारीख १२ डिसेंबरच्या राष्ट्रदिनाच्या महोत्सवासाठीं मोठ्या विस्तीर्ण प्रमाणावर सर्वत्र प्रयत्न चालू आहेत लढाईत घायाळ झालेल्या शिपायांना सुखाची ठेव ह्मणून या राष्ट्रीय महोत्सवाच्या उत्पन्नांतून द्रव्यद्वारा मदत करण्यांत येणार आहे. ही उत्सवाची कल्पना वीररसाला परिपोषक व भूतदयेला प्रोत्साहक अशीच यशस्वी होण्याचा रंग दिसतो

**आर्ट कॉलेज** :— उमरावतीला आर्ट कॉलेज स्थापन करण्याविषयीं स्टेट सेक्रेटरीची मंजुरात आली हें सांगताना सर बेंजामिन यांनीं या कॉलेजच्या इमारतीचें काम लौकर हातीं घेतलें जाईल असें आनंदानें कळविलें. फार उत्तम गोष्ट.

**बुरी कीं रोझियम**:— इंडियन कॉटन कमिटीची स्वारी आकोल्यास व खामगांवास येऊन गेल्यावर सोमवारीं दुसरीकडे रवाना झाली या कमिटीपुढें आमचे येथील कॉटन मार्केटचे मुख्य रा. रा. श्रीराम सुरजमल व रा. रा बाळाभाऊ गडगीळ यांच्या साक्षी झाल्या. तसेच खामगांवास रावबहादुर केशवराव देशमुख व राजश्री धनजी शेट इत्यादि मंडळींच्या साक्षी झाल्या. लांब धाग्याचा कापूस हल्लीं दुर्मीळ झाला आहे. सध्या रोझियमचा कापूस लोकांस विशेष किफायतवार वाटतो. तथापि जुना बुरी कापूस हा पुन्हा प्रचारांत येईल तर बरा असा साधारण रोख दिसला.

## नोटीस

विद्यमान फर्स्ट सबजज्ज आकोला यांचे कोर्टांत

कि. मु. नंबर २९ सन १९१७

चौकशीची तारीख ८।१२।१७

अर्जदार किसनलाल ओंकारदास मारवाडी तर्फे अज्ञान पालन करणार आई कस्तुरीबाई जवजे ओंकारदास मारवाडी रा. आकोला ताजनापेठ ता. आकोला जि. आकोला

अर्ज सक्सेशन सार्टिफिकेट मिळण्याकारितां सर्वत्र लोकांस या नोटिशीनें जाहिर करण्यांत येते कीं, अर्जदार किसनलाल ओंकारदास यानें आमचे कोर्टांत मयत ओंकारदास रामप्रसाद मारवाडी रा. आकोला ता म. यानें मधवती ग्रामती म्यानुफ्याकचरींग कंपनी लिमिटेड मुंबई या कंपनीचे २४९९ व २४९६ नंबरचे शेअरस त्यचे सावतराम रामप्रसाद या नांवचे दुकानचे नांवानें घेतले त्याबद्दल सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्या विषयींचा अर्ज केला आहे तरी सदहू मैताचे इस्टेटीशीं ज्याचा कांहीं हक्क संबंध असेल त्यांनीं आपले कागदोपत्रीं पुराव्या निशीं आमचे कोर्टांत ता. ८।१२।१७ इ. रोजीं हजर राहावें. सदहू तारखेस कोणी हजर न राहिल्यास तक्रार ऐकली जाणार नाहीं. व वरील अर्जदार यासला सक्सेशन सर्टिफिकेट दिले जाईल. कळावें. ता. २२।११।१७ इ०

सही

N. G. Subhedar

2nd Addl District Judge

Akola

N. N. 465

## नोटीस

**नोटीस कलम ११ आक्ट ८ सन १८९० प्रमाणें.**

कि. दि. मुकदमा नंबर १०१ सन १९१७ इ. विद्यमान डिस्ट्रीक्ट जज्ज साहेब यांचे कोर्ट मुक्काम आकोला पश्चिम वऱ्हाड

नांव सुभद्रा

मर्द पितांबर

जात सोनार राहणार खामगांव

तहसील खामगांव जिल्हा बुलठाणा

च्या अल्पवयी राजाराम वा पितांबर

उमर वर्ष ११

राहणार खामगांव ता. खामगांव तहसिलीचे (२) शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालनकर्ता (१) नेमला जाण्या विषयींच्या अर्जा संबंधीं—

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं सदहू अर्जदारानें सदहू अल्पवयीचें ( २ ) शरीर व इस्टेट रक्षणकरण्यासाठीं पालन कर्ता नेमला जाण्या विषयीं अर्ज केल्यावरून सदहु अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख ९ माहे १ सन १९१८ इ. रोजीं नेमिली आहे. त्यावरून अशी नोटीस देण्यात येत आहे कीं, सदहू अर्जदाराच्या अर्जाबद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यांस जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हजर झाले पाहिजे; आणि त्यांस असें ही नोटीस देण्यात येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्यच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख ९ माहे ११ सन १९१७ इ. रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्या निशीं दिली.

सही

W. B. Dhobley

डि. जज्ज

पश्चिम वऱ्हाड

नो. नं. ४६६ आकोला

## जाहिर विनंती.

सर्वत्र कारागीर व इतर संभावीत लोकांस विनंती करण्यांत येते कीं, अकोला येथें येत्या १२ डिसेंबर १९१७ रोजीं 'अवर डे' च्या उत्सवा निमित्य कला कौशल्याचें प्रदर्शन भरावयाचें आहे. त्यात ठेवण्या लायक ज्याचे जवळ ज्या ज्या कारागिरीच्या चांगल्या * वस्तु असतील त्या त्यांनीं आपले नांव घालून खालील कोणत्याही मेंबराकडे ता. ६-१२-१९१७ पावेतो आणून देण्याची मेहेरबानी करावी. प्रदर्शन संपल्यावर वस्तु ज्याच्या त्यास परत देण्यांत येतील. ज्याचीं कामें सर्वनुमतें उत्तम ठरतील त्यास सर्टीफिकिटें देण्याची तजवीज केली जाईल. कळावें, ता. २४।११।१७ इ.

प्रेसिडेंट

ए. डी. पळसुले

मेंबर्स

ए. आर. पांडे

शेख तफजुल हुसेन

एस. ए. पेंढारकर

डी. आर. भागवत

बी. व्ही. गोखले

* कामाचे प्रकार—

१— शिवण काम व काशिदा

२— किनखापी किंवा जरीचें काम

३— धातूंचीं कामें (सोनें चांदीचीं वगैरे)

४— कागदाचीं कामें (कातरकाम हार झाडें वगैरे)

५— मातीचीं निरनिराळीं चित्रें

६— लांकूड, लोकर, कापूस, मेण, पोत, मोती वगैरेचीं कामें

७— फोटो (सर्व प्रकारचे)

नो० नं. ४६७


## पाहिजे.

दिवाणी, फौजदारी, व मुलकी कोर्टाच्या कामाकरितां अनुभवीक व इंग्रजी जाणणारा असा मनुष्य पाहिजे. खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा अगर समक्ष भेटावें.

सही

**गुलाबराय गोविंदराम**

**दुकान-आकोला (वऱ्हाड)**

नो० नं० ४९३

## रोल्डगोल्ड सोन्योच

### कधींच काळे न पडणारे दागिने

चंद्रहार किं. रु. १-४; गोट जोडी २-२॥; पाटल्या जडी २-२॥; वज्रटीका ३-४; ठुशी १. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली ४-५. शिप्यचें मोतीं लहान मेठें वाटेल तसें. सांची २-३-४; अंगठी १; सल्ले अष्टपैलू जोडी १॥ बांगड्या जोडी २-२॥. सरी ४

### केस काळे करण्याचा साबण.

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाकसची किं. १॥ रु.

पत्ता— **मगनलाल के आणि कंपनी गिरगांव- मुंबई**

नो० नं० ५

गरीबांस फुकट

## रामबाण मलम

( कोणत्याहि व्रणरोगावर )

गुणकारी किं. १ आणे.

## केशनाशक पूड.

( ५ आणे )

(क्याटलॉग फुकट) पत्ता. व्ही. आर मुळे नांदूर. G. I. P.

नो० नं० ३७०


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवात्रमांत छापून प्रसिद्ध केलें